
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २६२ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारतीय तत्त्वज्ञानच संपूर्णतेची अनुभूती करून देते. हेच तत्त्वज्ञान सर्व मानव जातीला शांती आणि समन्वय देण्यास योग्य आहे. कार्यकर्त्यांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी तत्त्वज्ञानाच्या मूळ विचाराला पुढे न्यावे. कोणतेही संघटन आपल्या कार्यकर्त्यांकडून शक्ती प्राप्त करते. संघटनेच्या सिद्धांताची परीक्षा त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या व्यवहारातून होते.

- **प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## महत्त्वाचे

### दुबईत 'तेजस' कोसळून वैमानिकाचा मृत्यू

**दुबई :** दुबई येथे सुरू असलेल्या एअर शो दरम्यान शुक्रवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास कवायती सादर करण्यापूर्वीच भारतीय वायुदलाचे तेजस लढाऊ विमान कोसळले, त्यात वैमानिकाचा होरपळून मृत्यू झाला. या अपघाताच्या चौकशीसाठी कोर्ट ऑफ इन्क्वायरीचा आदेश देण्यात आला. वायुदलाने या घटनेला दुजोरा दिला. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, दुबईतील एअर शोमध्ये तेजस लढाऊ विमान सहभागी झाले होते. कवायती करण्यासाठी ते अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आकाशात झेपावले, पण, ते खाली कोसळून स्फोट झाला. त्यानंतर लागलेल्या आगीत वैमानिकाचा मृत्यू झाला.

## कामगार क्षेत्रात क्रांतिकारी सुधारणा

# चार नवे कायदे लागू



नवीन कामगार सुधारणा कायदे स्वावलंबी भारताच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे विकसित भारत २०४७ च्या ध्येयाला नवीन चालना मिळेल. कामगारांच्या कल्याणासाठी घेतलेला हा निर्णय भविष्यासाठी तयार असलेले कामगार आणि मजबूत उद्योगांसाठी सहाय्यक ठरेल. कामगारांना सुरक्षा हमी देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला.

**- मनसुख मांडविया** । केंद्रीय कामगार मंत्री



आमच्या सरकारने चार सुधारित कामगार कायदे लागू केले. स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या हितासाठी हा सर्वात मोठा निर्णय आहे. यामुळे देशातील कामगारांना मोठ्या प्रमाणात सक्षमता मिळेल, तसेच व्यवसाय सुलभतेला देखील चालना मिळेल. सामाजिक सुरक्षा, वेळेवर वेतन आणि सुरक्षित कार्यस्थळ सुनिश्चित करण्यासाठी सुधारित कायद्यातील तरतुदी महत्त्वाच्या ठरतील.

**- नरेंद्र मोदी** । पंतप्रधान

### ● २९ जुने कायदे एकत्र करीत नवीन कायदे ● ४० कोटी कामगारांना मिळणार लाभ

**◆ नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

केंद्र सरकारने शुक्रवारी ऐतिहासिक निर्णय घेत चार क्रांतिकारी कामगार कायदे देशात लागू केले. हे चार कायदे आजपासून अधिसूचित करण्यात आले, असे केंद्रीय श्रममंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले.

केंद्र सरकारने आज अधिसूचना जारी केल्यामुळे वेतन संहिता-२०१९, औद्योगिक संबंध संहिता-२०२०, सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० आणि व्यावसायिक सुरक्षा, स्वास्थ्य आणि कार्यपालन संहिता-२०२० या नव्या कायद्याच्या जागेवर चार सुधारित कायदे देशात लागू झाले आहे. देशातील ४० कोटी कामगारांना या नव्या कायद्याचा लाभ मिळणार आहे.

देशातील वेगवेगळे २९ जुने कायदे एकत्र करीत हे चार नवीन कायदे तयार करण्यात आले, याकडे लक्ष वेधत मांडविया यांनी म्हटले की, हे चार नवीन कायदे देशात लागू झाल्यामुळे कामगारांच्या जीवनात आमूलाग्र असे बदल होणार असून, त्यांचे जीवनमान उंचावणार आहे.

या चार नव्या कायद्यांतून कामगारांना वेळोवेळी किमान वेतनाची हमी मिळेल, यामुळे त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य येईल, तरुणांना नियुक्तीपत्राची हमी मिळेल, यामुळे त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होईल. महिलांना समान वेतन आणि कार्यक्षेत्रात सन्मानाची वागणूक मिळेल. यामुळे कार्यक्षेत्रात लैंगिकतेच्या आधारावर होणाऱ्या भेदभावाला आळा बसेल. एवढेच नाही तर, देशातील ४० कोटी कामगारांना सामाजिक सुरक्षेची हमी मिळणार आहे.



**कामगारांचे जीवनमान बदलणार**
(वृत्त पान ३ वर)

निश्चित अवधीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कामगारांना एक वर्षानंतर भविष्यनिर्वाह निधी आणि ग्रॅच्युटीची हमी, ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वर्षातून एकदा नि:शुल्क आरोग्य तपासणीची हमी, अतिरिक्त वेळेत (ओव्हरटाईम) काम केले तर दुप्पट पगाराची हमी मिळणार आहे. धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना १०० टक्के आरोग्य सुरक्षेची हमी तसेच आंतरराष्ट्रीय मानकानुसार कामगारांना सामाजिक सुरक्षेची हमी या चार नव्या आणि सुधारित कायद्यातून मिळणार असल्याचे मांडविया यांनी सांगितले.

हे साधारण बदल नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामगार क्षेत्रात व्यापक कल्याणासाठी केलेले महत्वपूर्ण असे बदल असून यामुळे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने आपली अधिक वेगाने वाटचाल सुरु होणार असल्याचे मांडविया यांनी सांगितले.

देशातील बदलत्या परिस्थितीशी देशातील जुन्या कामगार कायद्याची सांगड घालण्यासाठी तसेच कामगारांच्या व्यापक कल्याणाच्या दृष्टीने अनेक आवश्यक सुधारणा या कायद्यातून करण्यात आल्या असल्याचे मांडविया यांनी स्पष्ट केले. *(तभा वृत्तसेवा)*

# डीपीसी निधीवरून खा.प्रणिती शिंदे यांचा पालकमंत्र्यांवर हल्लाबोल

### निधीसाठी टक्केवारीचा आरोप; आ.कोठेंकडून जोरदार प्रत्युत्तर



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

डीपीसी म्हणजेच जिल्हा नियोजन समितीमधून महाविकास आघाडीच्या खासदारांना निधी मिळत नसून निधी देण्यासाठी टक्केवारीची अपेक्षा केली जात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांनी थेट पालकमंत्र्यांवर केल्याने राजकारण तापले आहे. भाजपाचे आ. देवेंद्र कोठे यांनीही खा. शिंदे यांना जोरदार प्रत्युत्तर देताना जिभेला हाड नसल्याचे शिंदेंनी सिध्द केल्याची टिका केली आहे.

डीपीसीच्या निधीवरून खा. प्रणिती शिंदे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना थेट टार्गेट केले आहे. एका कार्यक्रमात खा. शिंदे म्हणाल्या आहेत की, एवढे पालकमंत्री बघितले पण कोणत्याही पालकमंत्र्यांनी डीपीसीचा निधी थांबवला नाही. खा. ओमराजे निंबाळकर, खा. धैर्यशील मोहिते-पाटील आणि माझा निधी थांबवला, कारण आमच्याकडून टक्केवारी मिळत नाही. किती खालच्या पातळीचे राजकारण केले जात असल्याचे सांगत खा. शिंदे यांनी खंत व्यक्त केली. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या विरोधात आपण न्यायालयात दाद मागणार आहोत, असेही खा. शिंदे म्हणाल्या. खा. शिंदे यांनी थेट पालकमंत्र्यांवरच टक्केवारीचा आरोप केल्याने सोलापूरचे राजकारण तापले आहे. खा. शिंदे यांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना भाजपाचे आ. देवेंद्र कोठे म्हणाल की, पालकमंत्री यांच्यावर टक्केवारीचा आरोप करून खा. शिंदे यांनी पुन्हा एकदा सिध्द केले आहे की त्यांच्या जिभेला हाड नाही. पालकमंत्र्यांनी सर्व तालुक्यांना भरघोस निधी दिला आहे. या उलट महाविकास आघाडीचे सरकार असताना देत नव्हते यावर खासदार उत्तर देत नाहीत. केवळ त्यांच्या लेटरहेड पत्रावर निधी मिळत नसल्याने ते खोटे आरोप करीत असल्याचा टोला आ. कोठे यांनी लगावला आहे.

**थेट पालकमंत्र्यांवरच टक्केवारीचा आरोप**

जिल्हा नियोजन समिती म्हणजेच डीपीसीमधून शेकडो कोटींचा निधी जिल्हयासाठी खर्च केला जातो. एका खासदारांनीच थेट पालककमंत्र्यांवर निधीसाठी टक्केवारीचा आरोप केल्याने खळबळ उडाली आहे. शासकीय कामासाठी चिरिमिरी जनतेने ऐकली होती. शासनाच्या विविध खात्यांमधून ठेकेदारांना कामे देताना टक्केवारीची चर्चा लोकांनी ऐकली होती. पण एका खासदाराने थेट पालकमंत्र्यांवरच टक्केवारीचा आरोप केल्याने सामान्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

# पंतप्रधान मोदी आफ्रिकेत दाखल

**◆ जोहान्सबर्ग, २१ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जी-२० शिखर परिषदेसाठी शुक्रवारी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे आगमन झाले. यावर्षीची जी-२० शिखर परिषद दक्षिण आफ्रिकेत आयोजित करण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान दक्षिण आफ्रिकेत असतील.

परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पंतप्रधान तीन मुख्य सत्रांमध्ये संबोधन करणार आहेत. शिखर परिषदेदरम्यान, पंतप्रधान मोदी अनेक देशांच्या नेत्यांसोबत वैयक्तिक चर्चा करणार आहेत. ते भारत-ब्राझील-दक्षिण आफ्रिका देशांच्या बैठकीला देखील उपस्थित राहणार आहेत. २०१६ मध्ये द्विपक्षीय भेट आणि २०१८ आणि २०२३ मध्ये झालेल्या दोन ब्रिक्स शिखर परिषदांनंतर, मोदींचा हा दक्षिण आफ्रिकेचा चौथा अधिकृत दौरा आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जी-२० शिखर परिषदेवर बहिष्कार घातला आहे. या परिषदेला अमेरिकेचे कोणतेही अधिकारी उपस्थित नाहीत. *(वृत्तसंस्था)*

# मालेगावमध्ये आंदोलकांचा कोर्टात शिरण्याचा प्रयत्न

### तीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून हत्या; आरोपीला फाशी देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**नाशिक, दि. २१ नोव्हेंबर-**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव ३ वर्षीय चिमुरडीवरील बलात्कार व हत्येच्या प्रकरणामुळे होरपळून निघाले आहे. या घटनेच्या निषेधार्थ येथील नागरिकांनी शुक्रवारी मालेगाव बंदची हाक देऊन मोर्चा काढला होता. पण मोर्चेकऱ्यांनी थेट स्थानिक न्यायालयाच्या इमारतीत शिरण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केल्यामुळे हे प्रकरण चांगलेच चिघळले आहे.

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात एका ३ वर्षीय मुलीवर गावातीलच विजय संजय खैरनार नामक आरोपीने पाशवी बलात्कार केला होता. त्यानंतर दगडाने ठेचून तिची निर्घृण हत्याही केली होती. या प्रकरणाचे सध्या राज्यभरात संतप्त पडसाद उमटत आहेत. या प्रकरणी नागरिकांनी शुक्रवारी मालेगाव बंदची हाक दिली होती. त्याला व्यापारी संघटना, शाळा व महाविद्यालये, विविध सामाजिक व राजकीय संघटनांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या प्रकरणी रामसेतू पुलावरून एक मोर्चाही काढण्यात आला. त्यानंतर अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोर्चेकऱ्यांनी आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

पोलिसांनी प्रसंगावधान राखून मोर्चेकऱ्यांना न्यायालय परिसरात प्रवेश न करता आपल्या मार्गाने जाण्याचे आवाहन केले. पण मोर्चेकऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. अखेर परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी त्यांच्यावर सौम्य लाठीमार केला. हे पाहून मोर्चेकऱ्यांची एकच धावपळ उडाली. या घटनेत काही जण किरकोळ जखमी झाले. या घटनेनंतर शेकडो मोर्चेकरी कोर्टाच्या परिसरात जमले होते. तिथे त्यांची आणखी समजूत काढण्याचा प्रयत्न केला गेला. या घटनेनंतर कोर्टाचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे या प्रकरणातील आरोपीची ५ दिवसांची पोलिस कोठडी काल संपुष्टात आली होती. त्याला कोर्टात सादर करत असताना संतप्त महिलांनी पोलिसाना गराडा घातला. यामुळे बाका प्रसंग उद्भवला होता.

**आरोपीची बाजू एकही वकील मांडणार नाही : दादा भुसे**

मोर्चाला मार्गदर्शन करताना राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शहरातील एकही वकील आरोपीची बाजू मांडणार नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, मालेगावच्या वकील संघाने बालिकेवर अत्याचार करणाऱ्या आरोपीची बाजू कोर्टात न मांडण्याचा निर्णय घेतला आहे. आरोपीची पोलीस कोठडी संपलेली असताना आपले डीवायएसपी बाविस्कर यांनी न्यायालयीन कोठडीची मागणी केली, हे निषेधार्थ आहे. त्याचा मी धिक्कार करतो. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी या प्रकरणाची दखल घेतली. त्यांनी हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची भूमिका घेतली असताना डीवायएसपींनी न्यायालयीन कोठडी मागितली. हे कुणाच्या सांगण्यावरून केले? असा संतप्त सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

**भरचौकात फाशी द्यावी : ज्योती वाघमारे**

पिडित कुटुंबांचे सांत्वन करण्यासाठी गेलेल्या शिवसेनेच्या प्रवक्त्या प्रा. ज्योती वाघमारे म्हणाल्या की, सांत्वनाला आले पण माझ्याकडे शब्दच नाहीत. लोक म्हणतात नराधमाला आमच्या ताब्यात द्या ठेचून मारू. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत आम्ही मुख्यमंत्र्यांकडे मागणी करू की, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावा. या वेदनादायी प्रकरणात कायदा बाजूला ठेवून आरोपीला भरचौकात फाशी दिल्यास असे धाडस दुसरे कोणी करणार नाही. बालक व मुलींच्या अशा केसेससाठी फक्त एक कोर्ट असावे, असेही वाघमारे म्हणाल्या.














# पंढरपुरात नगराध्यक्षपदासाठी दुरंगी तर नगरसेवकपदासाठी सरळ लढत

## उमेदवारी अर्ज माघारी नंतर चित्र झाले स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेसाठी शुक्रवारी (ता.२१) उमेदवारी अर्ज माघारीचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे उमेदवारी अर्ज माघारी नंतर निवडणूकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. बऱ्याच प्रभागात सरळ लढती आहेत तर नगराध्यक्षपदासाठी दुरंगी लढतच रंगणार आहे. कारण विठ्ठल साखर कारखान्याचे अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीकडून सारिका राहुल साबळे यांना नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी देवु केलेली होती. मात्र साबळे यांनी आपला उमेदवारी अर्ज शुक्रवारी अखेरच्या क्षणी मागे घेतला. त्यामुळे नगराध्यक्षपदाची लढत तिरंगी ऐवजी आता दुरंगीच होणार हे स्पष्ट झाले आहे.

उमेदवारी अर्ज माघारीनंतर रिंगणातील उमेदवारांची पक्षनिहाय, प्रभागा नुसार अंतिम यादी अशी : प्रभाग क्रमांक १ (अ) - संतोष गोरख धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), दत्तात्रय तुकाराम काळे (अपक्ष), लखन मधुकर चौगुले (अपक्ष), शंकर एकनाथ चौगुले (अपक्ष), लखन जंबू चौगुले (भाजपा), अक्षय ज्ञानेश्वर आदलिंगे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १ (ब)** - सुरेखा भारत धोत्रे (अपक्ष), प्रज्ञा पृथ्वीराज भोसले (अपक्ष), मंदा शिवाजी धोत्रे (नॅशलिस्ट कॉंग्रेस पार्टी), अर्चना गणेश शिंदे (भाजपा),

**प्रभाग क्रमांक २ (अ)** - मयुर भारत भिंगे (भाजपा), शुभम संजय पवार (अपक्ष), प्रसाद प्रकाश कळसे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , श्रीनिवास धनंजय बोरगावकर (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर) .

**प्रभाग क्रमांक २ (ब)** - अदिती अमित डोंबे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), प्रणिता किरण घाडगे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) ,विणा सागर यादव (अपक्ष), श्वेता निलराज डोंबे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ३ (अ)** - तेजश्री रोहित पानकर (भाजपा), हर्षदा अमित माने (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), राजश्री प्रताप गंगेकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) .

**प्रभाग क्रमांक ३ (ब)** - संदीप अशोक शिंदे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), वैभव ज्ञानेश्वर फसलकर (अपक्ष), श्रीनिवास राजाराम उपळकर (अपक्ष), कृष्णा दशरथ कवडे (भाजपा), सतीश चंद्रकांत गांडुळे (अपक्ष), संजयकुमार आत्माराम ननवरे (नॅशलिस्ट कॉंग्रेस पार्टी), अक्षय प्रताप गंगेकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक ४ (अ)** - विनायक कुमार संगितराव (भाजपा), धनंजय दशरथ कोताळकर (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ४ (ब)** - प्रियांका सागर तारापूरकर (भाजपा), पुनम साईनाथ अभंगराव (अपक्ष),

**प्रभाग क्रमांक ५ (अ)** - कुसुम जगन्नाथ परचंडे ( भाजपा, बिनविरोध)

**प्रभाग क्रमांक ५ (ब)** - सुमित संभाजी शिंदे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), मुकुंद मोहन उत्पात (अपक्ष), श्रीकांत विठ्ठल हरिदास (भाजपा), ओंकार अभय जोशी (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ६ (अ)** - दिवाकर दिगंबर सर्वगोड (तिर्थक्षेत्र विकास आघाडी आणि श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), सुजितकुमार एकनाथ सर्वगोड (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी,पंढरपूर), यशोधरा वसंत कांबळे (अपक्ष), दीपक राजाराम नाईकनवरे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ६ (ब)** - अमृता अर्जुन माळवदे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), रेहाना इब्राहिम बोहरी (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी,पंढरपूर), हुमा मलिक मुजावर(श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर ), भाग्यश्री परसू पवार (अपक्ष), वर्षा विशाल ऐदाळे (अपक्ष), लक्ष्मी चंद्रकांत कदम (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ७ (अ)** - शिला शरद माने (भाजपा), सुनंदा ओदुंबर बोडके (तिर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर), श्रध्दा शेखर भोसले (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक ७ (ब)** - अपिलात गेल्यामुळे निर्णय बाकी

**प्रभाग क्रमांक ८ (अ)** - वर्षा पांडुरंग चौधरी (अपक्ष), वैष्णवी वैभव बडवे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , मनिषा धनंजय देशपांडे (भाजपा), अर्चना सुधीर थिटे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), रेखा दत्तात्रय अदापुरे (अपक्ष).

प्रभाग क्रमांक ८ (ब) - धनंजय मोहन मोरे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी,पंढरपूर), सुनील भाऊसाहेब डोंबे (अपक्ष), संतोष लक्ष्मण कवडे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर),प्रदीप दिलीप पवार (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ९ (अ)** - सविता अशोक करकमकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), प्रतिक्षा विक्रम शिरसट (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ९ (ब)** - श्रीकृष्ण महादेव परचंडराव (अपक्ष), संदिप पांडुरंग अधटराव (भाजपा),

**प्रभाग क्रमांक १० (अ)** - साधना सुधीर धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , उषा अरुण मंजरतकर (भाजपा), भगीरथी अनिल पवार (अपक्ष), प्रीती कुमार बंदपट्टे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १० (ब)** - वैभव शहाजी भोसले (भाजपा), संजय जवाहरलाल बंदपट्टे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक ११ (अ)** - आरती बळीराम बनसोडे (अपक्ष), वैशाली प्रकाश लोखंडे (अपक्ष), अनिता सिकंदर ढवळे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक ११ (ब)** - प्रशांत शिवाजी मलपे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), राजेंद्र पवार (अपक्ष), नागेश प्रकाश पवार (अपक्ष), बालाजी अरुण मलपे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १२ (अ)** - शांताबाई माणिक काळे (अपक्ष), निता शामराव पडगळ (अपक्ष), निता नितीन परचंडे (भाजपा), मिनाक्षी दिगंबर चोरमले (अपक्ष), उमा ओदुंबर शिंदे (अपक्ष), पुनम युवराज भोसले (तिर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक १२ (ब)** - राजसिंह सत्यवान डुबल (अपक्ष), अमर वसंत सुर्यवंशी (अपक्ष), अभिषेक बाळासाहेब सावंत (अपक्ष), सचिन नंदकुमार कदम (अपक्ष) , विशाल दगडू मलपे (भाजपा), प्रशांत गणपत शिंदे ( तिर्थक्षेत्र विकास आघाडी, पंढरपूर),प्रशांत गणपत शिंदे (अपक्ष) विक्रांत सज्जन आसबे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १३ (अ)** - रुक्मिणी धनाजी धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), अर्चना नवनाथ रानगट (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १३ (ब)** - गुरुदास विवेक अभ्यंकर (भाजपा), नागेश आण्णासाहेब भोसले (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).

**प्रभाग क्रमांक १४ (अ)** - शैलजा बाळासाहेब कसबे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) , उज्वला महादेव भालेराव (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी).

**प्रभाग क्रमांक १४ (ब)** - महादेव माणिक धोत्रे (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी), सुधाकर रामदास बंदपट्टे (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १५ (अ)** - आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), धर्मराज आण्णाप्पा घोडके (भाजपा) ,प्रेम अनिल धोत्रे (श्री विठ्ठल परिवर्तन आघाडी ).

**प्रभाग क्रमांक १५ (ब)** - स्मीता आदित्य फत्तेपूरकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी ), चारुशीला गिरीश कुलकर्णी (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी), अश्विनी विवेक परदेशी (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १६ (अ)** - शिवाजी ज्ञानेश्वर मस्के (अपक्ष), अमोल विठ्ठल डोके (भाजपा), रामचंद्र दिगंबर राऊत (अपक्ष).

**प्रभाग क्रमांक १६ (ब)** - प्रमिला अरुण कबाडे (अपक्ष), मोनिका निलेश शिंदे (अपक्ष), रेश्मा शैलेंद्र घोगरदरे (अपक्ष), संध्या मालोजी शेंबडे (भाजपा), सुनिता ओदुंबर घुले (अपक्ष), प्रियंका विशाल राऊत (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी).

**प्रभाग क्रमांक १७ (अ)** - लोकेश नागनाथ यादव (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), अंबालाल किसन दोडिया (भाजपा), अमोल सुरेश घोडके (अपक्ष), किशोर महादेव खिलारे (अपक्ष), बादल शामराव यादव (अपक्ष), अमित दुर्योधन अवघडे (श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी).

**प्रभाग क्रमांक १७ (ब)** - प्रभावती दिगंबर सुडके (नॅशलिस्ट कॉंग्रेस पार्टी), माधुरी दिलीप धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), आरती सागर चव्हाण (अपक्ष), अमृता विदुल अधटराव (अपक्ष), रसिका अशोक काळबांडे (अपक्ष), लता संजय निंबाळकर (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १८ (अ)** - विनायक बसवेश्वर देवमारे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर), पिराजी लक्ष्मण धोत्रे (अपक्ष), सचिन सुरेश बंदपट्टे (अपक्ष), मुजिब सलीम तांबोळी (अपक्ष), शंकर सुभाष सुरवसे (भाजपा).

**प्रभाग क्रमांक १८ (ब)** - अर्चना काशिलिंग डोईफोडे, कविता मच्छिंद्र जाधव (अपक्ष), ज्योती अशोक शिंदे (भाजपा), संगीता अंगद धुमाळ (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).

( अर्ज माघारी नंतर नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची अंतिम यादी ) - जैतुनबी अब्दुलरौफ मुलाणी (अपक्ष), प्रणिता भगिरथ भालके (तीर्थक्षेत्र विकास आघाडी पंढरपूर) , कांचन तुळजाराम बंदपट्टे (अपक्ष), शामल लक्ष्मण शिरसाट (भारतीय जनता पार्टी ), भारती राजू शिंदे (वंचित बहुजन आघाडी).

### सारिका साबळे यांची माघार

पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीकडून सारिका राहुल साबळे यांनी नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेला होता. मात्र त्यांनी आपला उमेदवारी अर्ज शुक्रवारी मागे घेतला. त्यामुळे नगराध्यक्षपदासाठी शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर ) विरुध्द प्रणिता भगिरथ भालके यांच्या मध्येच खरीतर आता दुरंगी लढत होणार आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदाच्या लढती मध्ये शिरसट की भालके बाजी मारणार याकडे संपुर्ण पंढरपूरकरवासियांचे लक्ष लागले आहे.

# मोहोळमध्ये नगराध्यक्षपदासाठी ११ जण तर नगरसेवक पदासाठी ९७ जण रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२१ नोव्हेंबर-**

मोहोळ नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवकासाठी लागलेल्या निवडणुकीत आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी २८ नगर सेवक पदाच्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्याने आता नगरसेवक पदासाठी ९७ उमेदवार रिंगणात उभे आहेत. तर जनतेतून निवडल्या जाणाऱ्या महिला नगराध्यक्ष पदासाठी ११ महिला उभ्या राहिल्या आहेत.

नगराध्यक्षपदासाठी शीतल सुशिल क्षिरसागर भाजप, उज्वला अमर कांबळे, (शिवसेना ठाकरे गट) , सिद्धी राजू वस्त्रे शिवसेना (शिंदे), सोनल विठ्ठल जानराव (राष्ट्रीय कॉंग्रेस आय), अश्वीनी संदीप जाधव (राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट), सखुबाई तुकाराम क्षिरसागर (वंचीत बहुजन आघाडी), मुक्ता अमोल खंदारे, प्रिती राजेंद्र घाडगे, शुभांगी नागनाथ क्षिरसागर, आरती राजरत्न क्षिरसागर, अंजली अशोक वस्त्रे (अपक्ष) आदी ११ उमेदवार नगराध्यक्षपदासाठी नशीब अजमावत रिंगणात उतरले आहेत .

नगरसेवक पदासाठी भरलेल्या उमेदवारी माघारी घेणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये भाजपाचे नूतन जिल्हा चिटणीस महेश सोवनी,उबाठा शिवसेनेचे माजी शहर प्रमुख विक्रम पंडित देशमुख, भारतीय मजदूर संघाचे तालुकाध्यक्ष मच्छिंद्र गाडे पाटील शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख दीपक गायकवाड यांचे चिरंजीव शिवरत्न गायकवाड राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्ष यशोदा कांबळे आदींसह २८ जणांनी अर्ज माघारी घेतले..


# अबब! शहरात ५० हजार मोकाट कुत्रे?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

शहरात गेल्या काही वर्षात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली तरी महापालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सध्या शहराच्या गावठाण-हद्दवाढ भागांत सुमारे ५० हजारांहून अधिक मोकाट कुत्र्यांचा वावर असल्याचे चित्र आहे.

या मोकाट कुत्र्यांमुळे शहरवासीय असुरक्षित आहेत. अबालवृद्धांवर या मोकाट कुत्र्यांचा हल्ला होत आहे. त्यामुळे या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी विविध संस्था, संघटना व पक्षांकडून वेळोवेळी महापालिका प्रशासनाकडे करण्यात येत आहे. महापालिका प्रशासनाकडून कुत्रे निर्बिजीकरणाची प्रक्रिया ठेकेदारावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे प्रक्रियेकडे बोट दाखवत प्रशासन निवांतच आहे. मात्र याचा फटका शहरातील आणि पर्यटनासाठी बाहेरून येणाऱ्या नागरिकांना बसत आहे.

महापालिका प्रशासनाने नेमलेल्या एका मक्तेदाराकडून केवळ दाखविण्यापुरतीच कार्यवाही आणि फोटोसेशन होत असल्याने लाखो रुपये खर्च करून निर्बिजीकरणाची प्रक्रिया राबवूनही शहरातील



नागरिक मोकाट कुत्र्यांपासून सुरक्षित नसल्याची बाब पुढे आली आहे. निर्बिजीकरणाचा ठेका 'नव समाज निर्माण' संस्थेला देण्यात आला आहे. प्रत्येक कुत्र्याच्या निर्बिजीकरणामागे चांगली रक्कम त्यांना देण्यात येते. शिवाय



यासाठी महापालिकेनेच पुणे रोडवरील जुना जकात नाका व इतर जागेत सोयीनियुक्त यंत्रणा मोफत उपलब्ध करून दिली आहे. अशावेळी तक्रारींवर कार्यवाही होत नाही. मोजकेच निर्बिजीकरण झाल्याचे दिसून येते. पण कुत्रे निर्बिजीकरण नोंदीचा घोळ कायम असल्याची चर्चा प्रभागातील लोकप्रतिनिधींकडूनच सुरू आहे. तर निर्बिजीकरण केलेले मोकाट कुत्रे इतरत्र सोडण्याचे प्रकारही होत असल्याची ओरड आहे. निर्बिजीकरणासाठी हेल्पलाइन क्रमांक ७६६६५१३०२६ संपूर्ण शहरवासीयांसाठी देण्यात आला. मात्र या क्रमांकावर तक्रार दिल्यानंतरही कार्यवाही होत नसल्याची संतप्त प्रतिक्रिया काही भागातील नागरिकांनी व्यक्त केली. श्वान दंशाचे दररोज मोठ्या प्रमणात रूग्ण सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात तसेच महापालिकेच्या डफरीनसह विविध नागरी आरोग्य केंद्रात रेबीज लसीकरण व उपचारासाठी येत असल्याची आकडेवारी पुढे आली आहे. मात्र महापालिका प्रशासन शांतच असल्याची ओरड लोकप्रतिनिधींमधून सुरू झाली आहे.

प्रशासनाच्या या गलथान कारभाराविरुध्द आंदोलनासह शहरातील मोकाट कुत्रे पकडून महापालिकेत आणून सोडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# तहसील कार्यालयात गोंधळप्रकरणी कुलकर्णी व साथीदारांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

सोलापूर शहरातील उत्तर तहसील कार्यालयात दि.१९ नोव्हेंबर रोजी दुपारी झालेल्या गोंधळप्रकरणी प्रहार संघटनेचे अजित कुलकर्णी व त्यांच्या साथीदारांवर सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे यांनी फिर्याद दिली आहे.

यातील आरोपी कुलकर्णी व त्याचे ७ ते ८ साथीदार यांनी तहसीलदार नीलेश पाटील यांच्या नावाच्या पाटीवर, अभ्यागतांच्या भेटीच्या वेळेच्या बोर्डावर तसेच कार्यालयाच्या दरवाज्यावर काळ्या रंगाचा स्प्रे मारुन विद्रुपीकरण केले. तसेच तहसीलदार चोर आहे अशा घोषणा दिल्या असे फिर्यादीत नमूद आहे.

ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झालेली आहे. या घटनेच्या तपासाची जबाबदारी उपनिरीक्षक प्रवीण पराडे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

### कुलकर्णी यांनी ७ ते ८ गाड्यांची मागणी केली

अजित कुलकर्णी यांनी केलेल्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य नाही. उलट त्यांनीच नागपूरला जाण्यासाठी ७ ते ८ गाड्यांची मागणी माझ्याकडे केलेली होती. मी त्यांना गाड्या देऊ शकत नाही, असे सांगितले होते. निवडणूक कामकाजासाठी मी मोहोळमध्ये असताना त्यांनी उत्तर तहसील कार्यालयात येऊन हे कृत्य केले आहे, असे उत्तर सोलापूरचे तहसीलदार नीलेश पाटील यांनी सांगितले.



# महापालिकेच्या वतीने १८ ठिकाणी आजोरा हटाव मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने शुक्रवारी शहराच्या विविध १८ भागात आजोरा, दूषित कचरा उचलण्याची मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेसाठी ११ जेसीबी, २० डंपर यांच्या मदतीने दिवसभरात एकूण ८३ खेपा घेऊन आजोरा व दूषित कचरा उचलला.

शहरात दर शुक्रवारी आजोरा उचलण्याची मोहीम घेण्यात येते. यानुसार दि. २१ नोव्हेंबर रोजी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या नियंत्रणाखाली हा मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. यावेळी महत्त्वाच्या भागांमध्ये आजोरा उचल, कचरा संकलन व स्वच्छता कामे करण्यात आली. जुना पुना नाका, शेळगी गावठाण, जिल्हा परिषद परिसर, शेळगी ब्रिज, एकतानगर रोड ते श्रीकृष्ण मंगल कार्यालय, एमआयडीसी रोड, विमानतळ परिसर, म्हाडा कॉलनी, डी-मार्ट रोड ते गोविंदश्री मंगल कार्यालय, सहयोग नगर, नवोदय नगर, मीरा पिठाची गिरणी, छत्रपती संभाजी तलाव मैदान, वसंत नगर कॉर्नर, रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसर, दमाणी नगर, मरीआई चौक, जेल रोड परिसर, डफरीन हॉस्पिटल, शानदार चौक या भागात राबविण्यात आली. या मोहिमेसाठी ११ जेसीबी, २० डंपर यांच्या मदतीने दिवसभरात एकूण ८३ खेपाद्वारे आजोरा व दूषित कचरा उचलण्यात आला. यावेळी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

यावेळी सफाई अधिकारी (वाहन) अनिल चराटे, तसेच मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक उपस्थित राहीले व मार्गदर्शन केले. महापालिका प्रशासन शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासाठी कटिबद्ध असून, नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# उपायुक्त आशिष लोकरे यांच्याकडे सर्वाधिक १३ विभागांची जबाबदारी

## अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्याकडे ८ तर संदीप कारंजे यांच्याकडे ५ विभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिकेच्या कारभाराच्या दृष्टीने आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांनी विविध विभागांचे सुधारितरित्या वाटप केले. महापालिकेतील महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू म्हणून गणले जाणारे उपायुक्त आशिष लोकरे यांच्याकडे सर्वाधिक म्हणजे तब्बल १३ विभागांची जबाबदारी देण्यात आली. तर अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्याकडे ८ आणि अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्याकडे ५ विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली.

सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्याकडे ३, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्याकडे ४ तर मनीषा मगर यांच्याकडे ७, मुख्य लेखापाल डॉ.रत्नराज जवळगेकर यांच्याकडे १ तर नियंत्रण अधिकारी तपन डंके



यांच्याकडे ४ विभाग देण्यात आले. उपायुक्त तैमूर मुलाणी यांची बार्शी येथे पदोन्नतीने बदली झाल्यानंतर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी आयुक्त यांचे नियत्रंण व पुनर्विलोकनाच्या अटीस अधिन राहून हे विभाग सोपविण्यात आलेले आहेत.

निर्गमित केलेले वित्तीय अधिकार व प्रशासकीय अधिकार यांच्या मर्यादेच्या अधीन राहून काम पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडित सर्व प्रस्ताव/प्रकरणे मंजूर करण्यापूर्वी मुख्य लेखापरीक्षक यांच्या अभिप्रायासह सादर होतील, याची दक्षता घेण्यात यावी. स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेकडे पाठवावयाचे कोणतेही प्रस्ताव/प्रकरणे आयुक्त यांच्या पूर्वपरवानगीनेच नगरसचिव यांच्याकडे पाठवली जावीत, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी एका आदेशात म्हटले आहे.

### अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्याकडे देण्यात आलेले विभाग

उपायुक्त आशिष लोकरे-सामान्य प्रशासन विभाग (भांडारसह), कर आकारणी विभाग, अग्निशमन आणि आणीबाणी सेवा विभाग, भूमी व मालमत्ता कार्यालय (हुतात्मा स्मृती मंदिर व शुभराय कला दालनासह), आरोग्य विभाग (दवाखाने/प्रसुतीगृह, एनयुएचएम जन्म-मृत्यु विभाग व विवाह नोंदणी, आरोग्य भांडारसह), मलेरिया विभाग, विधान सल्लागार विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ३ व ६, क्रीडा कार्यालय, संगणक विभाग, अभिलेखापाल, सुरक्षा विभाग, शिक्षण विभाग व महानगरपालिका १ ते ६ प्रशाला.

अतिरिक्त आयुक्त वीणा पवार-घनकचरा व्यवस्थापन विभाग, नगर सचिव कार्यालय, समाज विकास विभाग (एमयुएलएमसह), कामगार व जनता संपर्क कार्यालय (दिव्यांग विभागसह), महिला व बालकल्याण विभाग, उद्यान विभाग, पर्यावरण संवर्धन विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ५ व ७. अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे-शहर, नगर अभियंता (नागरी कामे, गलिच्छ वस्ती सुधारणा (तांत्रिक), सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय (पाणी पुरवठा व जल नित्सारण), निवडणूक व जनगणना कार्यालय, विद्युत विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र.१.

सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले-घनकचरा व्यवस्थापन विभाग, अभिलेखापाल कार्यालय, संगणक विभाग. सहाय्यक आयुक्त गिरिश पंडीत-निवडणूक व जनगणना कार्यालय, शिक्षण विभाग व महानगरपालिका १ ते ६ प्रशाला, अग्निशमन आणि आणीबाणी सेवा विभाग, क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ४. सहाय्यक आयुक्त मनिषा मगर-क्रीडा कार्यालय, उद्यान विभाग, पर्यावरण संवर्धन विभाग, महिला व बालकल्याण विभाग, समाज विकास विभाग (एमयुएलएमसह), कामगार व जनता संपर्क कार्यालय (दिव्यांग विभागसह), क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र. ८. मुख्यलेखापाल डॉ.रत्नराज जवळगेकर-क्षेत्रिय (विभागीय) कार्यालय क्र.२. उपअभियंता तपन डंके-परिवहन विभाग, अतिक्रमण विभाग, मंडई, कोंडवाडा व लायसन (परवाना) विभाग, पशु वैद्यकिय विभाग व महात्मा गांधी प्राणी संग्रहालय विभाग.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बंगाल-झारखंडमध्ये कोळसा माफियांवर ईडीचे छापे

**४०** पेक्षा जास्त ठिकाणी एकाच वेळी कारवाई

**१००** पेक्षा जास्त अधिकाऱ्यांचा समावेश



ईडीच्या छाप्यांवेळी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि सोने जप्त करण्यात आल्याचे समजते. याविषयीची छायाचित्रे समोर आली असून, त्यात ५०० रुपयांच्या नोटांच्या गड्ड्यांनी भरलेल्या ब्रीफकेस आणि बॅगा स्पष्टपणे दिसत आहेत. मोठ्या प्रमाणावर सोन्याचे दागिनेही जप्त करण्यात आले आहेत.

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये कोळसा माफियांवर ईडीची कारवाई सुरू असून, अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) ४० पेक्षा जास्त ठिकाणी एकाच वेळी छापेमारी केली.

अधिकाऱ्यांच्या मते, ईडी पश्चिम बंगालमधील दुर्गापूर, पुरुलिया, हावडा आणि कोलकाता जिल्ह्यातील २४ ठिकाणी बेकायदेशीर कोळसा खाणकाम, वाहतूक आणि साठवणुकीच्या संदर्भात छापे टाकत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शुक्रवारी सकाळपासून नरेंद्र खरका, अनिल गोयल, युधिष्ठिर घोष, कृष्णा मुरारी कायल आणि इतरांच्या ठिकाणांवर ईडीने छापेमारी केली. बंगालमध्ये छापे टाकताना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि दागिने जप्त करण्यात आले.

**झारखंडमध्ये १८ ठिकाणी छापे**

ईडीचे अधिकारी झारखंडमध्ये १८ ठिकाणी शोधमोहीम राबवत आहेत. हे छापे अनेक मोठ्या कोळसा चोरी आणि तस्करीच्या प्रकरणांशी जोडलेले आहेत, ज्यात अनिल गोयल, संजय उद्योग, एलबी सिंह आणि अमर मंडल, राजकिशोर यादव यांचा समावेश आहे. एकत्रितपणे, या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात कोळसा चोरी आणि चोरीचा समावेश आहे, ज्यामुळे सरकारचे शेकडो कोटी रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. (वृत्तसंस्था)

**कफ सिरफ प्रकरण**

## लाच घेताना पोलिसाला अटक

◆ **गाझियाबाद, २१ नोव्हेंबर**

बंदी असलेल्या कफ सिरप तस्करी रॅकेटचा तपास करणाऱ्या गुन्हे शाखेच्या एका निरीक्षकाला शुक्रवारी पोलिसांनी अटक केली. गुन्हे शाखेत तैनात असलेले निरीक्षक रमेश सिंग सिद्धू यांना गुरुवारी संध्याकाळी सिहानी गेट पोलिस ठाण्यातील पथकाने विशिष्ट माहितीच्या आधारे अटक केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत सिद्धूविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे, असे या कारवाईचे नेतृत्व करणाऱ्या नंदग्रामच्या सहायक पोलिस आयुक्त उपासना पांडे यांनी सांगितले. आरोपी निरीक्षकाला न्यायालयात हजर केले जाईल आणि न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर तुरुंगात पाठवले जाईल, असे त्या म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

# कर्नाटकात हेरगिरी मॉड्युलचा भंडाफोड

## दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक, नौकांची छायाचित्रे पाठविली

◆ **उडुपी, २१ नोव्हेंबर**

कर्नाटक जिल्ह्यातील उडुपी पोलिसांनी देशाच्या सागरी सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या हेरगिरी मॉड्युलचा भंडाफोड करीत दोन पाकिस्तानी गुप्तहेरांना अटक केली. आरोपी उत्तरप्रदेशच्या सुलतानपूर जिल्ह्यातील रहिवासी असून, कोचीन शिपयार्डमध्ये नोकरीवर आहे. त्यांनी लढाऊ नौकांची छायाचित्रे पाकिस्तानी एजंटला व्हॉट्सॲपद्वारे पाठविल्याची माहिती चौकशीत समोर आली.

कोचीन शिपयार्डमध्ये काम करणारे हे दोघे पाकिस्तानी एजंटच्या संपर्कात होते. गोपनीय माहितीच्या आधारे त्यांच्या हालचालीवर लक्ष



ठेवण्यात आले आणि गुरुवारी त्यांना उडुपी येथून अटक केली, असे सहाय्यक पोलिस अधीक्षक हर्ष प्रियवदा यांनी सांगितले.

पहिला आरोपी रोहित हा मालपे येथील कोचीन शिपयार्डमध्ये काम करत होता, तर दुसरा आरोपी समीर हा केरळमधील कोचीन येथील शिपयार्डमध्ये कार्यरत होता. त्यांचे मोबाईल आणि लॅपटॉप जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या डिजिटल उपकरणांची तपासणी केली असता, जहाजबांधणीची गोपनीय कागदपत्रे, नौकांचे क्रमांक आणि इतर माहिती थेट पाकिस्तानी फोन नंबरवर व्हॉट्सॲपद्वारे पाठविल्याचे उघड झाले.

दोघांच्या मोबाईल फोनवरून अनेक चॅट्स, मीडिया फाइल्स आणि कागदपत्रे जप्त करण्यात आली, त्यांची न्यायवैद्यक तपासणी केली जात आहे. हे दोघेही किती काळापासून या कृत्यात गुंतले आहेत आणि त्यांच्या मागे एक संघटित नेटवर्क कार्यरत आहे का याचाही तपास केला जात आहे. राष्ट्रीय सुरक्षा संस्था देखील या तपासात सहभागी झाल्या आहेत. (वृत्तसंस्था)

# २५० बंदरांना मिळणार सीआयएसएफचे सुरक्षा कवच

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

भारतातील बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अर्थात् सीआयएसएफकडे सोपविण्याचा निर्णय जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने घेतला आहे. त्यामुळे विमानतळाप्रमाणेच आता देशातील सुमारे २५० बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी सीआयएसफकडे राहणार आहे.

सीआयएसएफचे उपमहानिरीक्षक अजय दहिया यांनी सांगितले की, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने १८ नोव्हेंबर रोजी संबंधित आदेश जारी केला. हा निर्णय बंदरांच्या सुरक्षेचे आधुनिकीकरण आणि सुधारणा करण्याच्या दिशेने एक दूरदर्शी पाऊल आहे. व्यापार, नौवहन आणि भारताच्या वाढत्या नील अर्थव्यवस्थेत बंदरांची भूमिका लक्षात घेता, सुरक्षेसंदर्भात अनेक उपाययोजना राबवल्या जात आहे. सीआयएसएफ आता बंदरांवर सुरक्षा योजना आणि मूलभूत सुरक्षा ऑपरेशन्सची तयारी करेल.

बंदरांच्या सुरक्षेसाठी हायब्रिड सुरक्षा मॉडेल, सुधारित स्क्रीनिंग प्रणाली आणि विशेष प्रशिक्षण संस्थाही सुरू करण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यात सीआयएसएफ १३ प्रमुख बंदरांच्या सुरक्षेसाठी तैनात आहे, तर खाजगी सुरक्षा एजन्सी कार्गो झोन, गोदामे, प्रवेशद्वार आणि लहान बंदरांमधील इतर सुविधांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. (वृत्तसंस्था)

# कामगारांचे जीवनमान बदलणार

## नवीन श्रम संहितेमुळे सामाजिक सुरक्षा कवच ● आर्थिक विकासाला चालना ● नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होणार



◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

देशात नवीन श्रम संहिता लागू करण्याचा केंद्र सरकारने घेतलेला निर्णय कामगारांचे जीवनमान बदलणारा असून, त्यांना सामाजिक सुरक्षा कवचही मिळणार आहे. नवीन संहितेमुळे सर्व कामगारांना वेळेवर आणि किमान वेतनाची हमी मिळेलच याशिवाय त्यांना मोफत आरोग्य तपासणी आणि ग्रॅच्युईटीचा अधिकार मिळणार आहे.

देशातील ४० कोटी कामगारांचे भविष्य सुनिश्चित करणे आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे हा या निर्णयाचा उद्देश आहे. नवीन कामगार सुधारणा कायदे लागू झाल्याने देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि नवीन रोजगाराच्या संधी देखील निर्माण होणार आहे. नवीन कामगार संहितांमध्ये रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी विशेष तरतुदींचा समावेश आहे. महिला कामगारांना पुरुषांप्रमाणेच वेतन देण्याची तरतूद आहे. नवीन कामगार संहितांमध्ये छळ, भेदभाव आणि वेतनाशी संबंधित तक्रारींचे जलद निवारण करण्याच्या तरतुदींचा देखील समावेश आहे.

निश्चित मुदतीचा रोजगार आणि अनिवार्य नियुक्ती पत्रे कामगारांसाठी सामाजिक सुरक्षिततेची हमी देतील. नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीमुळे भारतातील कामगारांना जागतिक दर्जाचे सुविधा मिळण्याची हमी मिळणार आहे. (वृत्तसंस्था)

### नवीन कामगार संहितेतील महत्त्वाचे मुद्दे

- नियोक्त्यांना वेतन विलंबाने करता येणार नाही
- कामगारांसोबत मनमानीने वागता येणार नाही
- कामगारांच्या शोषणाला आळा बसेल
- नोकरी सुरू होताच त्यांचे हक्क निश्चित होतील
- महिला कामगारांसाठी समान वेतनाची तरतूद आहे
- कामाच्या ठिकाणी लिंग-आधारित भेदभाव रोखण्यासाठी तरतुदी आहे
- ४० कोटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा हमी निश्चित होईल
- कर्मचाऱ्यांना एक वर्षाच्या नोकरीनंतरच ग्रॅच्युइटीची हमी मिळेल
- ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वार्षिक मोफत आरोग्य तपासणीची हमी
- ओव्हरटाईम करणाऱ्या कामगारांना दुप्पट वेतनाची हमी मिळेल
- धोकादायक क्षेत्रातील कामगारांसाठी १०० टक्के आरोग्य सुरक्षा
- आंतरराष्ट्रीय मानकांनुसार कामगारांसाठी सामाजिक न्यायाची हमी

### अशा आहे संहितेतील तरतुदी

- **औद्योगिक संबंध संहिता-२०२० :** या संहितेअंतर्गत, एका वर्षाच्या निश्चित मुदतीच्या नोकरीनंतर ग्रॅच्युइटी पात्र असेल. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी एक स्वतंत्र निधी तयार केला जाईल.
- **सामाजिक सुरक्षा संहिता- २०२० :** कर्मचारी राज्य विमा आता संपूर्ण भारतात लागू केला जाईल. १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापना नियाक्ता आणि कर्मचाऱ्यांच्या परस्पर संमतीने स्वेच्छेने या योजनेत सामील होता येईल.
- **वेतन संहिता-२०१९ :** सर्व क्षेत्रांना किमान वेतन लागू असेल, समान कामासाठी समान वेतनाची हमी दिली जाईल आणि वेतन देयकाची अंतिम मुदत निश्चित केली जाईल. कामाच्या ठिकाणी जाताना अपघात झाल्यास तो रोजगाराशी संबंधित मानला जाईल.
- **व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि सेवा अटी संहिता-२०२० :** संहितेच्या तरतुदी आस्थापनेत एक कर्मचारी असला तरी लागू होतील, आस्थापनांसाठी एक परवाना, एक नोंदणी आणि एक परतावा अशी चौकट सुरू करण्यात आली.

# बंधुत्व हाच भारताचा धर्म : सरसंघचालक

## मणिपूरमध्ये जनजाती प्रतिनिधींसोबत संवाद

◆ **इम्फाळ, २१ नोव्हेंबर**

स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाची घटनात्मक तत्त्वे गौतम बुद्धांच्या शिकवणींमध्ये रुजलेली आहेत आणि जेव्हा बंधुता-एकतेची भावना मजबूत असेल तेव्हाच ती संस्कृती भरभराटीला येऊ शकते. स्वातंत्र्य आणि समानता असूनही अनेक राष्ट्रे अपयशी ठरली. कारण त्यांच्यात बंधुत्वाचा अभाव होता. परंतु भारतासाठी बंधुत्व हाच धर्म आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

सध्या सरसंघचालक मणिपूरच्या तीन दिवसांच्या भेटीवर आहेत. शुक्रवारी भेटीच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी इम्फाळमधील जनजाती नेत्यांशी संवाद साधला. यावेळी मणिपूरच्या विविध जनजाती समुदायांचे प्रतिनिधित्व करणारे २०० हून अधिक नेते उपस्थित होते. यावेळी सरसंघचालक म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही समजाला बळकट करण्यासाठी समर्पित एक पूर्णपणे सामाजिक संघटना आहे. संघ कोणाच्याही विरोधात नाही, तो



समाजाला नष्ट करण्यासाठी नाही तर समाज पूर्णत्वास नेण्याकरिता स्थापन झाला आहे. नेते, राजकारण, सरकारे आणि अगदी दैवी अवतार या समाजासाठी सहायक शक्ती आहेत. पण, समाजाला खरी गरज एकतेची आहे. संघ राजकारणात सहभागी होत नाही किंवा कोणत्याही संघटनेवर रिमोट कंट्रोल म्हणून काम करत नाही. संघ केवळ मैत्री, स्नेह आणि सामाजिक सौहार्दाद्वारे कार्य करतो.

**भारताचे सांस्कृतिक सातत्य**

भारताच्या सांस्कृतिक सातत्यावर भर देताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, अभ्यासातून असे दिसून येते की भारतातील लोकांचे आनुवंशिक आणि सांस्कृतिक डीएनए हजारो वर्षांपासून एक राहिले आहेत. आपल्या सामायिक जाणिवेमुळे आपण एक आहोत. आपल्यात सुंदर विविधता असूनही आपण एकाच संस्कृतीच्या कुटुंबातील आहोत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची निर्मिती कोणत्याही बाह्यशक्तीच्या प्रतिक्रियेस्वरूप झालेली नाही, तर अंतर्गत विसंगती दूर करण्यासाठी झाली आहे, हे स्पष्ट करून सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी डॉ. हेडगेवारांच्या समाज एकत्रीकरण संकल्पाचे स्मरण केले. ते म्हणाले, संघ ही मानवनिर्मिती आणि चारित्र्यनिर्मितीची चळवळ आहे. संघाचे काम वास्तवाच्या धर्तीवर कसे चालते, हे समजून घेण्यासाठी सर्वांनी शाखांना भेट द्यावी. आमच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीशी बांधिलकी ठेवून समाजाच्या भल्यासाठी काम करणारा कोणीही अघोषित स्वयंसेवकच आहे. आम्हाला चांगल्या समाजाशिवाय काहीही नकोय, असेही सरसंघचालक म्हणाले. (वृत्तसंस्था)

# मनसे महाविकास आघाडीचा भाग नाही : संदीप देशपांडे

**मुंबई २१ नोव्हेंबर**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत ठिणगी पडण्याची शक्यता असून, विविध मार्गाने काँग्रेस पक्षाने मनसे सोबत युती न करण्याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. मविआचा घटक पक्ष असलेल्या उबाठाने याबाबत अद्याप भूमिका स्पष्ट केली नसली तरी, मनसे ही महाविकास आघाडीचा भाग नसल्याचे स्पष्टीकरण मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दिले.

उबाठासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. यामुळे कुठल्याही परिस्थितीत उबाठाला मुंबई मनपा राखायची असल्याने, एकमकाविरोधात रान उठविणारे ठाकरे बंधू एकत्रित आले. यामुळे उद्धव ठाकरे यांनी मनसे सोबत एकत्र आलो तर एकत्र राहण्यासाठीच असे ठणकावून मविआतील घटक पक्षाला स्पष्टपणे संकेत दिलेले होते. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात काँग्रेस पक्षाला पूर्वी आपल्या सोबत असलेल्या हिंदी भाषिक मतदारांना पुन्हा आपल्याकडे वळवायचे आहे. मात्र मनसे आणि उबाठा यांचे सोबत एकत्रित बृहन्मुंबई महानगरपालिका लढवल्यास काँग्रेसचे नुकसान होईल म्हणून काँग्रेस मनसेला जोरदार विरोध करीत आहे.

## बापानेच केले मुलीचे लैंगिक शोषण

गोंदिया : जिल्ह्यातील सडक-अर्जुनी तालुक्यात येणाऱ्या डुग्गीपार पोलिस ठाण्याच्या हद्दीत बापानेच स्वतःच्या १४ वर्षीय मुलीचे लैंगिक शोषण करून तिला गर्भवती केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंद करून त्याला अटक करण्यात आली.

# २५० बंदरांना मिळणार सीआयएसएफचे सुरक्षा कवच

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

भारतातील बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल अर्थात् सीआयएसएफकडे सोपविण्याचा निर्णय जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने घेतला आहे. त्यामुळे विमानतळाप्रमाणेच आता देशातील सुमारे २५० बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी सीआयएसफकडे राहणार आहे.

सीआयएसएफचे उपमहानिरीक्षक अजय दहिया यांनी सांगितले की, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने १८ नोव्हेंबर रोजी संबंधित आदेश जारी केला. हा निर्णय बंदरांच्या सुरक्षेचे आधुनिकीकरण आणि सुधारणा करण्याच्या दिशेने एक दूरदर्शी पाऊल आहे. व्यापार, नौवहन आणि भारताच्या वाढत्या नील अर्थव्यवस्थेत बंदरांची भूमिका लक्षात घेता, सुरक्षेसंदर्भात अनेक उपाययोजना राबवल्या जात आहे. सीआयएसएफ आता बंदरांवर सुरक्षा योजना आणि मूलभूत सुरक्षा ऑपरेशन्सची तयारी करेल.

बंदरांच्या सुरक्षेसाठी हायब्रिड सुरक्षा मॉडेल, सुधारित स्क्रीनिंग प्रणाली आणि विशेष प्रशिक्षण संस्थाही सुरू करण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यात सीआयएसएफ १३ प्रमुख बंदरांच्या सुरक्षेसाठी तैनात आहे, तर खाजगी सुरक्षा एजन्सी कार्गो झोन, गोदामे, प्रवेशद्वार आणि लहान बंदरांमधील इतर सुविधांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. (वृत्तसंस्था)

# राज्यात कामगार रुग्णालयांसाठी विनामूल्य सरकारी जमीन

## आरोग्य सुविधांचे जाळे अधिक बळकट

◆ **मुंबई २१ नोव्हेंबर**

राज्यात उभारल्या जाणाऱ्या कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ईएसआयसी) रुग्णालयांसाठी सरकारी जमीन महसूलमुक्त आणि सारामाफीने मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागामार्फत शासन निर्णय जारी केला. यामुळे निर्णयामुळे राज्यभरातील कामगार रुग्णालये सक्षम होतील आणि या माध्यमातून कामगारांना योग्य सुविधा उपलब्ध होतील.

छ. संभाजीनगर जिल्ह्यातील करोडी येथील १५ एकर गायरान जमीन २०० खाटांच्या कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ईएसआयसी) रुग्णालयासाठी मोफत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने जूनमध्ये घेतला होता. या माध्यमातून कामगार रुग्णालय अधिक सक्षम करण्यासाठी मदत होणार असल्याने, त्याच धर्तीवर राज्यात जिथे ईएसआयसी रुग्णालये प्रस्तावित आहेत, तिथे हाच नियम लागू केला जाईल. सरकारी जमीन उपलब्ध असल्यास ती विनामूल्य देण्याचा निर्णय घेऊन राज्यातील कामगारांना मोठा दिलासा दिला आहे. (तभा वृत्तसेवा)

### निकष

- मागणी केलेल्या जमिनीचे बाजारमूल्य एक कोटी रुपयांपर्यंत असल्यास विभागाच्या स्तरावर निर्णय घेतला जाईल.
- जमिनीचे मूल्य एक कोटीपेक्षा जास्त असल्यास वित्त विभागाच्या सहमतीने जमीन मोफत दिली जाईल.
- या जमिनीचा ताबा हा भोगवटादार वर्ग-२ म्हणून राहील.
- ५०० खाटांचे रुग्णालय : ८ ते १२ एकर जमीन.
- ३०० खाटांचे रुग्णालय : ६ ते ९ एकर जमीन.
- २०० खाटांचे रुग्णालय : ५ ते ७ एकर जमीन.
- १०० खाटांचे रुग्णालय : ३ ते ५ एकर जमीन.

# बांगलादेशात भूकंप; सहा जणांचा मृत्यू

## २०० जखमी

◆ **ढाका, २१ नोव्हेंबर**

बांगलादेशात शुक्रवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास झालेल्या विध्वंसक भूकंपात ६ जण ठार तर २०० पेक्षा जास्त जखमी झाले. भूकंपाचे केंद्र ढाक्यापासून २५ किमी अंतरावरील नरसिंगडी येथील माधाबादीत होते.

भूकंपाच्या तीव्रतेमुळे १० मजली इमारत एका बाजूला झुकली. बांगलादेशमध्ये सुरू असलेला बांगलादेश-आयर्लंड आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामनाही थांबविण्यात आला. तीन जणांच्या मृत्यूला पोलिसांनी दुजोरा दिल्याचे स्थानिक माध्यमांनी वृत्तात म्हटले आहे. बांगलादेशात १९६२ मध्ये सर्वात मोठा भूकंप आला होता. त्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ८.५ होती. याला ग्रेट अराकान भूकंप म्हणून ओळखले जाते. त्यामुळे बांगलादेशात मोठे नुकसान झाले होते.

गाझीपूरमधील श्रीपूर येथे भूकंपादरम्यान एक मोठा अपघात झाला. भूकंपानंतर बहुमजली इमारतीतून कामगारांनी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीत १५० पेक्षा जास्त कामगार जखमी झाले. डेनिमेक नावाच्या कापड कारखान्यात ही घटना घडली. जखमींना श्रीपूर उपजिल्हा आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. भूकंप झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी कारखान्याचे मुख्य गेट उघडण्यास नकार दिल्याची तक्रार कामगारांनी केली आहे. गेट न उघडल्याने घबराट पसरली आणि ते अधिक जखमी झाले.



शुक्रवारी आलेल्या शक्तिशाली भूकंपात ढाक्यामध्ये एकीकडे कललेली ही इमारत. लोक मात्र धोक्याकडे दुर्लक्ष करून छायाचित्र काढत होते

**१० महिन्यांच्या मुलीचा मृत्यू**

आज सकाळी झालेल्या भूकंपात नारायणगंजच्या रूपगंज उपजिल्हा येथे भिंत कोसळून १० महिन्यांच्या मुलीचा मृत्यू झाला. मुलाची आई आणि शेजारी जखमी झाले आहेत आणि सध्या उपजिल्हा येथील एका खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मुलीच्या आईने सांगितले की, भूकंपाचा धक्का जाणवताच मुलाची आई तिच्या मुलीसह घराबाहेर पळून गेली. ते जवळच असलेल्या तिच्या आईच्या घरी जात असताना, रस्त्याच्या कडेला असलेली भिंत अचानक त्यांच्यावर कोसळली. यात मुलीचा जागीच मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

### कोलकातामध्ये २० सेकंद जाणवले धक्के

बांगलादेशमधील भूकंपानंतर कोलकातामध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. स्थानिकांच्या मते, हे धक्के सुमारे २० सेकंदांसाठी होते. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ५.२ होती. आतापर्यंत कोणतेही नुकसान झालेले नाही. कूचबिहार, दक्षिण दिनाजपूर, मालदा आणि नादिया येथील अनेक भागात भूकंपाचे धक्के जाणवले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# सुशासनबाबू आणि विकासबाबू

बिहारच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ दहाव्यांदा घेऊन नितीशकुमार यांनी बिहारमध्येच नाही तर देशातही इतिहास घडवला आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी महाआघाडीने राजदचे तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. रालोआने मात्र आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात रालोआ विधानसभा निवडणूक लढवत असल्याचे भाजपाचे नेते वारंवार सांगत होते. निवडणुकीनंतर नवनिर्वाचित आमदार मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतील, अशी भूमिकाही भाजपा नेते मांडत होते. दुसरीकडे, नितीशकुमारच मुख्यमंत्री होतील, असा दावा जदयुचे नेते करीत होते. मतमोजणीनंतर नितीशकुमारच बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील, हे स्पष्ट झाले होते. कारण भाजपा खालोखाल ८५ जागा जदयुने जिंकल्या. जदयुला यावेळी बिहारमध्ये मिळालेले यश हे नितीशकुमारांची लोकप्रियता दर्शविणारे आहे. प्रदीर्घ काळ सत्तेवर राहूनही नितीशकुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचा तसेच घराणेशाहीचा आरोप झाला नाही, ही त्यांची जमेची बाजू.

बिहारच्या जनतेसमोर यावेळी दोन पर्याय होते. पहिला म्हणजे तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वात महाआघाडीचे सरकार आणणे वा गेल्या २० वर्षांपासून बिहारमध्ये सुशासनबाबू म्हणून ओळखले जाणारे नितीशकुमार यांनाच पुन्हा संधी देणे. यात बिहारच्या सुज्ञ जनतेने नितीशकुमार यांना संधी दिली. बिहारमध्ये महाआघाडीची सत्ता आली असती आणि तेजस्वी यादव मुख्यमंत्री झाले असते, तर तेथे पुन्हा जंगलराज आले असते. लालूप्रसाद आणि राबडीदेवींच्या शासनकाळात बिहारच्या जनतेने जंगलराजचा अतिशय दाहक अनुभव घेतला आहे. बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येऊ नये, तर मंगलराज यावे म्हणून तेथील जनतेने यावेळी काही उण्या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत नितीशकुमार यांच्या बाजूने कौल दिला. गुरुवारी त्यांच्या नेतृत्वात २६ सदस्यीय मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. नव्या मंत्रिमंडळात भाजपाचा वरचष्मा दिसून येतो आहे. खरे म्हणजे भाजपा आणि जदयु यांच्या आमदारांच्या संख्येत फारसा फरक नाही. त्यामुळे फार तर भाजपाला मंत्रिमंडळात जदयुच्या तुलनेत एखाददुसरी जास्त जागा मिळेल, असे वाटत होते. पण, नव्या मंत्रिमंडळात दोन उपमुख्यमंत्र्यांसह भाजपाचे चौदा मंत्री आहे, तर जदयुचे फक्त आठ. रालोआतील अन्य मित्रपक्षांना ४ जागा मिळाल्या. नितीशकुमार आपल्या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ३६ मंत्री घेऊ शकतात. म्हणजे मंत्रिमंडळात सध्या १० जागा रिक्त आहेत. याचा अर्थ नितीशकुमार भविष्यात मंत्रिमंडळाचा विस्तार करू शकतात. सुशासनबाबूंसाठी बिहार ही होम पीच असली तरी मुख्यमंत्रिपदाची दहावी कारकीर्द त्यांच्यासाठी तितकीशी सोपी नाही. त्यांच्यासमोर प्रचारदरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचे मोठे आव्हान आहे. या आश्वासनांची खरोखर पूर्तता केली तर आधीच कमजोर असलेल्या बिहारच्या अर्थव्यवस्थेवर आणखी ताण येणार आहे. तो ताण कमी करण्याचे आव्हान नितीशकुमारांना पेलावे लागेल. २००० मध्ये नितीशकुमार यांनी पहिल्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांचा हा पहिला कार्यकाळ फक्त सात दिवसांचा म्हणजे औटघटकेचा ठरला. २००५ नंतर मात्र छोटा अपवाद वगळता गेल्या २० वर्षांपासून तेच बिहारचे मुख्यमंत्री आहेत. लालूप्रसाद आणि राबडीदेवींच्या काळात जंगलराज म्हणून बिहारची जी प्रतिमा निर्माण झाली होती, ती त्यांनी या काळात पुसून काढली. बिहारमधील गुन्हेगारी निश्चितच कमी केली. बिहारमध्ये खंडणी आणि अपहरण हा मोठा उद्योग झाला होता. खून आणि दरोड्यांसोबत महिलांवरील अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात होत होत्या. बिहारमध्ये महिलाच नाही तर कोणीच सुरक्षित नव्हते. डॉक्टर, वकील सोडा पण राज्यातील आयएएस आणि आयपीएस अधिकारीही सुरक्षित नव्हते. लालूप्रसादांच्या एका कन्येच्या विवाहात तर शोरुममधून उंची फर्निचर आणि महागड्या चारचाकी गाड्या लुटण्यात आल्या होत्या, असा आरोप झाला होता. लालूप्रसादांचे दोन साळे- साधू यादव आणि सुभाष यादव यांच्या गुंडागर्दीला तर बिहारची जनताच नाही तर पोलिस खातेही घाबरत होते. बिहारमध्ये जंगलराजचे अवशेष अद्याप शिल्लक आहेत. या जंगलराजचा शेवट करण्याचे आश्वासन नितीशकुमार यांनी दिले होते. त्यामुळे बिहारच्या जनतेने त्यांच्यावर वारंवार विश्वास ठेवला. बहुमताने निवडून दिले. त्यांनी बिहारमधील जंगलराजवर बऱ्यापैकी अंकुश आणला. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. ज्यांनी बिहारमधील लालूप्रसादांच्या काळातील जंगलराजचा अनुभव घेतला आहे, त्यांना नितीशकुमार यांच्या काळातील मंगलराजचे महत्त्व समजेल. नितीशकुमार यांच्या कार्यकाळात बिहारमध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित होण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली गेली असली तरी त्यांच्या नेतृत्वात बिहारची अपेक्षित प्रगती अद्याप झालेली नाही. मोठमोठे उद्योगधंदे राज्यात यायला हवे होते, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण व्हायला हवा होता. तसे घडलेले नाही. बिहारच्या तरुणांना आजही रोजगारासाठी मोठ्या संख्येत आपले राज्य सोडून देशाच्या कानाकोपऱ्यात जावे लागते. मुख्यमंत्रिपदाच्या दहाव्या कार्यकाळात नितीशकुमार यांच्यासमोर राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग आणण्याचे तसेच रोजगार निर्माण करण्याचे आव्हान आहे. आधीच्या नऊ कार्यकाळांत नितीशकुमार यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत चांगले काम केले असले तरी रोजगाराच्या क्षेत्रात त्यांना बरीच मजल पुढच्या काळात गाठावी लागेल.

त्यांचा मुख्यमंत्री म्हणून हा दहावा आणि कदाचित शेवटचा कार्यकाळ आहे. आता त्यांची प्रकृती पूर्वीसारखी त्यांना साथ देत नाही. वयाची पंचाहत्तरी त्यांनी ओलांडली आहे. चालताना त्यांना कोणाचा तरी आधार घ्यावा लागतो. स्मरणशक्तीही क्षीण झालेली आहे. त्यामुळेच भाजपा नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करायला फारशी अनुकूल नव्हती. पण बिहारच्या जनतेने तरुण तुर्क असलेल्या तेजस्वी यादव यांना नाकारत वयस्क अर्क असलेल्या नितीशकुमार यांना संधी दिली. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या नऊ कार्यकाळातील पुण्याईवर ही संधी त्यांना मिळाली आहे. ही पुण्याई एकट्या नितीशकुमार यांची नव्हती. ती भाजपाचीही होती. यावेळच्या विधानसभा निवडणुकीत रालोआने जागांचे जे द्विशतक मारले, त्याचे खरे श्रेय हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे आहे. लालूप्रसाद यादव बिहारमध्ये आपले राजकारण एमवाय म्हणजे मुस्लिम आणि यादव यांच्या भरोशावर करत होते. राज्यात यावेळी रालोआला मिळालेले यशही एमवाय फॅक्टरमुळे मिळालेले आहे. रालोआचा एक एमवाय फॅक्टर म्हणजे महिला आणि युवा. या दोन वर्गांनी विधानसभा निवडणुकीत रालोआला भरभरून मतदान केले. निवडणुकीपूर्वी नितीशकुमार यांच्या सरकारने महिलांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी महिला रोजगार योजना सुरू केली होती. प्रत्येक महिलेच्या बँक खात्यात दहा हजार रुपये जमा केले होते. राज्यातील जवळपास दीड कोटी महिलांना या योजनेचा फायदा मिळाला. ही योजना पुढे चालवण्याचे मोठे आव्हान नितीशकुमार यांच्यासमोर आहे. महिलांसोबत युवा वर्गासाठी रोजगार निर्माण करण्याचे दुसरे आव्हान नितीशकुमार यांच्यासोबत भाजपालाही पेलावे लागणार आहे. जदयु हा प्रादेशिक पक्ष असला तरी भाजपाचे तसे नाही. तो राष्ट्रीय पक्ष आहे. नितीशकुमार यांच्यानंतर जदयुला कदाचित फारसे राजकीय अस्तित्व उरणार नाही. भाजपा हा व्यक्तिकेंद्रित पक्ष नाही, तर विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. त्यामुळे भाजपाला बिहारच्या बाबतीत दीर्घकालीन विकासाची भूमिका घ्यावीच लागणार आहे. बिहारचा आर्थिक विकास झाला तर राज्यात आपोआप उद्योगधंदे येतील आणि त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होईल. बिमारू राज्यांच्या श्रेणीतून नितीशकुमार यांनी बिहारला बाहेर काढले असले तरी ते अद्याप आर्थिकदृष्ट्या सुदृढ राज्य झाले नाही. नितीशकुमार सुशासनबाबू ठरले, पण विकासबाबू ठरलेले नाहीत. भाजपाला या दृष्टीनेही विचार करत पावले उचलावी लागणार आहेत. प्रसंगी नितीशकुमार यांना केवळ आमदारांच्या संख्याबळाचे नव्हे तर विकासाच्या रणनीतीचे पाठबळही भाजपाला द्यावे लागेल. नितीशकुमारांनी निवडणुकीची कसोटी पूर्ण केली. आता पुढच्या कसोट्यांच्या पूर्ततेसाठी जनता त्यांच्याएवढेच भाजपाकडेही पाहते आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# प्रांतवादाने घेतला युवकाचा बळी

**तुझी-माझी धाव आहे दातापासून दाताकडे**
**पिरॅमिडच्या दगडाखाली माझी छाती पिचली होती**
**रंगवलेली फिक्कट ममी तेव्हाच मला हंसली होती**

विंदा करंदीकरांची ही कविता. शोषित समाजाचे चित्र त्यांनी प्रतीकात्मकपणे मांडले होते. दात म्हणजे शोषण करणारे घटक. जे समाजात व्हाईट कॉलर म्हणून मिरवीत असतात. मात्र या कवितेत शोषणाची जाणीव तरी आहे. पण जगात असे अनेक समाज आहेत, त्यांना अजूनही शोषणाची जाणीव नाही. कुणीतरी आपलं शोषण करतंय हेच त्यांना ठावूक नाही. शोषण हे अनेक प्रकारचं असतं. जिहादी संस्कृती करत असलेलं बलात्काराने बाटवणारं शोषण, मानवाच्या गटाला पतीत मानून भेदभाव करणारं शोषण, भ्रष्टाचार करून लुबाडणारं शोषण, अस्मितेच्या नावाखाली जनतेला लढवून स्वतः मलई खाणारं शोषण... शोषणाची एक विशिष्ट परिभाषा करता येत नाही. मात्र एखाद्याला दुसऱ्या विरुद्ध भडकवून त्यांच्यात दंगल जुंपवणं हे देखील शोषणच आहे. अशा प्रकारचं शोषण जगभरात होत असतं. पण वर सांगितल्याप्रमाणे अनेकांना जाणीवच नसते की आपलं शोषण होत आहे. शोषण करताना ज्या समाजाचं शोषण होत असतं, त्या शोषणालाच गोड मानून स्टॉकहोल्म सिंड्रोमच्या आहारी गेल्यामुळे शोषण आनंदाने सहन करणारा समाजही अस्तित्वात असतो. त्यापैकी एक आपला मराठी समाज आहे, विशेषतः मुंबई, ठाणे, डोंबिवलीतील मराठी समाज. मराठी समाजाचा इतिहास देदीप्यमान आहे. आपल्याला ज्ञानदेवांपासून समर्थ-तुकोबांपर्यंत साहित्यिक संत लाभले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून स्वा. सावरकरांपर्यंत योद्धे लाभले. बाबासाहेब आंबेडकर प्रभृती समाजसेवकही लाभले. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व्यापक दृष्टिकोन ठेवणारं नेतृत्व मराठी माणसाला लाभलं नाही. देशाचं नेतृत्व करणाऱ्या, अटकेपार झेंडा फडकवणाऱ्या मराठी माणसाच्या वैचारिक सीमा आकुंचित झाल्या. मराठी माणूस जातिवादात गुंतला तसेच तो प्रांतवादातही गुरफटत गेला. याला खतपाणी मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांनी घातले. तसेच सभ्यतेचा बुरखा पांघरूण फिरणाऱ्या सो-कॉल्ड समाजसेवकांनीही यास पाठिंबा दिला. परिणामी अर्णव खैरेसारख्या जेन झी तरुणाची हत्या!

काय म्हणताय? तुम्हाला अर्णव खैरे माहिती नाही? कसा माहीत असणार? तो कोणत्याही स्टार कलाकारचा किंवा राजकीय नेत्याचा मुलगा नव्हता. 'युवा नेता' म्हणून त्याचे बॅनर कधी झळकले नव्हते किंवा कोणत्या तरी पक्षाचा झेंडा हाती घेऊन दारू पिऊन त्याने कधी तमाशा केला नव्हता. अर्णव हा १९ वर्षांचा तरुण होता. जग बघायला सुरुवात केली होती त्याने. मात्र त्याच्या घरच्यांनी जगाचं



सुंदर चित्र रंगवलं होतं, पण प्रत्यक्षात तो द्वेषाचा बळी ठरला आणि बळी घेणारे आपापल्या आलिशान बंगल्यात दोन ग्लास एकमेकांना आपटत घोट घेत आहेत. पण कसला घोट घेत आहेत? नरडीचा! मंगळवार १८ नोव्हेंबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे अर्णव खैरे अंबरनाथ-सीएसटी लोकलने कॉलेजकडे निघाला होता. त्याच्या डोळ्यांत शिक्षण पूर्ण करून सेटल होण्याची चिमणी स्वप्ने होती. मात्र प्रांतवेडाने पछाडलेले हिंस्र शिकारी या चिमण्या स्वप्नांचा वेध घेतील याची त्याला जाणीवही नव्हती. लोकलमध्ये गर्दी असल्यामुळे एका मुलाला तो हिंदीत म्हणाला, ''थोडं पुढे व्हा.'' अचानक अस्मितेचे कैवारी, योद्धे जागे झाले. या योद्ध्यांची गंमत अशी आहे की ते झुंडीत असतात. एकट्याने जाण्याची त्यांच्यात हिंमत नसावी. झुंडीचा फायदा घेत ते सावजाचा शिकार करतात. अचानक ४५ जणांच्या टोळक्याने अर्णववर झडप घातली. त्या टोळक्याने अर्णवला विचारलं, ''तू मराठी बोलत नाहीस का? मराठी बोलण्याची लाज वाटते का?'' अर्णव घाबरला. तोही मराठीच होता. मराठी माणूस होता. टोळक्याने अर्णवला बुक्क्यांनी मारहाण केली. अर्णवला मारहाण होत असताना आपल्या महान परंपरेप्रमाणे लोकलमधील बघ्यांपैकी कुणीही मध्यस्थी केली नाही. कारण त्यांचं मनोरंजन होत होतं. पण त्या कोवळ्या जीवाच्या शरीरावरच नव्हे तर मनावर आघात झाला होता. हा सारा प्रकार अर्णवने त्याच्या वडिलांना फोन करून सांगितला. अर्णव खूप घाबरला होता. जग इतकं वाईट असतं की आपली काहीही चूक नसताना आपल्यासोबत गलिच्छ प्रकार घडू शकतो, हे त्याला कळून चुकलं होतं. अर्णव खैरे घरी आला खरा. पण त्याने दार लावून घेतलं. ते अस्मितेचे कैवारी त्याचा पाठलाग करून त्याला मारतील या भीतीने तो ग्रासला होता. अखेर पंख्याला लटकून त्याने जीव दिला. आत्महत्या केली. पण ही आत्महत्या नव्हती तर हत्या होती. ही हत्या केवळ त्या टोळक्याने, त्या झुंडीने केली नाही. तर ही हत्या केली आहे त्या झुंडीला प्रेरणा देणाऱ्यांनी. प्रांतवादाचं विष मराठी माणसाच्या मनात कालवणाऱ्यांनी... नुकताच एका ३ वर्षांच्या लहान मुलीवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आला. अर्णवसोबत झाला तो सुद्धा बलात्कारच होता, मनावर केलेला बलात्कार. चिमुरडीवर बलात्कार करणाऱ्यामध्ये आणि त्या झुंडीमध्ये कोणताच भेद नाही. मानसिकताही तीच आहे.

आता अस्मितेच्या नावाने बोंबा मारणारे नेते, सो-कॉल्ड प्राध्यापक, समाजसेवक बाहेर पडणार नाहीत. त्यांचे कार्यकर्ते सोशल मीडियावर अपशब्दांची फुले उधळतील आणि रात्री पार्ट्या करत झिंगतील. पण अर्णव खैरेसारख्या अनेक मराठी मुलांचे काय? अर्णव खैरेसारखी लहान मुलं या अस्मितेचं राजकारण करणाऱ्यांसाठी बळी देण्याचे साधन आहेत. या राजकारणात अर्णव हलाल झाला. अशा अनेक मराठी मुलांच्या थडग्यांवर या लोकांनी महाल उभारले आहेत. हा रोख केवळ राजकीय नेत्यांवर नसून असे अनेक लोक जे सभ्यतेचा, प्राध्यापकीचा, मराठी अस्मितेचा चेहरा घेऊन फिरतात आणि समाजात द्वेष पसरवतात त्यांच्यावर देखील आहे. मराठी मुलांना उकसवणाऱ्या लोकांवर कारवाई झाली पाहिजे की नको? लोकलमधील ते जीव घेणारे लोक सापडतीलच. पण त्यांना प्रवृत्त करणाऱ्यांवर कारवाई होईल का? यांच्या राजकारणासाठी मराठी माणसांनी किती वर्षे हौतात्म्य पत्करायचं? यांची मुलं आपल्याला सुट-बुट घालून आलिशान गाड्यांतून फिरताना दिसतात ना? मग सामान्य मराठी माणसांच्या मुलांचं काय? अर्णव गेला, त्याच्यावर हल्ला करणाऱ्या टोळक्यांनाही अटक होईल. कारवाई होईल, शिक्षा होईल. म्हणजे हल्ला करणाऱ्या मराठी माणसांचेही नुकसानच झाले. ''मग फायदा कोणाचा झाला?'' ''कोणाचा फायदा झाला?'' हा प्रश्न जेव्हा तुम्हाला पडेल तेव्हा खऱ्या अर्थाने तुम्ही जागृत झालेले असाल. तोपर्यंत,

**चीनच्या त्या भींतीवरती बुरूजागणिक भूत आहे**
**दगडाच्याही अंगावरती पिळणुकीची लुत आहे**
**मला एक कळले आहे सुवर्णाच्या रथात बसून**
**सत्य येथून पळले आहे प्रत्येकाच्या छातीवरती**
**चाकोरीची खूण आहे जिकडे तिकडे मुकी धडे**
**इतिहासाला गेले तडे त्यांत नवीन काय घडे**
**मराठी माणसा, तुझी-माझी धाव आहे**
**दातापासून दाताकडे.**

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**अनिल फेकरीकर**

# आज नागपूर, उद्या कारपूर

लोकसंख्येचा स्फोट होत असल्याचे लक्षात येताच भारत सरकारने नसबंदीचा कार्यक्रम युद्धपातळीवर राबविणे सुरू केला होता. आजही एक किंवा दोन अपत्यानंतर नसबंदीसाठी दाम्पत्यांना आग्रह केला जातो. आता अशाच स्वरूपाची नसबंदीरूपी नियंत्रण वाहन विकण्यावर येणे काळाची गरज आहे. लोकांची गरज आहे म्हणून ते वाहने खरेदी करतात. पण वाहन ठेवायला जागाच नाही तरीही त्यांची खरेदी ही लोकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. नागपुरातील ही गंभीर समस्या आज अनेकांना जाणवू लागली आहे. म्हणूनच की काय आज नागपूर, उद्या कारपूर आणि परवा गुन्हेपूर व्हायला वेळ लागणार नाही. ही चिंता केवळ माझीच नाही तर पार्किंग समस्येवरून उद्भवलेल्या वादानंतर संबंधित पीडितांनाही जाणवू लागली आहे.

नागपूरची लोकसंख्या ३५ लाखांपेक्षा जास्त आहे. तर वाहनांची संख्या २४ लाखांपेक्षा जास्त झाली आहे. नागपुरात एमएच ३१, एमएच ४० आणि एमएच ४९ अशा स्वरूपात वाहनांची नोंदणी केली जाते. २०२२ मध्ये प्रतिदिन १९७ नवीन वाहनांची विक्री होत होती. २०२३ मध्ये ती संख्या २०३ पर्यंत गेली. २०२४ मध्ये ती वाढून २५० झाली. आता २०२५ मध्ये तो आकडा ५०० पेक्षा जास्त झाला आहे. मान्य आहे की, लोकांकडे खूप पैसा जमा झाला आहे. याचा अर्थ त्यांनी धडाक्यात वाहनांचीच खरेदी करावी काय? याचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल. 'खिशात नाही दमडी आणि खायला हवी कोंबडी' ही बाब माणसाला पदोपदी लागू पडते. मग कार किंवा इतर वाहनांची खरेदी करताना जागेचा मुद्दा लागू पडू नये का? पार्किंगचा मुद्दा प्रचंड गंभीर आहे. टोलेजंग घर असले तरी त्यात वाहने ठेवायला जागाच नसते. मग ती मंडळी दुसऱ्यांच्या घरापुढे वाहने ठेवतात. तिथेही जागा मिळाली नाही तर रस्त्यावर ठेवून मोकळे होतात. त्या वाहनांमुळे अपघात झाले तरी त्यांना त्याचे सोयरसुतक नसते. अशा लोकांच्या विरोधात संताप व्यक्त करण्यासाठी काही युवकांनी कारच्या काचा फोडण्याचा उद्योग सुरू केला होता. पण अशाने ही समस्या सुटणार नाही. कुणाचे नुकसान करून समस्येवर उपाय निघत नसतो. पार्किंगची जागा दाखवा नंतरच कार खरेदी करता येईल अशा स्वरूपाची कडक अंमलबजावणी व्हायला हवी. शिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तगडी करायला हवी. सहजतेने चोवीस तास जाणे येणे होईल अशी माफक व्यवस्था झाल्यास कोणीही वैयक्तिक कारला प्राधान्य देणार नाही. पण त्याकडे होणारे दुर्लक्ष आज नागपूरला गुन्हेपूरकडे ढकलत आहे. जेव्हा वाहतूक पोलिस 'नो पार्किंग'मध्ये लावलेल्या वाहनांच्या विरोधात कारवाई करतात तेव्हा होणाऱ्या वादविवादांचा एकदा प्रत्यक्ष अनुभव घ्या. संपूर्ण शहरात असे अनेक वाद होतात अन् लोकांना दंड भरून स्वतःची सुटका करून घ्यावी लागते. ज्यांना ठेच लागली ते काही दिवसांपुरते सुधरतात पण पुन्हा काही दिवसांनी 'ये रे माझ्या मागल्या'प्रमाणे वागतात. विस्कळीत झालेली वाहतूक आणि कार पार्किंग व्यवस्था या समस्या नागपुरात कुठल्याही क्षणी उद्रेक करू शकतात. त्याचे वेळीच समूळ उच्चाटन झाले तरच बरे होईल. अन्यथा झालेला उद्रेक शांत करणे प्रशासनासाठी वेगळी डोकेदुखी ठरू शकते. वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी अनेक उपक्रम सुरू असतात. पण त्यातून फायदा दिसतच नाही. उलट सुशिक्षित लोकांकडून कायद्याचे उल्लंघन वाढले आहे. कार खरेदीतही हीच मंडळी अग्रेसर आहेत. त्यांना रोखणे फार कठीण असले तरी अशक्य नाही. ऑटोमोबाईल उद्योगाची भरभराट व्हायला हवी. पण त्याकरिता लोकांचे जीव घेऊन किंवा लोकांना त्रास देता कामा नये. तसा विचार करता वाहन खरेदी करणाऱ्यांनीच आपली स्थिती समजून घ्यायला हवी. कायदा जरी केला तरी तो पालन करणाऱ्यांनी त्याचा मनापासून स्वीकार केल्यास लाभ होतो. अन्यथा कायदाही निरर्थक ठरतो. म्हणूनच कायद्याने आणि नागरिकांनी आपले नागपूर भविष्यात गुन्हेपूर होणार नाही याची काळजी घ्यावी. शेवटी, भारतात नागपूर आज हृदयस्थळ म्हणून गणले जाते. या हृदयस्थळाला जपणे सर्वांचे कर्तव्य आहे. तेव्हा आज नागपूर, उद्या कारपूर आणि परवा गुन्हेपूर होण्यापूर्वी शासनाने लोकसहभागातून यावर रामबाण तोडगा काढणे काळाची गरज आहे. जेव्हा हे होईल तेव्हाच नागपूर अधिक सुंदर होईल, नाही का?

९८२२४६८६६०

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# लाचारीची परिसीमा!

१९४८ ते १९६० या कालावधीत महाराष्ट्राने अनेक चढउतार बघितले. अनेक संकटे झेललीत. अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार राहिला. मुंबई महाराष्ट्राला जोडण्यासाठी मराठी माणसांनी केलेला एल्गार हा देखील महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पुस्तकातील एक सुवर्ण पान आहे. मुंबई महाराष्ट्राला हवी या मागणीसाठी अडून बसलेल्या मराठी आंदोलकांनी वेळप्रसंगी प्राणांची आहुती दिली. ''डंके की चोट पर...'' ताठ मानेने, स्वाभिमानाने ती मिळविली. पण कधीही लाचारी पत्करली नाही. मात्र, याच मुंबईला आम्ही मिळवलं, असा दावा करणाऱ्या उबाठा गटाची सत्तेसाठी चाललेली लाचारी बघितल्यावर, खरंच यांनी मुंबई मिळविण्यासाठी प्रयत्न केले असतील का? असा प्रश्न निर्माण होतो. कारण सत्तेसाठी कुठल्याही पातळीवर जाण्याचा यांचा मागील काळातला एकूणच प्रवास बघितल्यास ''लाचारीची परिसीमा'' काय असते, याची प्रचीती येते.

काल-परवा उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनी, एकनाथ शिंदेंच्या दिल्ली दौऱ्यावर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीवर ''अलिकडे तुम्ही बघितलं असाल, बाबा मला वाचवा करायला एक जण गेला दिल्लीला'', अशा शब्दांत खिल्ली उडविली. एवढ्यावर ते थांबले नाहीत तर, पुढे ते म्हणाले, ''योग्यवेळी चांगला गुरू मिळाला असता तर अशी लाचारीची वेळच आली नसती...'' मुळात १९८० पासून २०२२ पर्यंत एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांच्या शिवसेनेत होते. त्यांचे पहिले गुरू हे आनंद दिघे आणि श्रद्धास्थान स्व. बाळासाहेब ठाकरे होते. या दोघांच्या मार्गदर्शनात एकनाथ शिंदे नावाचा हिरा महाराष्ट्राच्या राजकारणात उदयास आला. आणि सध्या अवघ्या ३ वर्षांपासून त्यांचा भाजपासोबत स्वतंत्र सहवास आहे. अर्थात यापूर्वी ते भाजपाच्या सहवासात नव्हते अशातला भाग नाही. कारण १९८९ साली भाजपा आणि शिवसेना युती झाली. त्यावेळी एकनाथ शिंदे हे शिवसेनेत कार्यरत होते. १९९७ साली ते शिवसेनेचे नगरसेवक होते. नंतर ठाणे महानगर पालिकेचे सभापती झाले. २००४ मध्ये बाळासाहेबांनी शिंदेंना विधानसभा लढविण्यासाठी निवडले. त्यानंतर ते सातत्याने २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ असे सलग शिवसेनेच्या चिन्हावर भाजपा सोबतच्या युतीत विजयी होत आले. एवढेच नव्हे तर, २०१४ ला ते देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळात मंत्रीदेखील होते. त्यामुळे शिंदे आता आता अलिकडे भाजपाच्या सहवासात



आले आहेत. त्यामुळे ते दिल्लीला मुजरा करायला जात आहेत, असा कुणाचा समज असल्यास त्याच्या राजकीय विवेकावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्याही पलीकडे जाऊन गंभीर विषय तर वेगळाच राहिला... १९८० ते २०१२ या काळात एकनाथ शिंदे यांचे गुरू-मार्गदर्शक राहिलेले आनंद दिघे असोत किंवा मग दस्तुरखुद्द बाळासाहेब ठाकरे असोत हे योग्य गुरू नव्हते असे उद्धव ठाकरेंना म्हणायचे आहे का? उद्धव ठाकरे हे ज्यांच्या वारसामुळे नेते आणि पक्षप्रमुख आहेत, त्या बाळासाहेब ठाकरेंनी आपल्या मार्गदर्शनात एकनाथ शिंदेंना नगरसेवकापासून तर विधानसभा सदस्यापर्यंत पोहचविले. त्यांचे मार्गदर्शन योग्य नव्हते किंवा त्यांची निवड योग्य नव्हती असा संदेश उद्धव ठाकरेंना या महाराष्ट्राला द्यायचा आहे का? आणि मुळात ३२-३५ वर्षे ज्यांच्या सहवासात आणि मार्गदर्शनात एकाला तयार केले, त्यांच्या संस्कारात तो संघटनेत वाढला, ते बाळासाहेबांचे संस्कार चुकीचे होते, असा अर्थबोध यातून काढावा असे उद्धव यांना अपेक्षित आहे का? हे एकदाचं उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं पाहिजे.

बरं देशातल्या कोणत्याही राज्यातला उपमुख्यमंत्री दिल्लीला गेला आणि देशाच्या गृहमंत्र्यांना भेटला तर तो आपल्या राज्याच्या हिताच्या दृष्टीने काही गोष्टींचे सहकार्य मागायला जाऊ शकत नाही? तो मुजरा करायलाच जाणार कशावरून? हा उद्धव ठाकरेंना ती लाचारी आणि मुजरा करायला गेला असं वाटू शकतं... कारण ठाकरे जेव्हा महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री होते, तेव्हा ते आपलं मुख्यमंत्रिपद कायम ठेवायला दिल्लीच्या आपल्या राजमातांना मुजरा करायला जायचे. एवढेच नव्हे तर, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीवेळी मला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करा, अशी भीक मागायला देखील दोन ते तीन वेळा आपल्या युवराजासोबत दिल्लीला गेले होते. ते या नेत्यांकडून त्या नेत्यांकडे चपला झिजवताना अवघ्या महाराष्ट्राने बघितले. पण रिकाम्या हाताने परतावे लागले होते. मग उद्धवजींनी केलेल्या वक्तव्याच्या त्याच न्यायाने हा सगळा घटनाक्रम बघितल्यास याला देखील लाचारी म्हणायची की त्यांच्या शब्दकोशात काही वेगळा शब्द आहे?

बरं बाळासाहेब होते तेव्हा त्यांना भेटायला राष्ट्रीय नेते त्यांच्या निवासस्थानी यायचे. आता काँग्रेसचा कोणताही नेता उद्धव ठाकरेंना भेटायला त्यांच्या निवासस्थानी जात नाही. राहुल गांधी बाळासाहेबांना श्रद्धांजली, आदरांजली वाहत नाही, स्वातंत्र्यवीर सावरकर आमचे श्रद्धास्थान आहे म्हणणारे, त्याच सावरकारांचा वारंवार अवमान करणाऱ्या राहुल गांधींच्या मांडीला मांडी लावून बसतात, हिंदुत्व आम्ही सोडलं नाही म्हणताना, हिंदू धर्म कोरोना आहे, कॅन्सर आहे म्हणाऱ्यांसोबत सलगी करतात, आता आता अलिकडे मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा कपोलकल्पित दावा करत, भाजपासोबत न जाण्याचे आवाहन करताना, ज्या काँग्रेसने खऱ्या अर्थाने मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा प्रयत्न केला, मराठी बांधवांवर बेछूट गोळीबार केला, त्यांच्यासोबत लोकसभा, विधानसभेत तर आघाडी केलीच, मात्र मुंबई महापालिका निवडणुकीत पुन्हा आघाडी करायला लोटांगण घालताना हे दिसत आहेत. या दोगल्या भूमिकेमुळे यांचा खरा चेहरा उघडा पडला आहे. यावेळी मुंबई महापालिका निवडणूक काँग्रेसने स्वबळावर लढविण्याचे जाहीर करून टाकले आणि ठाकरे, त्यांचे शिलेदार, त्यांच्या घरचे मुखपत्र हे आघाडी करा, आघाडी करा अशी काँग्रेसकडे रोज भीक मागताना दिसत आहेत. या सगळ्याला काय म्हणायचे... स्वाभिमान की लाचारी!... ''लाचारी में हर व्यक्ति सिधाही होता है, असली चेहरा देखना हो तो उसे कुछ वक्त ताकत, सत्ता, शौहरत सौपकर देखो...'' ही शायरी उद्धव ठाकरेंच्याबाबतीत तंतोतंत लागू झालीय्... त्यामुळे मुंबई, महाराष्ट्राच्या जनतेला यांचा खरा चेहरा आता दिसू लागल्याने, यांनी कितीही मुखवटे बदलवले तरी, लाचारीशिवाय दुसरे काहीही पदरात पडणार नाही, एवढे मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

---

## आजचे संघगीत-९०

शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५

### समाज पुरुषा होई जागृत

समाज पुरुषा होई जागृत ॥धृ.॥

या पृथ्वीच्या पावन पृष्ठी व्यक्तिहूनी अतिश्रेष्ठ समष्टी ।
तूच समष्टी तुझीच सृष्टी तूच कासया होसी निद्रित? ॥१॥

हिंदू तितुका तुझाच अवयव संघशक्ति तव समता सौष्ठव ।
विशालता ती जगास दाखव गती घेउ दे तुझा धर्मरथ ॥२॥

वेद श्रुति हे तव मुखमंडळ इतिहासाची तुला प्रभावळ ।
अजिंक्य केवळ तुझे तपोबळ भीति घालशिल तूच भयाप्रत ॥३॥

तू निजल्याने निजली नीती योद्ध्याहून दो बळी सारथी ।
भारतीयता नुरे भारती ऊठ शाप क्रोधे तू परमत ॥४॥

मोहमूढ तू रणात अर्जुन गीता सांगे माधव गर्जुन ।
कार्य करी तू फळास वर्जुन कुरुतीर्थासी करण्या पूनित ॥५॥

उरी शूरता करात गीता चाल विशाला उभवित माथा ।
अवघ्या विश्वा आण आर्यता ठायी ठायी ध्वजा उभारित ॥६॥

उघड आपुले सहस्र लोचन उठव मानसी निद्रित 'मी' पण ।
टाक तमासी तेजे जाळुन आत्मोद्धारा घेई नव व्रत ॥७॥

---

### भटक्या कुत्र्यांच्या नियोजनासाठी योग्य पद्धत असावी

नागपूर शहरातील भटक्या कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. अलिकडेच घडलेली एक घटना तर नागरिकांच्या सुरक्षेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करते. भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी आमच्या भागात २० ते २५ वयोगटातील काही तरुण ३-४ दुचाकींवर डबलसीट बसून, हातात जाळी घेऊन, मोठ्या वेगात कुत्र्यांचा पाठलाग करत असल्याचे दिसले. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत धोकादायक व असंवेदनशील होती. कुत्र्यांना जाळ्यात अडकवण्याच्या प्रयत्नात ती प्रचंड घाबरली होती, चवताळून इकडे-तिकडे पळू लागली. त्यांच्यामागे मुलांनी भरधाव वेगात गाड्या चालवल्याने अशा परिस्थितीत अपघाताची शक्यता असते. कारण रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना यातील काहीच माहिती नव्हती. घाबरलेले कुत्रे कुणावर हल्ला करण्याची भीती असते, तसेच ते कोणाच्या घरात घुसण्याचा धोका असतो. जग आज कितीही प्रगत झाले असले, तरी अशा अघोरी, जीवघेण्या व अव्यवस्थित पद्धती आजही वापरात असल्याचे चित्र अतिशय खेदजनक आहे. महानगरपालिकेने अशा मोहिमांबद्दल कोणतीही पूर्वकल्पना नागरिकांना न देणे, तसेच प्रशिक्षित पथकाऐवजी अशा असुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे हे नक्कीच प्रश्न निर्माण करणारे आहे. नागपूरसारख्या महानगरात असे बेछूट, धोकादायक प्रकार घडत असल्यास नागरिकांमध्ये भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. मनपा प्रशासनाने तातडीने या विषयावर अभ्यास करून वैज्ञानिक, सुरक्षित व मानवीय उपाययोजना राबवाव्यात, ही सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

## वाचक पत्रे

### निरोगी व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रक्रिया!

जीवन वाचवणारा, जीवन जगण्याची आशा देणारा आणि मानवतेची सेवा करणारा सर्वोच्च असा व्यवसाय करणाऱ्यांना देवमाणूस असे म्हटले जाते. व्यक्ती मरणासन्न स्थितीत असताना त्याच्यावर योग्य उपचार करून रुग्णाला जीवनदान देणारे डॉक्टर देवमाणूसच आहेत. असे असताना वैद्यकीय क्षेत्रातील गैरप्रकार जेव्हा उघडकीस येतात, तेव्हा मनात भीती निर्माण होते. नुकताच गुजरात येथे झालेला एक गंभीर गैरप्रकार उघडकीस आला आहे. येथील 'जेसीसी हार्ट इन्स्टिट्यूट'ने चक्क ८०० निरोगी व्यक्तीच्या हृदयाची शस्त्रक्रिया करून त्यांच्या हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत स्टेंट म्हणजे नळी घातली आहे. हे कशासाठी केले, तर 'प्रधानमंत्री जनआरोग्य योजने'तून मिळणारे पैसे कमावण्यासाठी म्हणजेच स्वतःचे खिसे भरण्यासाठी निरोगी व्यक्तींच्या शरीराशी असा नीच खेळ खेळला गेला. २-३ नव्हे, तर शेकडो व्यक्तींवर अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या प्रकरणामुळे चाचणी करणारे, अहवाल देणारे, तसेच संपूर्ण वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आतापर्यंत डॉक्टरांनी अनावश्यक चाचण्या करण्यास सांगितल्या, महागडी औषधे दिली, अतिरिक्त शुल्क आकारले आणि कमी अधिक प्रमाणात अनावश्यक शस्त्रक्रिया करण्यास सांगितले, अशा घटना घडत होत्या. मात्र गुजरातमधील घटनेने वैद्यकीय क्षेत्राला काळिमा फासला आहे. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची समिती नेमणे, त्यांनी शंकास्पद रुग्णालयांना अचानक भेटी देणे, तेथील व्यवस्था आणि चाचण्यांची कागदपत्रे तपासणे अत्यावश्यक आहे. तसेच वैद्यकीय शिक्षणात प्रवेश देताना केवळ परीक्षेतील गुण हा एकमेव निकष न ठेवता, नीतिमत्ता आणि चांगले आचरण हे निकषही असायला हवेत.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## आ. अभिजित वंजारी यांची ग्रंथालय कर्मचारी संघटनेने घेतली भेट

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी ११ डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात ग्रंथालय कर्मचारी यांना किमान वेतन दरमाह त्यांच्या खात्यात जमा करावे या इतर मागण्या बाबत माजी मंत्री आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार व आ.अभिजित वंजारी यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात येणार आहे त्यासाठी त्यांनी ग्रंथालय कर्मचारी यांचे पालकत्व स्वीकारून मोर्चाचे नेतृत्व करावे यासाठी आ.अभिजित वंजारी यांच्या दत्त नगर नागपूर येथील ऑफिस मध्ये निवेदन देऊन चर्चा केली मी केलेल्या विनंतीला होकार दिला असल्याचे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे यावेळी त्यांच्या शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला यावेळी सदाशिव बेडगे, डॉ. रमेश जनबंधू, नथू वहाने,विदर्भ सार्वजनिक ग्रंथालय परिषदेचे समन्वय राजू मासूरकर उपस्थित होते.

## सोलापूर-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसला दौंड स्थानकावर अतिरिक्त थांबा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेने सोलापूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई वंदे भारत एक्सप्रेसला दौंड स्थानकावर अतिरिक्त थांबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे अशी माहिती सोलापूर रेल्वे विभागाच्यावतीने देण्यात आली.

ट्रेन क्रमांक २२२२६ सोलापूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई वंदे भारत एक्सप्रेस २४ नोव्हेंबर पासून लागू होणार आहे. दौंड येथे सकाळी ०८:०८ वाजता आगमन होईल तर सकाळी ०८:१० वाजता प्रस्थान होईल. ट्रेन क्रमांक २२२२५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-सोलापूर वंदे भारत एक्सप्रेस २४ नोव्हेंबर पासून लागू होणार आहे. दौंड येथे रात्री ०८:१३ वाजता आगमन होईल तर रात्री ०८:१५ वाजता प्रस्थान होईल. रचनेमध्ये आणि इतर थांब्यांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेले नाही. सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी प्रवाशांना नवीन थांबा सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## विद्यार्थ्यांना आमंत्रित करत सीडीएसएलने केली आयडीयाथॉनची सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

आशियातील पहिली सूचीबद्ध डिपॉझिटरी आणि १६.७ कोटींहून अधिक डी-मॅट खात्यांची विश्वासार्ह संरक्षक असलेली सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडने (''सीडीएसएल'') विद्यार्थ्यांसाठी एक नवीन आव्हानात्मक उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी पहिले आयडीयाथॉन लॉंच केले आहे. सीडीएसएलच्या वार्षिक रीइमॅजिन चर्चासत्राच्या तिसऱ्या आवृत्तीअंतर्गत पुनर्कल्पना आयडीयाथॉन हा उपक्रम राबवण्यात येत आहे.२१ कोटींहून अधिक गुंतवणूकदारांच्या डीमॅट खात्यांच्या मालमत्तेचे डिपॉझिटरी संरक्षण इकोसिस्टम करते. आपले भविष्य घडवण्याच्या या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना आमंत्रित करतो,असे नेहल व्होरा, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सीडीएसएल म्हणाले. आयडीयाथॉनमध्ये नावीन्य आणि सर्जनशीलतेसाठी एकूण ११.५ लाखांचे बक्षीस दिले जाईल. विजेत्या कल्पनेसाठी ५ लाख, उपविजेत्यांना ३ लाख आणि २ लाख तर चौथ्या आणि पाचव्या स्थानासाठी प्रत्येकी ७५ हजार अशी बक्षिसे दिली जातील.

आयडीयाथॉन २०२५ साठी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नोंदणी खुली होईल. एका संघात चार विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक (एकाच संस्थेतील) सहभागी होऊ शकतात. प्रॉब्लेम स्टेटमेंट, मूल्यमापन आणि टाइमलाइनसंबंधातील अधिक तपशील https://ideathon.cdslindia.com/ येथे उपलब्ध आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/28. वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वे ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नाव: इलेक्ट्रिकल कामाचा TRD भाग 1) सोलापूर विभागात ट्रामवे OHe चे पारंपारिक OHe मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव. 2) वाडी यार्ड - NRD लाईन्ससाठी CSL वाढवण्यासाठी सोलापूरच्या टोकाकडे 40 मीटरने पॉइंट आणि स्टार्टर सिग्नल हलवणे. अंदाजे किंमत: 2,79,90,701.48. बोली सुरक्षा: 2,90,000/-. पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 23.12.2025 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-76
**तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.**

# महापालिका निवडणूक प्रारुप मतदार यादीवर एकूण ६ हरकती प्राप्त

## नावे दुबार किंवा त्यापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आल्यास सूचना करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर महापालिका निवडणूक कार्यालयाकडे आज दिवसभरात एकूण सहा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/ग्रापनि२०२३/प्र.क्र. ०३/का-८, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ च्यानुसार मुळ विधानसभा मतदार यादीत राज्य निवडणूक आयोग यांनी अधिसुचति केलेली दि.१ जुलै २०२५ या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादी) नसलेले कोणतेही नवीन नाव समाविष्ठ करण्याचे अथवा सदर विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे तसेच यामध्ये कोणतेही नवीन नाव समाविष्ठ करण्याचे अथवा सदर विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे तसेच यामध्ये कोणतेही दुरूस्ती करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाची मतदार यादी तयार करण्याकरीता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत.

राज्य निवडूणक आयोगाकडून प्राप्त संभाव्य दुबार मतदारनुसार काही नावे दुबार किंवा त्यापेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आल्यास स्वतः मतदार आणि इतर मतदार यांनी सोलापूर महानगरपालिकेस लेखी स्वरुपात अवगत करणेबाबत प्राधिकृत अधिकारी सोलापूर महानगरपालिका यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे. याबाबत सर्वेक्षण व खात्री अंती प्रभाग निहाय दुबार मतदारची यादी मतदान केंद्राध्यक्षकडे देण्यात येईल.



प्रसिध्द प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२० ते २७ नोव्हेंबर २०२५ अखेरच्या कालावधीत नमूद कारणाकरीता हरकती / सूचना महापालिका निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय. सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नांवे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ठ करणे या संदर्भात सूचना करावे.

**तर गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष /सचिव यांच्यामार्फत अर्ज करावा**

आयोगाच्या निर्देशानुसार एकाच सहकरी गृहनिर्माण संस्थेत राहणाऱ्या एकापेक्षा अधिक मतदारांचे सोबतच्या नमुना अ मधील अर्ज त्या संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांच्यामार्फत, त्या संस्थेच्या लेटर हेड वर, संबंधित सचिव किंवा अध्यक्षाच्या स्वाक्षरीने अर्ज सादर करता येईल. हरकत अर्जाचा नमुना निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय. सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**हरकतीचे स्वरूप याप्रमाणे (यामध्ये प्रभाग क्रमांक, हरकतदाराचे नाव आणि कंसात हरकतीचे स्वरुप)**

गुरुवार दि. २० नोव्हेंबर रोजी एकही हरकत आली नव्हती. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी एकूण ६ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयात प्राप्त झालेल्या आहेत. प्रभाग क्रमांक २० - नुरुद्दीन उस्मान मुल्ला (मतदार यादीतून नांव कमी करणेबाबत), प्रभाग २५ - पाटील धारेश्वर सुभाष (प्रभाग क्र.२५ मधून प्रभाग क्र. २४ मध्ये समाविष्ट करणेबाबत), प्रभाग २५ - पाटील सुगलाबाई सुभाष((प्रभाग क्र. २५ मधून प्रभाग क्र.२४ मध्ये समाविष्ट करणेबाबत), प्रभाग ११ - (रियाज) अहमद कासीम मोमीन (प्रभाग यादीतील प्रभाग यादी येत नसल्याने दुरूस्ती करून मिळणेबाबत), प्रभाग २६ - रोहीत मुकुंद तडवळकर (प्रभाग क्र. २६ मधून प्रभाग क्र.२४ मध्ये समाविष्ट करणेबाबत.), प्रभाग १२ - श्रीकांत रामलू कोंडा (प्रभाग क्र. १२ मधून प्रभाग क्र. १० मध्ये समाविष्ट करणेबाबत).



**६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा**

**सोलापूर :** सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत हुतात्मा स्मृती मंदिरात शुक्रवारी सायंकाळी अस्तित्व मेकर्स फाउंडेशनने दोन अंकी ''इश्क का परचा'' नाटकाचे सादरीकरण केले. या नाटकास प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

### जाहीर समन्स

रे.मु.नं. १४७/१९९८
निशाण क्र. १६६

**मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मा.श्रीमती पी.एस.गोवेकर साहेब)**

लक्ष्मण निवृत्ती बाबर ---वादी
विरूद्ध
अशोक मारुती नरळे ---प्रतिवादी
वगैरे २
प्रति-
२इ) सारिका सोमनाथ कदम, वय-२२ वर्षे,
धंदा- शेती, रा. कासारवाडी, ता. बार्शी
२फ) तनुजा सौरभ चौगुले, वय-२० वर्षे
धंदा- शेती, रा. चौगुले वस्ती, मुंढेवाडी

ज्याअर्थी उपरोक्त वादी यांनी तुमच्या विरूद्ध निरंतर ताकीदीचा दावा या न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २४/१२/२०२५ रोजी मध्यान्ही ११-०० वाजता या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला बोलावण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रूजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

सदर समन्स प्रसिद्ध होऊनही आपण गैरहजर राहील्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी. हे जाहीर समन्स आज रोजी माझे सहीनिशी प्रसिद्ध केले असे. आजची ता.१९/११/२०२५.

लिपीक (कोर्टाचा शिक्का)
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर मोहोळ

### जाहीर/नोटीस

रे.मु.नं. ४२१/२०१२
निशाण क्र. ३५

**मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मा.श्री. एस.व्ही.मुंडे साहेब)**

भजनदास अंबऋषी खरात, वगैरे २ ---वादी
विरूद्ध
भागवत रामचंद्र खरात, वगैरे ७ ---प्रतिवादी

तमाम लोकांस विशेषतः मौजे वाळूज ता. मोहोळ, जि. सोलापूर व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मौजे वाळूज येथील भागवत रामचंद्र खरात, अमोल भागवत खरात, अजित भागवत खरात, अविनाश भागवत खरात, अविंदाबाई भागवत खरात, नवनाथ रामचंद्र खरात, गणेश नवनाथ खरात यांच्या विरूद्ध मौजे वाळूज, ता. मोहोळ येथील गट नं. ५१४ व ५१५ या मिळकतीमधुन असलेल्या पाऊलवाटेवरून जनावरे, बैलगाडी, ट्रॅक्टर, ट्रक अगर तत्सम वाहनांनी ने-आण करू नये अगर दावा मिळकतीमधून गाडी रस्ता तयार करू नये अशा प्रकारे प्रतिवादींच्या विरूद्ध निरंतरची ताकीद देवविण्याचा दावा वादी- भजनदास अंबऋषी खरात यांचे मौजे वाळूज, ता. मोहोळ येथील गट नं. ५१४ व ५१५ या मिळकतीमधुन असलेल्या पाऊलवाटेवरून जनावरे, बैलगाडी, ट्रॅक्टर, ट्रक अगर तत्सम वाहनांची ने-आण करू नये अगर दावा मिळकतीमधून गाडी रस्ता तयार करू नये अशा प्रकारे प्रतिवादींच्या विरूद्ध निरंतरची ताकीद देवविण्याचा दावा मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर मोहोळ, यांच्या कोर्टात दाखल केला आहे. तरी त्याचा क्रमांक रे.मु.नं. ४२१/२०१२ असा आहे. ज्याचा हक्क हितसंबंध आहे व त्यात त्यांना म्हणणे मांडावयाचे असल्यास अथवा हरकत असल्यास त्यांनी स्वतः अथवा वकीलामार्फत मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, मोहोळ यांचे कोर्टात ही नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपले म्हणणे अथवा हरकत लेखी स्वरूपात मांडावी. अन्यथा मे. कोर्ट पुढील योग्य तो आदेश करेल याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस मे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे प्रसिद्ध केली आहे.

हे जाहीर नोटीस आज रोजी माझे सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे १९/११/२०२५.

लिपीक (कोर्टाचा शिक्का)
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर मोहोळ**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर यांनी राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर मागवले आहेत. ई-टेंडर सूचना क्रमांक: 15-2025-SrDENCo. कामाचे नाव: सोलापूर विभागातील SUR-वाडी विभागात कंत्राटी PQRS मशीनद्वारे CTR(P)/TSR(P)-47.0 Km काम. कामाची अंदाजे किंमत: रू. 15,26,59,084.43. बयाणा रक्कम 9,13,300/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: १२ महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 15-2025-SrDENCO - 12/12/2025 दुपारी 3.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 15-2025-SrDENCO - 12/12/2025 दुपारी 3.30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-78
**तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**स्थानकांवर केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) चा करार**

लातूर स्टेशनवर महिलांसाठी राखीव असलेल्या केटरिंग स्टॉल्स (चहा स्टॉल्स) च्या काम काजासाठी करार वाटपासाठी ई-लिलाव सोलापूर विभागातील कलबुर्गी आणि सोलापूर स्टेशनवर दोन-पॅकेट प्रणाली अंतर्गत आणि एमपीएस स्टॉल्ससाठी ई-लिलाव. (1) लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-C-CATG-LUR-4G-RE5. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: बंद-दुपारी 14.00 11.12.2025. स्थानकांचे नाव: लातूर येथील चहाच्या स्टॉलच्या वाटपासाठी ई-लिलाव (महिलांसाठी राखीव श्रेणी). पद्धत: IREPS द्वारे प्रक्रिया केली जाणारी दोन-पॅकेट प्रणाली अंतर्गत ई-लिलाव. (2) लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-MPS-2025-5. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: प्रारंभ- दुपारी 12.00 08.12.2025. बंद 12.40 08.12.2025. स्थानकांचे नाव: कलबुर्गी आणि सोलापूर स्थानकावरील MPS स्टॉल्सचा ई-लिलाव. पद्धत: ireps ई-लिलाव (लीज मॉड्यूल) द्वारे ई-लिलाव. निविदेचा कालावधी: वरील सर्व निविदा वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह 5 वर्षे. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव तपशील संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल www.ireps.gov वर उपलब्ध आहेत. सहभागींनी अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट द्यावी अशी विनंती.

**एसीएम/वस्तू/सोलापूर**
Akar/Sur-79
**तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-टेंडर मागवले आहेत. ई-टेंडर सूचना क्रमांक: 44-2025-SrDENC कामाचे नाव: 1-ADEN/BG/KWV अंतर्गत KEM (प्रकार-11 04 युनिट्स), JEUR (प्रकार-2 04 युनिट्स) BLNI (प्रकार-2 04 युनिट्स) आणि WSB (प्रकार-2 04 युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. 2- ADEN/PVR आणि ADEN/LUR अंतर्गत SGRE (प्रकार-2 04 युनिट्स), JTRD (प्रकार-2 04 युनिट्स), ARAG (प्रकार-2 4 युनिट्स), YSI (प्रकार-2 02 युनिट्स) आणि DKY (प्रकार-2 02 युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. 3- DEN/W/SUR उपविभागांतर्गत SUR (प्रकार-III 04 युनिट्स आणि प्रकार-खत ०२ युनिट्स), DEN/LUR उपविभागांतर्गत PJR (प्रकार-II ०४ युनिट्स) आणि YSI (प्रकारपेल 02 युनिट्स) येथे जुन्या क्वार्टर्सच्या जागी क्वार्टर्सचे बांधकाम. अंदाजे किंमत 9,02,55,439.70. बयाणा रक्कम : 6,01,300/- कामाचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 24 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 12/12/2025 दुपारी 3.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 12/12/2025 दुपारी 3.30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. पूर्णता वेबसाइट: www.ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-75
**तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/26. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. कामाचे नाव: टिकेकरवाडी (फेज-1) येथील प्रस्तावित कोचिंग मेंटेनन्स डेपोशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल ढठऊ भाग. अंदाजे किंमत: 5,62,96,465.20. बोली सुरक्षा: 4,31,500/-. पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 15.12.2025 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-77
**तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा**

### जाहीर/नोटीस

**ॲड. काकासाहेब दत्तु गुंड (लाडोळेकर) यांनी दिनांक ३१.१०.२०२५ रोजी दिलेल्या जाहीर प्रगटनास आक्षेप**

तमाम लोकांस विशेषतः शहर म्युनिसिपल हद्दीतील व बार्शी तालुका परिसरातील लोकांना दिनांक : ३१.१०.२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीशीस माझे अशिल नामे मिनाज इकबाल बागवान यांचा तिव्र आक्षेप असून सदरची मिळकत ही माझे अशिल यांची वडीलोपार्जित मिळकत असून जिल्हा सोलापूर तालुका बार्शी पैकी शहर बार्शी महानगर पालिका हद्दीतील मिळकत याचा सिटीसर्व्हे नंबर ३०७३/+४२९३/+४२९४/२-ब यापैकी उत्तरेकडील बाजुचे क्षेत्र ४६.६ चौ.मी. आहे. यामध्ये कच्चे स्वरूपाचे बांधकाम यासह जागा याची चतु:सिमा पुर्वेस:बोळ रस्ता, दक्षिणेस सिटीसर्व्हे नंबर ३०७३ पैकी इम्तीयाज तांबोळी यांची जागा, पश्चिमेस: गल्ली बोळ रस्ता, उत्तरेस: सलिम बागवान यांची वगैरे सर्व तंगदभूत वस्तू व वहीवाटीच्या हक्कासह वर दिलेली मिळकत ही आमचे अशलि यांच्या आजोबाची अब्बास ईस्माईल बागवान यांची वडीलोपार्जित मिळकत होती. तरी माझ्या अशिलाचा वरील मिळकतीमध्ये असलेला वडीलोपार्जित हिस्सा डावलून रहीम अब्बास बागवान, अस्लम अब्बास बागवान, शरीफा अल्लाउद्दिन बागवान, हमीद अल्लाउद्दिन बागवान, समीर उल्लाद्दिन बागवान, शमशाद महेबूब बागवान, इम्रान महेबूब बागवना, रा. बार्शी वरील मिळकतीचे तसे माझ्या अशिलाच्या कब्जेवाटेस असलेली मिळकत विक्रीस काढलेली आहे सदरची मिळकत ही माझ्या अशिलाची वडीलोपार्जित मिळकत असल्याने तसेच माझ्या अशिलाचा हिस्सा डावलण्याच्या हेतून व माझ्या अशिलास अंधारात ठेवून परस्पर व्यवहार करण्याच्या तयारीत असल्याने सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर असून नमूद व्यक्तीसोबत कुठल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, व्यवहार हा बेकायदेशीर असून नमूद व्यक्तीसोबत कुठल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, बक्षिस, अथवा मिळकतीचे हस्तांतर होईल असा कुठलाही दस्त नोंद करू नये व व्यवहार करू नये. याउपरही कुठल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास व मिळकतीमध्ये त्रयस्थ हक्क निर्माण केल्यास तो माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. माझे पक्षकार हे वडीलोपार्जित नमुद मिळकतीमध्ये त्यांचे वारसाचे वाटणीसाठी हिश्यासाठी लवकरच दिवाणी दावा दाखल करणार आहे. वास्तवीक सदरील मिळकत ही वारसाचे वाटणीसाठी वारसामध्ये विवादीत असल्याने कुठल्याही व्यवहारास पात्र नाही याची गांभीर्यपुर्वक नोंद घ्यावी करीता जाहीर आक्षेप दिनांक २१/११/२०२५.

**सही/-**
जाहीर आक्षेप देणारा/मार्फत
**ॲड. आप्पासाहेब जे. नागोडे**
**हायकोर्ट, छ. संभाजीनगर**
सेक्टर ४१, गट नंबर २००, प्लॉट नंबर ८४,
शेंद्र जहांगीर ता. जि. छ. संभाजीनगर
मो. नं. ७७२१०६७१३१/९५७९४३३७५५

### महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

(महाराष्ट्र शासन अंगिकृत व्यवसाय)

**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, सोलापूर**

सिंचन भवन, गुरूनानक चौक, सोलापूर क्लब जवळ, सोलापूर.
दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२७३२८५५ Email-eemid1solapur@gmail.com

**ई-निविदा सुचना क्रमांक. ०२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सोलापूर हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या वतीने सक्षम कंत्राटदाराकडुन खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवण्यात येत आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची अंदाजित रक्कम रु.लक्ष (वस्तु व सेवाकर वगळून) |
|---|---|---|---|
| १. | मौजे बेगमपूर ता. मोहोळ जि. सोलापूर येथील न्यु इंग्लीश स्कूल व ज्यु. कॉलेज जवळ भीमा नदीच्या तिरावर संरक्षक भिंत व घाट पायऱ्या बांधणे. | सोलापूर | ७६.५८ |

ई-निविदा उपलब्ध कालावधीः- **दि. २६-११-२०२५ ते दि. ०३-१२-२०२५**
ई-निविदा उघडणे:- दि. ०४-१२-२०२५ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे खालील संकेतस्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. ई-निविदा संबंधी काही अतिरिक्त माहितीसाठी वरील संकेतस्थळावर तसेच संबंधीत हेल्पकोड २४/७ फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
२. निविदा सुचनेबाबतची सविस्तर माहिती व इतर माहितीसाठी खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. व सदर नोटीसमध्ये काही बदल झाल्यास खालील संकेतस्थळावर सूचित करण्यात येईल.

Portal:https://mahatenders.gov.in

**विमाका/पुणे/जाहि./२३३/२०१५-२६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**लघु पाटबंधारे विभाग क्र.१,**
**सोलापूर.**

### दि. ०१.११.२०२५ रोजीच्या पान नं. ७ वरील दुरुस्ती

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**
५०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन ०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे जाहीर लिलाव व विक्री नोटीस**

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचे वर्णन | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | *** राखीव किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीशैल शरणाप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता. उत्तर सोलापूर, सोमपा हद्दीमधील सर्व्हे न. १५/२. सि.स. नं.६३० सी, पैकी प्लॉट नं. १३, गौरी रेसिडेन्सी, तळमजला, फ्लॅट न. २ चटई क्षेत्र ४९.१८ चौ.मी. व बिल्ट अप ५८.४२ चौ.मी (उताऱ्याप्रमाणे सुपर बिल्ट अप क्षेत्र ५२.२ चौ.मी) | | साईड मार्जिन | स्टेअर केस व लिफ्ट | साईड मार्जिन | रिअर मार्जिन | रु. २२,००,०००/- |
| श्रीशैल शरणाप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे मुळेगांव, धवल नगर, गट नं. १०६/अ+ब/३ (ऑनलाईन उतारा प्रमाणे गट नं. १०६/अ/ब/३) | प्लॉट नं.१३०, क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३१ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १२९ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३२, क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३२ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३१ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३३, क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३४ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३२ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३४ क्षेत्र ९२.८१ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३५ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३३ | रु. २,९०,०००/- |
| | | प्लॉट नं.१३५ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३६ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३४ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३६ क्षेत्र ९२.९३ चौ.मी | गट नं. १०६/४ | प्लॉट नं. १३७ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३५ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३७ क्षेत्र १३७.५४ चौ.मी | गट नं. १०६/४ | ले आ रस्ता | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३६ | रु. ४,२५,०००/- |
| | प्लॉट नं. १३१, क्षेत्र ९२.९३ चौ.मी. ऐवजी प्लॉट नं.१३०, क्षेत्र ९२.९३ चौ.मी. असे वाचावे | | | | | | |
| | *** राखीव किंमत असे वाचावे | | | | | | |

**दिनांक - २३/१०/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सोलापूरच्या संध्याराणी बंडगरला राष्ट्रीय लॉन टेनिसमध्ये ५ पदके

**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**



देहरादून येथे झालेल्या वन विभागाच्या २८व्या अखिल भारतीय क्रीडा स्पर्धेत लॉन टेनिस क्रीडा प्रकारात येथील संध्याराणी बंडगर हिने दोन सुवर्ण व तीन कांस्य अशी पाच पदकांची कमाई केली. महाराष्ट्राकडून खेळताना संध्याराणीने एकेरीत उत्तराखंडचा पराभव करून पहिले सुवर्ण व दुहेरी (प्रौढ गट) अंतिम फेरीत गुजरातचा पराभव करून दूसरे सुवर्ण पटकावले. खुल्या गटातील एकेरीत गुजरातचा पराभव करून पहिले कांस्य व दुहेरी (खुला गट) अंतिम फेरीत मध्य प्रदेशचा पराभव करून दुसरे कांस्य पदक तसेच मिश्र दुहेरी (खुला गट) अंतिम फेरीत मध्य प्रदेशचा पराभव करून तिसरे कांस्य पदक प्राप्त केले. सुधीर सालगुडे हे संध्याराणीचे प्रशिक्षक आहेत . संध्याराणी या येथे सामाजिक वनीकरण विभाग कार्यालयात मुख्य लेखापाल या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.

## मार्शल आर्ट संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी प्रा. पवार

**जेऊर दि.२१ नोव्हेंबर-**



करमाळा येथील जीवन शिक्षण फौंडेशन या शैक्षणिक संकुलाचे कार्यकारी संचालक प्रा.जयेश पवार यांची शस्त्रांग मार्शल आर्ट सोलापूर जिल्हा कार्यक्षेत्रासाठी अध्यक्ष म्हणून तर सचिवपदी अमोल माळी यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सचिव मिलिंद कॅटमोरे यांनी ही नियुक्ती केली आहे. त्यांचे यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. गणेश करे- पाटील यांनी प्रा.पवार व माळी यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. सोलापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील विद्यार्थी व तरुणांचा व्यक्तीमत्व विकास, खेळ आणि सामाजिक आरोग्य यांचा समन्वय साधत संस्कारक्षम संपन्न यूवा पिढी निर्माण व्हावी या उद्देशाने शस्त्रांग मार्शल आर्ट महाराष्ट्र राज्य संघटनेचे कार्य सुरू आहे.

## महाविद्यालयीन डायव्हिंग स्पर्धेत बार्शीच्या राजर्षी शाहू कॉलेजचा लोखंडे तृतीय


**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर**



मार्कंडेय जलतरण तलावावर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन डायव्हिंग स्पर्धेत येथील राजर्षी शाहू लॉ कॉलेजचा कुणाल लोखंडेने ३ मीटर स्प्रिंग बोर्ड व १० मीटर हायबोर्ड डायव्हिंगमध्ये तृतीय क्रमांक संपादिला. त्यास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद प्रेमलता मनोहर सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. वाय. सोनकांबळे यांनी त्याचा सत्कार केला. याप्रसंगी प्रा. शिकारे एम. पी., प्रा.मिठा एम.एस., प्रा.साखरे दीपिका, प्रा. सुरवसे मॅडम, प्रा. समाधान काळे, गव्हाणे एस.एस., कोळी के. वी., कोल्हे ए.जी., वाघे आर. जी., माने एम.एम., कृष्णा सातपुते, ठोंबरे एस.के., शेळके एस.एम.उपस्थित होते. त्याचे शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी.टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण देबडवार, यांनी अभिनंदन केले.

## 'आयएमएस'च्या नमनची राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**



इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसई मध्ये इयत्ता आठवी शिकत असलेला विद्यार्थी नमन साखरे याची वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे होणाऱ्या राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाली. यवतमाळ (दिग्रस) येथे झालेल्या राज्य स्पर्धेतून त्याची निवड झाली. त्याला क्रीडा शिक्षक श्री राजकुमार माने व वैष्णवी गडदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# भारताचे लक्ष्य बरोबरी साधण्याचे

**◆ गुवाहाटी, २१ नोव्हेंबर**

शनिवारपासून येथील बारसपारा क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका संघादरम्यान दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटी क्रिकेट सामन्याला सुरुवात होणार आहे. शुभमन गिलच्या अनुपस्थितीत ऋषभ पंतला अत्यंत आव्हानात्मक नेतृत्व परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. चांगली तयारी असलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताला बरोबरी साधण्याचे कठीण काम करावे लागणार आहे.

दोन सामन्यांच्या या कसोटी मालिकेत पाहुणा दक्षिण आफ्रिका संघ १-० ने आघाडीवर आहे. कोलकाता येथे खेळला गेलेला पहिला कसोटी सामना ३० धावांनी गमावला. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासाठी आणखी कठीण परीक्षा आहे. त्यांच्या गोंधळात टाकणाऱ्या वक्तव्यांमुळे संघ स्पष्टतेसाठी संघर्ष करीत आहेत.



ऋषभ पंत



टेम्बा बावुमा

गत तीन दशकांपासून भारतीय संघांसोबत घरच्या मैदानावर खेळताना अजिंक्यतेचा जो आभास होता तो सध्याच्या कसोटी सामन्यात नाहीसा झाला आहे व तो आता कमकुवत दिसत आहे. २०२४ मध्ये न्यूझीलंडच्या एजाज पटेल व मिशेल सॅण्टनर या फिरकी जोडीने अजिंक्यतेच्या समजुतीला मोडून काढले होते, तर सायमन हार्मर व त्यांचे इतर सहकारी तरुण भारतीय संघाला आणखी असुरक्षित बनवत आहेत. फिरकीपटूंना हाताळण्यासाठी योग्य तंत्राचा अभाव स्पष्ट व धक्कादायक आहे. यात भर म्हणून, खेळपट्टीवर मानसिकतेत मोठ्या प्रमाणात बदल झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

अशा या कठीण परिस्थितीत शुभमन गिलच्या अनुपस्थितीत पंत नेतृत्व स्वीकारणार आहे. लाल मातीच्या बारसापरा खेळपट्टीवर त्याची फलंदाजी त्याच्या निर्णय घेण्याइतकीच महत्त्वाची असेल, याची त्याला चांगली कल्पना असेल.

मानेला दुखापत झाल्यानंतर २६ वर्षीय शुभमन गिलने विश्रांतीसाठी व बरे होण्यासाठी गुवाहाटी शहर सोडले आहे.

गिलची जागा घेण्यासाठी साई सुदर्शन हा सर्वात संभाव्य उमेदवार असल्याचे दिसते, जरी तो तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करतो की वॉशिंग्टन सुंदरला पुढे चालू ठेवण्याची परवानगी दिली जाते हे बघणे शिल्लक आहे. अक्षर पटेल व कुलदीप यादव या फिरकी गोलंदाजांपैकी एक अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीला संधी मिळू शकते. काही वर्षांपूर्वी रोहित शर्माला विश्रांती देण्यात आली, तेव्हा पंतने त्याच प्रतिस्पर्ध्याविरुद्ध भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व केले होते. पण त्याच्या कसोटी क्रिकेटमधील निर्णय घेण्याच्या कौशल्याबद्दल पुरेशी माहिती नाही. आता गुवाहाटीमध्ये पंतला संघ निवडीच्या बाबतीत त्याच्या प्रशिक्षकांना काही विवेकी निर्णय घेण्यासाठी पटवून द्यावे लागेल.

गुवाहाटीच्या मैदानावर पहिला कसोटी क्रिकेट सामना खेळला जात आहे, त्यामुळे कोणत्याही कारणांमुळे सामन्याला गालबोट लागू नये असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांना वाटते.

**-प्रतिस्पर्धी संघ -**

**भारत :** ऋषभ पंत (कर्णधार व यष्टिरक्षक), के. एल. राहुल, यशस्वी जयस्वाल, बी साई सुदर्शन, ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, देवदत्त पडिक्कल, आकाश दीप.

**दक्षिण आफ्रिका :** टेम्बा बावुमा (कर्णधार), कॉर्बिन बॉश, देवाल्ड ब्रेविस, टोनी डी झोर्झी, झुबेर हामझा, सायमन हार्मर, मार्को जॅन्सन, केशव महाराज, एडन मार्कराम, विआन मुल्डर, सेनुरान मुथुसामी, लुंगी नगिदी, रायन रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्स आणि कायले. ◀(वृत्तसंस्था)

**दुसरा कसोटी सामना आजपासून**

**स्थळ :** बारसपारा क्रिकेट स्टेडियम, गुवाहाटी
**वेळ :** सकाळी ९.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर



## व्हीव्हीपी अभियांत्रिकीच्या सृष्टी शेटे हिची राज्य जलतरण व योगा स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

येथील विद्या विकास प्रतिष्ठान अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयातील संगणक विज्ञान अभियांत्रिकी विभागातील एम.टेक. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी सृष्टी श्रीकांत शेटे हिने राज्य विद्यापीठ जलतरण व डायव्हिंग स्पर्धेमध्ये चारही प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला.सृष्टीने ५० मीटर फ्रीस्टाईलसह १ मी. स्प्रिंगबोर्ड, ३ मी. स्प्रिंगबोर्ड आणि हायबोर्ड डायव्हिंगमध्ये सुवर्णपदक पटकाविले. तिची ऑल इंडिया अक्वाटिक चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सृष्टीने राज्य योगासन स्पर्धे तही प्रथम क्रमांक पटकाविला. यातही तिची बंगळुरू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अमोल चव्हाण, संस्थापक चेअरमन प्रा. डॉ. जी. के. देशमुख, व्हाईस चेअरमन मधुकर कटकोंड, सचिव. रोहित देशमुख, प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, विभाग प्रमुख डॉ. प्रीती देशमुख, स्पोर्ट्स इनचार्जप्रा. विवेक बामणे, प्रा. अर्चना मेटकरी आदींनी तिचे अभिनंदन केले.

# डेफलिम्पिकमध्ये शौर्य सैनीला रौप्यपदक

**◆ टोकियो, २१ नोव्हेंबर**

युवा नेमबाज शौर्य सैनीने पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री-पोझिशन प्रकारात रौप्यपदक जिंकले. या यशाबरोबरच शुक्रवारी येथे डेफलिम्पिकच्या नेमबाजी स्पर्धेत भारताचे वर्चस्व कायम राहिले.

सैनीच्या रौप्यपदकाबरोबरच भारताने नेमबाजीत आपली पदकांची संख्या १३ वर नेली आहे, यात चार सुवर्ण, सहा रौप्य आणि तीन कांस्यपदकांचा समावेश आहे. गत वर्षी पेरू येथे झालेल्या आयएसएसएफ जागतिक नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भाग घेतलेल्या व सातव्या स्थानावर येण्यापूर्वी कनिष्ठ गटात अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या २२ वर्षीय सैनीने शुक्रवारी अंतिम फेरीत ४५०.६ गुण मिळवून जर्मनीच्या मॅथियास एरिक हेसच्या मागे स्थान मिळवले. हेसने ४५९.८ गुणांसह एक नवीन डेफ विश्वविक्रम प्रस्थापित केला.



अंतिम फेरीतील दुसरा भारतीय नेमबाज कुशाग्र सिंग राजावत याने यापूर्वी ५० मीटर रायफल प्रोनमध्ये कांस्यपदक जिंकले होते, मात्र यावेळी तो आठव्या स्थानावर राहिला. सैनीने ५८४ गुणांसह या कर्णबधिरांच्या जागतिक विक्रमाच्या पात्रता गुणांसह अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने पात्रता फेरीत अव्वल स्थान मिळविण्याच्या मार्गावर ९६, १००, ९६, ९८, ९७, ९७ अशी मालिका केली होती. ◀(वृत्तसंस्था)

## गिल संघातून बाहेर, तपासणीसाठी मुंबईला जाणार

**◆ गुवाहाटी, २१ नोव्हेंबर**

मानेला दुखापत झाल्यामुळे भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल याला शनिवारपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यापूर्वी शुक्रवारी कसोटी संघातून बाहेर काढण्यात आले आहे, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी एका निवेदनात म्हटले आहे. कोलकाता येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात फलंदाजी करताना गिलच्या मानेला दुखापत झाली होती आणि त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.



यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत गिलच्या अनुपस्थितीत दुसऱ्या कसोटी सामन्यात संघाचे नेतृत्व करणार आहे.

कोलकाता कसोटीच्या दुसऱ्या दिवशी गिलला मानेला दुखापत झाली होती आणि दिवसाचा खेळ संपल्यानंतर त्याला तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले होते. त्याला निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आणि दुसऱ्या दिवशी त्याला सुटी देण्यात आली. तो १९ नोव्हेंबर २०२५ रोजी गुवाहाटीला गेला, असे निवेदनात म्हटले आहे.

दुर्दैवाने, तो दुसऱ्या कसोटीत खेळण्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त नव्हता आणि त्याच्या दुखापतीची अधिक तपासणी करण्यासाठी तो मुंबईला जाणार आहे. गिल आगामी एकदिवसीय मालिका खेळू शकतो का हे पाहणे शिल्लक आहे. आम्हाला खेळादरम्यान पुन्हा दुखापत होऊ नये असे वाटत आहे, असे फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांनी गुरुवारी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)



## आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालय विजेता

**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेस निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले.

**विजेता संघ :** कादंबरी लोकरे, स्तुती लोंढे, तनुश्री बद्दुरकर, अमृता जेंबगी, समृद्धी पतंगे, समृद्धी कवठेकर, श्रावणी हब्बु, तन्वी राऊत, सोनाली ढगे, श्रेया शेळके, अंजली क्षीरसागर, तृप्ती कुंभारीकर.

# पंढरपूरच्या द. ह. कवठेकर प्रशालेचे वर्चस्व

## शालेय जिल्हा कॅरम स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

शालेय जिल्हा कॅरम स्पर्धेत पंढरपूरच्या द. ह. कवठेकर प्रशालेचे खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष व राष्ट्रीय जलतरण खेळाडू उदय चाकोते, वैजिनाथ हत्तूरे यांच्या उपस्थितीत झाले. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले. स्पर्धा पार पाडण्यासाठी संघटनेचे पंच म्हणून अमित कोर्टीकर, स्वप्नील बिराजदार, अशोक पाटील, अब्दुला चौधरी यांनी सहकार्य केले. माजी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांनी सूत्रसंचालन केले. संघटनेचे सचिव प्रा.डॉ.शिवानंद तोरवी यांनी आभार केले.

**स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे**

**अंतिम निकाल (प्रथम सहा) : १४ वर्षाखालील मुले :** रुद्र बु-हाडे, अर्णव महाजन (दोघे द.ह.कवठेकर, पंढरपूर), प्रदीप सूर्यवंशी (संगमेश्वर प्रशाल हंत्तरसंग कुंडल), रुद्र गायकवाड, विहांग गायकवाड (दोघे द.ह.कवठेकर, पंढरपूर), विराज सांवत (सिंहगड पब्लिक स्कूल केगांव). **मुली :** अनुष्का पाटोळे, श्रावणी हाके, जान्हवी कदम, विदया गवळी ( सर्व द.ह.कवठेकर, पंढरपूर). श्रावणी भिंगारे (आपटे प्रशाला पंढरपूर), संचिता चव्हाण (मनोहरभाऊ डोंगरे प्रशाला, मोहोळ).

**१७ वर्षाखालील मुले :** जयराज दळवी (करमाळा), अर्थव जगदाणे (द. ह.कवठेकर, पंढरपूर), विराज जिरगी (बार्शी), अर्थव खाडे (माळशिरस), वैश्वण घाडगे (दारफळ), भावेश निली (सिध्दराम म्हेत्रे प्रशाला कुंभारी).

**१९ वर्षाखालील मुले :** अर्थव वारकड (द.ह.कवठेकर, पंढरपूर), वरद गादे (सिंहगड, पंढरपूर), विजय शिर्के (दक्षिण सोलापूर), साहील शिंदे (पंढरपूर), करण गायकवाड (दक्षिण सोलापूर), सुदिप अक्कलंगी (दक्षिण सोलापूर)



## इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डचे शालेय राज्य तलवारबाजी स्पर्धेत वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

गारखेडा (छत्रपती संभाजी नगर) येथे झालेल्या शालेय राज्य तलवारबाजी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कुल स्टेट बोर्डच्या खेळाडूंनी वर्चस्व मिळविले. यात १४ वर्षाखालील मुलांच्या फॉईल सांघिक प्रकारात अतुल चन्नाने सुवर्ण पदक पटकाविले. १९ वर्षाखालील मुलींच्या फॉईल सांघिक प्रकारात रुचिता कणकी व नक्षत्रा कोंगारी, १७ वर्षाखालील मुलींच्या फॉईल सांघिक प्रकारात समृध्दी तिपणे व मुलांच्या ईपी सांघिक प्रकारात पृथ्वीराज घाडगे यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. त्यांना क्रीडा शिक्षक अक्षय माने, प्रशिक्षक निर्जला तवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, अपर्णा कुलकर्णी व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# सोलापूरच्या छत्रपती शिवाजी नाईट व अकलूजच्या मोहिते कॉलेजचे वर्चस्व

## आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टींग स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत सोलापरच्या छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज व अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या खेळाडूंनी वर्चस्व मिळविले.



शिवाजीने पुरुष गटात ४ व महिला गटात ३ तर अकलूजने पुरुष गटात २ तर महिला गटात ३ खेळाडूंनी अव्वल स्थान पटकाविले. शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज येथे ही स्पर्धा पार पडला. या स्पर्धेमध्ये २५ महाविद्यालयांमधील ४० मुले व २० मुली सहभागी झाले होते. याचे उद्घाटन एस.एस.जी.एम.महाविद्यालय कोपरगावचे उप-प्राचार्य डॉ.घनश्याम भगत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.टिळेकर हे होते. यावेळी क्रीडा परिषदेचे सचिव विशाल होनमाने विद्यापीठाच्या निवड समितीचे अध्यक्ष धनंजय देशमुख, सदस्य संतोष गवळी, दादासाहेब कोकाटे, महाविद्यालय सीडीसी सदस्य डॉ.एच.के. आवताडे,प्रा.व्ही.बी. सूर्यवंशी,डॉ.बाळासाहेब मुळीक, ग्रंथपाल डी.एस.पाटील,डॉ.एन.टी. लोखंडे,डॉ.व्ही.एस.शिंदे,पर्यवेक्षक श्री शेंडगे,कार्यालयीन रजिस्टार राजेंद्र बामणे आदी उपस्थित होते.

स्पर्धा पार पाडण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळातील क्रीडा शिक्षक प्रा. अरविंद वाघमोडे, संजय राऊत, बाळासाहेब भोसले, लोंढे सर, माजी खेळाडू ऋतुराज गायकवाड, चांदनी मुलाणी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.के.के.कोरे यांनी केले. प्रा.दादासाहेब कोकाटे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा.स्मिता पाटील यांनी केले.

**वजनीगटनिहाय अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**पुरुष :** ६० किलो : हार्दिक अविनाश लबडे (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), पृथ्वीराज संतोष गायकवाड (बी. एम.आय.टी.सोलापूर), स्वप्निल दादासो पाटील(उमा कॉलेज पंढरपूर). ६५ किलो : मित्रप्पा (बी.पी.एड कॉलेज सोलापूर), भीमाशंकर मालगोंडे (संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा), युवराज वाघमारे (उमा कॉलेज पंढरपूर). ७१ किलो : आर्यन सणस (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), रिषभ सिंग (संगमेश्वर कॉलेज सोलापूर), अजिंक्य कुमार पोतराज(संगमेश्वर नाईट कॉलेज सोलापूर). ६९ किलो : नित्यानंद पट्टणशेट्टी(संगमेश्वर कॉलेज सोलापूर), ओंकार गरड(बी. पी.एड कॉलेज सोलापूर), रितेश पेढे(संगमेश्वर कॉलेज सोलापूर). ८८ किलो : आयुष मुरूमकर (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), प्रसाद बाळासाहेब जाधव (बी.एम.आय. टी. सोलापूर). ९४ किलो : यशराज सचिन कदम (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज). ११० किलो : अक्षय शांताराम कट्टिमणी (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), सुजित कोळेकर(बी.एम. आय.टी.सोलापूर) ११० किलोवरील : आदित्य सुभाष चव्हाण(शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर).

**महिला :** ४८ किलो : ऋतुजा लक्ष्मीकांत पेंटी(एच.एन.कॉलेज सोलापूर), ५३ किलो (ज्ञानेश्वरी संतोष महाडीक (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), ५८ किलो : आर्या विनय इब्रामपुरकर( शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर) आर्या अर्जुन काटकर (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), ६३ किलो : हर्षदा सचिन पठारे(शवाजी नाईट कॉलेज सोलापूर), शारदा अमर राजुर (सोलापूर), ६९ किलो : साक्षी सोमनाथ घाडगे (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज), भाग्यश्री मल्हारी बनकर (अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर), संस्कृती जयकुमार कांबळे (वाय.सी.एम.कॉलेज करमाळा), ७७ किलो : आरती हनुमंत दाडमोडे (बी.पी.एड.कॉलेज, सोलापूर), साक्षी सूर्यकांत अहिरवाडी (शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), ८६ किलो : सोनाली विश्वनाथ पवार (शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज). ८६ किलोवरील : प्रांजली तुषार पगारे , वैष्णवी नारायण माने (दोघी शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर), अस्मिता अजय पताळे (शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज).

# राष्ट्रवादी काँग्रेसचे सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे कार्यकर्त्यांना देणार बुस्टर डोस?

▶▶ दि.२७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान बैठका, गाठीभेटी अन् इच्छुकांशी संवाद

▶▶ पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर सोलापूरच्या विकासाची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे हे निवडीनंतर सोलापुरात पहिल्यांदाच येत आहेत. महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने ते दि.२७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान सोलापूर शहरात विविध बैठका घेणार आहेत. तसेच काही मान्यवरांची गाठीभेटी अन् इच्छुकांशी संवाद साधणार आहेत. यानिमित्ताने ते कार्यकर्त्यांना जणू बुस्टर डोस देणार असल्याचे सांगण्यात येते.





राज्याचे कृषिमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मदतीला उपसभापती अण्णा बनसोडे यांना सोलापूर शहर जिल्ह्याचे सहसंपर्क मंत्री करण्यासंबंधी निवेदन देऊन स्थानिक पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना गळ घातली होती. त्यानुसार अण्णा बनसोडे यांची सोलापूर शहर जिल्ह्याच्या सहसंपर्क मंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली. दरम्यान, 'पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर सोलापूरचा विकास करण्याकामी जीवाचे रान करू. केवळ तुमची साथ सोबत हवी आहे. अशी साद अण्णा बनसोडे यांनी सोलापूरचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना घातली होती. याकडे लक्ष वेधताना त्यांनी दिलेले आश्वासन प्रत्यक्षात आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी सोलापूरचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे अण्णा बनसोडे यांच्या बैठकीसाठी पिंपरी चिंचवडला गेले होते. तेव्हा शहराध्यक्ष संतोष पवार आणि प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी अण्णा बनसोडे यांच्याकडे सोलापूर शहर जिल्ह्याच्या दौऱ्याची मागणी केली होती. तेव्हा, नोव्हेंबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यात सोलापूरला येण्याचे त्यांनी मान्य केले होते. दि.२७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान सोलापुरात दाखल होणार आहेत.

### इच्छुकांची मोर्चेबांधणी आणि स्वयंसिध्दता

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने उपसभापती तथा सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे सोलापूर दौऱ्यावर येणार असल्याचे समजल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक जोमाने तयारीला लागले आहेत. इच्छुकांची मोर्चेबांधणी आणि स्वयं सिध्दतेची तयारी सुरु केली आहे.

### अण्णा बनसोडे यांच्या दौऱ्यानंतर वातावरण बदलणार?

उपसभापती तथा सोलापूरचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्याचे आहेत. त्यामुळे त्यांना सोलापूरविषयी आत्मीयता आहे. पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर सोलापूर विकसित व्हावे, अशी त्यांची इच्छा आहे. पॉझिटिव्ह माईंडसेट घेऊन काम करत असल्याने, सोलापुरात त्यांच्या ॲक्टिव मोडमुळे विकासाची नवे दारे खुले होतील, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले.

### पक्षात आणखीन उर्जितावस्था येणार

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने यापूर्वीच देखील स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. प्रत्येक जिल्ह्यात संपर्कमंत्री आणि सहसंपर्कमंत्री या पदाची नियुक्ती करून जबाबदारी सोपवली आहे. त्यानुसार अण्णा बनसोडे यांच्या दौऱ्यानंतर पक्षात आणखीन उर्जितावस्था येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे बनसोडे यांचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे.

## ▶▶ महत्वाचे...



### एमआयटी ज्युनिअर कॉलेज बार्शीची इंटर एमआयटी स्पर्धेत चमकदार कामगिरी

**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर-**

लोणीकाळभोर, पुणे येथे झालेल्या इंटर एमआयटी स्पर्धेत बार्शी येथील एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा आणि सांस्कृतिक विभागांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेचे उद्घाटन अखिल भारतीय साहित्य परिषद, पुणे विभाग अध्यक्ष सूर्यकांत नामगुडे आणि एमआयटी एटीडी स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या प्राचार्या डॉ. अश्विनी पेठे यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत बार्शीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत श्रेया लोढा हिने बुद्धिबळमध्ये अलीशा अरब हिने थाळी फेकमध्ये सुवर्णपदक पटकावले. फेस पेंटिंगमध्ये ऋषिका गुप्ता हिने रौप्यपदक तर रुपेश भडकवाड याने मुलांच्या थाळीफेकमध्ये रौप्यपदक पटकावले.प्राचार्य डॉ. सचिन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### टेंभूर्णीच्या श्री गणपती फार्मसीची खोखोमध्ये विजयी सलामी

**टेंभुर्णी, दि. २१ नोव्हेंबर-**

टेंभुर्णी येथील श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्चच्या खोखो संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीच्या झोनल लेव्हल खोखो सामन्यांमध्ये कौतुकास्पद कामगिरी केली. ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने आयोजित केली होती. मुलींच्या संघाने श्री सिद्धेश्वर कॉलेज ऑफ इंजिनियरिंगवर २-१ने विजय मिळवला. संस्थापक सचिव डॉ. रवींद्र बेंदगुडे, संस्थेचे अध्यक्ष विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे यांनी त्यांचे कौतुक केले. टीम कोच म्हणून प्रा. धनश्री जाधवर, क्रीडा समन्वयक प्रा.शैलेश पेंदोर व प्रा.महेश दोडतळे यांनी मार्गदर्शन केले.

## ▶▶ निधन वृत्त...

### राधाबाई मामड्याल



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मार्केट यार्ड पाठीमागील जुना रंगराजनगर येथील रहिवासी राधाबाई सत्यनारायण मामड्याल (वय-६५) यांचे शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. शनिवार, दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे. प्रसिध्द वैद्य नरसिंहस्वामी मामड्याल यांच्या त्या मातोश्री होत.

### जाडीताबाई यादव



**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर-**

बार्शीतील मराठा सेवा संघाचे जेष्ठ पदाधिकारी रावसाहेब यादव यांच्या मातोश्री जाडीताबाई उद्धव यादव (वय-८४) यांचे शुक्रवारी दुपारी वानेवाडी ता.बार्शी येथे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### राजेश्वरी यंगल



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

सुनील नगर येथील राजेश्वरी भुमय्या यंगल (वय-८२) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांना कोणीही वारस नाहीत. पद्मशाली समाजाच्या शांतीधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### हरिभाऊ घुगरे



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

साखर पेठ येथील गवळी समाजाचे प्रमुख गाव कारभारी हरिभाऊ धोंडीबा घुगरे (वय-८२) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन बहीण, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शुभदा पाटील-खुपसंगीकर



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

परसवाग सोलापूरचे प्रवर्तक दै.तरुण भारतचे तत्कालीन पत्रकार नारायण पाटील-खुपसंगीकर यांच्या पत्नी शुभदा उर्फ माधुरी पाटील-खुपसंगीकर यांचे हृदयविकाराने निधन झाले. मृत्युसमयी त्या ६२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, एक मुलगी, जावई आणि तीन नातवंडे असा परिवार आहे.

### व्यंकटेश बडगू



**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

पूर्वभागातील प्रसिध्द कारखानदार तथा हेरिटेज मणिधारी सांस्कृतिक मंडळाचे नेते श्रीनिवास बडगू यांचे वडील व्यंकटेश रामलिंगम बडगू यांचे गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५ रोजी वार्धक्याने निधन झाले. मृत्युसमयी ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात चार मुले, मुलगी नातवंडे असा परिवार आहे. शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी शांती चौक पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सांगोला नगरपरिषद निवडणूक

# अध्यक्षपदासाठी ११ तर २३ सदस्यपदासाठी १०३ उमेदवार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२१ नोव्हेंबर -**

शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सांगोला नगराध्यक्ष पदासाठी एकूण २० उमेदवारांपैकी ९ जणांनी माघार घेतल्याने ११ तर २३ सदस्य पदासाठी २३२ उमेदवारांपैकी १२९ जणांनी म घार घेतल्याने १०३ उमेदवार राहिले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली.

नगराध्यक्ष पदासाठी इंगोले राहुल श्रीमंत, खतीब मोहसीन ईलाही, चव्हाण चंद्रकांत हणमंत, झपके विश्वेश प्रबुध्दचंद्र, नागणे स्वप्निल विश्वंभर, बनकर मारुती तुळशीराम, भाकरे बापुसाहेब भगवान, मंडले उमेश ज्ञानू, माने आनंदा गोरख, मुलाणी शौकत अब्दुल, राऊत मोहन विष्णू हे ११ उमेदवार राहिले आहेत. तसेच २३ सदस्य पदासाठी प्रभाग क्र.१ अ ४ अर्ज, १ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.२ अ ४ अर्ज, २ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.३ अ ४ अर्ज, ३ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.४ अ ३ अर्ज, ४ ब ७ अर्ज, प्रभाग क्र.५ अ ४ अर्ज, ५ ब ३ अर्ज, प्रभाग क्र.६ अ ३ अर्ज, ६ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.७ अ ५ अर्ज, ७ ब ४ अर्ज, प्रभाग क्र.८ अ ४ अर्ज, ८ ब ४ अर्ज, प्रभाग क्र.९ अ ५ अर्ज, ९ ब ५ अर्ज, प्रभाग क्र.१० अ ५ अर्ज, १० ब ८ अर्ज, प्रभाग क्र.११ अ ५ अर्ज, ११ ब २ अर्ज, ११ क ४ अर्ज असे एकूण १०३ उमेदवार असल्याची माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

### २६ नोव्हेंबरला चिन्हे वाटप

बुधवार दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता टाऊन हॉल येथे चिन्हे वाटप होईल. एकाच मुक्त चिन्हासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांनी मागणी केली असेल त्या ठिकाणी चिठ्ठ्या टाकून निर्णय घेण्यात येईल. सर्व उमेदवारांसमोर सदर प्रक्रिया होईल.

**-सैपन नदाफ,**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# करमाळा नगराध्यक्षपद : भाजपा उमेदवार देवी यांना राष्ट्रवादी (अप) चा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ नोव्हेंबर -**

करमाळा प्रतिनिधी करमाळा नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ जागी निवडणूक लढवणार असल्याचे मत करमाळा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भरत भाऊ अवताडे यांनी व्यक्त केले.

करमाळा नगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आशपाक जम दार कार्याध्यक्ष सुजित बागल तालुका प्रवक्ते एडवोकेट अजित विघ्ने राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरपंच विनय ननवरे, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब मोरे, सुहास ओहोळ सवितताई कांबळे, जयकुमार कांबळे उद्योग आघाडीचे अध्यक्ष प्रसाद जगताप उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेमध्ये माजी नगरसेविका सविता जयकुमार कांबळे यांनी



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये प्रवेश केला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अपक्ष पुरस्कृत म्हणून त्यांना उमेदवारी दिल्याचे जाहीर करण्यात आले आहे. यावेळी पुढे बोलताना भरत भाऊ आवताडे म्हणाले की करमाळा नगरपालिकेचे निवडणूक महायुतीच्या माध्यमातून आम्ही एकत्र लढवणार होतो. त्या संदर्भात सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे आमचे नेते संजयमामा शिंदे यांच्याशी आमची चर्चा सकारात्मकपणे चालू होती आम्हाला नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये महायुती म्हणून योग्य जागा प्रतिनिधित्व दिले जाईल असा शब्द त्यांनी दिला होता परंतु ऐनवेळी भाजपच्या वतीने इच्छुकांची संख्या वाढल्याने आम्हाला फक्त तीन जागा देण्याचे ची सहमती त्यांनी दर्शवली वास्तविक पाहता आम्ही वीस जागावर लढवण्याची आमची तयारी होती त्या अनुषंगाने दहा जागा तरी आम्हाला मिळतील अशी अपेक्षा होती.

परंतु त्यांनी अपेक्षित शब्द न पाळल्याने आमच्या कार्यकर्त्यांची ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेऊन मुस्कटदाबी होऊ नये म्हणून आम्ही आठ जागी नगरपालिका निवडणूक लढवण्याचा ठाम निर्णय घेतला असून आमचे नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार जिल्हाध्यक्ष उमेश दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संजयमामा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा नगरपालिका निवडणूक लढवणार असून महायुती म्हणून भाजपच्या नगराध्यक्ष पदाला आम्ही वरिष्ठांच्या आदेशानुसार कन्हैयालाल देवी यांच्या पत्नी सौ सुनीता देवी यांच्या उमेदवारी पाठिंबा देत असून राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा नगरपालिकेची निवडणूक स्वातंत्र्यपणे लढणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत भाऊ अवताडे यांनी सांगितले आहे.

# अक्कलकोटमध्ये कार्तिक आमावस्येनिमित्त दीपोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २१ नोव्हेंबर -**

कार्तिक अमावास्याच्या मंगल पर्वावर शहरातील श्री शांतलिंगेश्वर हिरेमठासह श्री श्री नवसाचा मारुती मंदिर व हिंदू मुस्लिम बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत शेख नुरुदीन बाबा दर्गाह समोर हजारो दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाले. श्री शांतलिंगेश्वर हिरेमठाचे शिष्य व भक्तगण यांच्या सहकार्याने आणि शहरवासीयांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही हा दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी मठाधिपती श्री.ष.ब्र. जयगुरू शांतलिंगराध्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात हिरेमठातील श्री रेणुकाचार्य मूर्ती, माजी मठाधिपती लिंगैक्य श्री गुरुशांतलिंग म हास्वामीजी व काशी विद्यापीठाचे माजी वरिष्ठ प्रा. लिंगैक्य डॉ. श्री ष. ब्र. श्रीपतीपंडिताराध्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून आकर्षक फुलांची सजावट आणि सुंदर रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या. पौरोहित्य वेदमूर्ती बसवराज शास्त्री यांनी केले. तर महामंगलारती आझाद गल्ली महिला मंडळांनी केली. या कार्यक्रमाला अडत व्यापारी चंद्रकांत स्वामी, भीमाशंकर करकी, कुंभार समाजाचे अध्यक्ष भीमाशंकर कुंभार, बाबुराव बिराजदार, इरण्णा पाटील, मठाचे व्यवस्थापक कल्लप्पा सोमेश्वर, शरणप्पा कुंभार, अशोक पाटील, शिवप्पा कुंभार, कुंभार समाज महिला मंडळ आदीसह शहरातील शेकडो भाविक उपस्थित होते.



दिपोत्सवाचे महत्त्व प्रकाशाचे आणि ज्ञानाचे प्रतीक आहे. हा अंधार दूर करून जीवनात सकारात्मकता, आनंद आणि समृद्धी आणतो. हे सण मानवी नातेसंबंध दृढ करण्यास मदत करते आणि स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करते. मनातील अज्ञान आणि अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश आणणे हा दीपोत्सवामागील मुख्य हेतू आहे.जीवनात सकारात्मक ऊर्जा आणतो आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. **- श्री. जयगुरूशांतलिंगराध्य महास्वामीजी**

कुंभार गल्ली तरुण मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नियोजन केले. हिंदू व मुस्लिम समाज बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत शेख नुरुदीन बाबा दर्गाह समोर यावेळी पहिल्यांदाच कार्तिक अमावस्या निमित्त दीपोत्सव साजरा करण्यात आला.

या सोहळ्याने परिसरातील भाविकांचे लक्ष वेधून घेतले. दरम्यान, आकर्षक रांगोळी रेखाटून विविध सामाजिक संदेश रेखाटण्यात आले होते. समितीचे संस्थापक महंमदपाशा पिरजादे, कार्याध्यक्ष कमलाकांत होटकर, विरुपाक्ष कुंभार, सादिक बागवान, राजशेकर कापसे, नंदकुमार जगदाळे, स्वामीराव वाकडे, संजय झिपरे, भगत भोसले,महादेव कांबळे, गुरुनाथ मोकाशी,बसवराज धनोरे,लक्ष्मीकांत कोळी,आकाश मुसळे,आपाशा मलवे आदींनी परिश्रम घेतले. श्री नवसाचा मारुती मंदिरसुद्धा दीपोत्सवाने उजळून निघाले होते.

श्री वटवृक्ष स्वामी देवस्थान लगत असल्याने जागृत मारुती मंदिर आहे. म्हणून याचे आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे देवस्थानचे पौराहित्य करणारे गणेश गुमास्ते आहेत. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. शेवटी तिन्ही ठिकाणी प्रसाद वाटप करण्यात आला. भक्तांनी या प्रसादाचा लाभ घेतला.



# मोडनिंब एमआयडीसीबाबत पालकमंत्र्यांना दिले निवेदन

### दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी,दि.२१ नोव्हेंबर-**

मोडनिंब एमआयडीसी तसेच लोंढेवाडी व वडाचीवाडीसाठी निधी मिळणे व अन्य प्रलंबित कामाबाबत जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

माढा तालुक्यातील मोडनिंब येथील एम.आय.डी.सी. साठी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सोबत मिटींग लावणे, लोंढेवाडी व वडाचीवाडी (अ.उ.) येथे पर्यटनम धून तसेच नागरीसुविधेतून मोठ्या गावासाठी निधी मिळणेसाठी तसेच मागील दोन वर्षातील २५१५ मधील काम पूर्ण झालेल्या परंतु बीले प्रलंबीत असलेल्या कामांची निधी मागणीची पत्रे दिली तसेच इतर महत्वाच्या कामासंदर्भात चर्चा केली. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे संबंधीतांना आदेश दिले. यावेळी कैलास तोडकरी, लोंढेवाडीचे सरपंच संतोष लोंढे, जाधववाडी (मा) चे मा.सरपंच अमोल चवरे, मोडनिंबचे ग्रा.पं. सदस्य सोमनाथ माळी, भाजपचे सरचिटणीस राहुल केदार, वैभव शिंदे, सुखदेव पवार, विकास शिंदे आदी उपस्थित होते.

# गादेगाव येथील फाटे कुटुंबियांकडून पर्यावरणपूरक पध्दतीने रक्षा विसर्जन

## परंपरेला दिला फाटा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ नोव्हेंबर -**

तालुक्यातील गादेगावचे माजी उपसरपंच आणि सहकार शिरोमणी कारखान्याचे संस्थापक संचालक ज्ञानेश्वर नारायण फाटे यांचे नुकतेच वृध्दापकाळाने गादेगाव येथे निधन झाले. त्यांच्यावर गादेगाव येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले.

मात्र फाटे कुटुंबियांनी कै.ज्ञानेश्वर उर्फ आप्पा नारायण फाटे यांच्या निधनानंतर तिसऱ्या दिवसाचा अर्थात रक्षा विसर्जन कार्यक्रम परंपरागत पद्धतीने रक्षा किंवा



(माती) विसर्जित न करता कै. आप्पांच्या स्मृतींना साजेशा अशा वृक्षारोपणाचा मार्ग स्विकारुन त्यांच्या आयुष्यभराच्या संवेदनशील, समाजप्रिय आणि निसर्गप्रेमी विचारांना डोळ्यासमोर ठेवत जमिनीत खड्डे करून त्यामध्ये रक्षा मिसळून त्या खड्ड्यातून काही रोपे लावली आणि तिसऱ्या दिवसाच्या पर्यावरणपूरक विधीव्दारे त्यांच्या आठवणींना खरोखरच हिरवाईची शाश्वत भेट दिली. या कार्यक्रम चे आयोजन करताना फाटे कुटुंबांच्या मनात देखील वेदना दाटून आल्या. पण त्याच वेदनेतून एक सकारात्मक, पर्यावरणपूरक आणि प्रेरणादायी पाऊल उचलल्याचे समाधान देखील मिळाल्याची भावना समस्त फाटे कुटुंबियांकडून व्यक्त करण्यात आली.

दरम्यान परंपरागत पध्दतीने केल्या जाणाऱ्या रक्षाविसर्जन कार्यक्रमास फाटा देत या आगळ्यावेगळ्या पर्यावरणपूरक पध्दतीने केलेल्या रक्षाविसर्जन कार्यक्रमा बद्दल समस्त फाटे कुटुंबियांचे गादेगावसह पंचक्रोशीमध्ये सर्वत्र कौतूक केले जात आहे.

### आप्पांच्या संस्काराचे जीवंत प्रतिक

आज हे केवळ रोप नाही तर आप्पांच्या संस्कारांचे, त्यांच्याकडून मिळालेल्या मायेचे, माणुसकीचे आणि मार्गदर्शनाचे जिवंत प्रतीक आहे. ते वाढत राहील, फुलत राहील आणि आप्पांच्या आठवणींप्रमाणेच आमच्या हृदयात सदैव रुजलेले राहील.

**- नागेश फाटे (प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या उद्योग, व्यापार सेल )**

## महत्वाचे...

### माजी उपसभापती दत्तात्रय शिंदे यांच्यावतीने आज मोफत नेत्र तपासणी

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील तुळजापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय भास्कर शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बाळे येथील शंकरशेठ साबळे नेत्र रूग्णालयाच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन शनिवार, दि.२२ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे सोलापूरमधील बाळे येथील शंकर शेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. ही तपासणी तामलवाडी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सकाळी ९.३० ते ४.३० वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. तपासणीनंतर दोष आढळल्यास संबंधित रुग्णांच्या शस्त्रक्रिया बाळे येथील शंकरशेठ साबळे रुग्णालयामध्ये करण्यात येणार असून रुग्णांची येण्या-जाण्याची व निवास आणि भोजणाची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन दत्तात्रय शिंदे व मित्र परिवाराने केले आहे. दरम्यान, तामलवाडी पंचायत समिती गण मोतीबिंदूमुक्त करण्याचा आपला संकल्प असून, तामलवाडीनंतर इतर काही गावात हे शिबीर राबविण्यात येणार असल्याचाही निर्वाळा माजी उपसभापती तथा युवा नेते दत्तात्रय शिंदे यांनी दिला.



### रंगरेज कलेक्शन कपड्यांच्या दुकानांना आग

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

शहरातील कोंतम चौक येथील रंगरेज कलेक्शन व रंगरेज फॅमिली वेअर या कपड्यांच्या दुकानाना अचानक आग लागून कपड्यांचे नुकसान झाले. गुरुवारी रात्री १०.२० वाजता ही घटना घडली. महापालिका अग्निशामक दलाने तत्काळ ही आग आटोक्यात आणली. कोंतम चौक येथील रंगरेज कलेक्शन व रंगरेज फॅमिली वेअर या कपड्यांच्या दुकानाला आग लागली. भाजपचे माजी सभागृह नेते संजय कोळी, माजी नगरसेवक विनायक विटकर, अविनाश पाटील, राजकुमार पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी या संदर्भात अग्निशामक दलास माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे सहाय्यक अधीक्षक अच्युतराव दुधाळ यांनी तत्काळ अग्निशामक दलाच्या गाड्या पाठविल्या. अग्निशामक दलाकडून तात्काळ कार्यवाही करून तीन गाड्या पाण्याचा फवारा मारून संपूर्ण आग विझवण्यात आली. अग्निशामकलाच्या त्वरित कार्यवाहीमुळे दुकानातील इतर साहित्य व शेजारील दुकाने यांचे मोठे नुकसान झाले नाही. या आगीमध्ये कोणतीही जिवितहानी झाली नाही, असे अग्निशामक दलाचे सहाय्यक अधीक्षक अच्युतराव दुधाळ यांनी सांगितले.



### आजपासून बार्शी ते कोल्हापूर हायकोर्ट बस सेवा

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्यावतीने बार्शी ते कोल्हापूर या हायकोर्ट बस सेवा शनिवार दि. २२ नोव्हेंबरला सकाळी ६ वाजता बार्शी बसस्थानक येथे शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती बार्शी आगार व्यवस्थापक मधुरा जाधवर- दराडे यांनी दिली. बार्शी शहर व परिसरातील नागरिकांना कोल्हापूर येथे हायकोर्ट कामला जाण्यासाठी सोय झाली आहे. त्यामुळे प्रवाशांनी आनंद व्यक्त केला आहे. सदर बस सकाळी ६ वाजता व दुपारी २ वाजता या वेळेत सुरु करण्यात आली असून बार्शी बसस्थानकातून सकाळी ६ वाजता ही बस निघणार असून कुर्डूवाडी, पंढरपूर, मिरज, जयसिंगपूर, हातकणंगले मार्गे कोल्हापूरला दुपारी १२ वाजता पोहोचेल. तसेच बार्शीला येताना कोल्हापूर ते बार्शी ही बस कोल्हापूरमधून दुपारी २ वाजता निघेल. ही बस हातकणंगले, जयसिंगपूर, मिरज, पंढरपूर, कुर्डूवाडी मार्गे बार्शीला रात्री ८ वाजता पोहोचेल. बार्शी-कोल्हापूर या नवीन हायकोर्ट बससेवेचा सर्व प्रवासी बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बार्शी आगाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# कोणतीही एक भाषा जबरदस्तीने लादण्याचा उद्देश नाही : डॉ.जाधव

- सोलापुरात त्रिभाषा धोरण समितीचा जनसंवाद
- साहित्यिक, शिक्षणतज्ञ, पालकांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

त्रिभाषा धोरण समितीची रचना ही पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य (कंपल्सरी) करण्यासाठी करण्यात आलेली नाही. कोणतीही एक भाषा जबरदस्तीने लादणे हा समितीचा उद्देश नाही, असे स्पष्ट प्रतिपादन या समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र जाधव यांनी केले.

राष्ट्रीय शिक्षण धोरणच्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत त्रिभाषा धोरण समितीच्या वतीने सोलापुरात आयोजित केलेल्या जनसंवाद बैठकीत ते बोलत होते. त्यास साहित्यिक, शिक्षणतज्ञ, पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्या-त्या जिल्ह्याची लोकसंख्या, भाषा-वापराचा भूगोल, मुलांचे शैक्षणिक हित आणि पालकांची गरज, इ. या सर्वांचा विचार करून भाषा धोरण ठरविणे हा समितीचा मुख्य हेतू आहे, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, उपस्थितांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम याप्रसंगी बोलताना म्हणाले, सोलापूर हा बहुभाषिक जिल्हा आहे. येथे विविध संस्कृती आणि भाषा एकत्र नांदतात. त्यामुळे त्रिभाषा धोरण राबविताना स्थानिक भाषिक वास्तव, विद्यार्थ्यांचे सामाजिक वातावरण आणि भाषिक विविधता समजून घेऊन निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या बैठकीत मांडलेली सर्व मते, सूचना आणि व्यावहारिक दृष्टिकोन समितीकडून संकलित करून त्यावर विचारविनिमय केल्यानंतर धोरणाचा अंतिम अहवाल राज्य शासनाकडे पाठविला जाणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी डॉ.वामन केंद्रे, डॉ.अपर्णा मॉरिस, डॉ.सोनल कुलकर्णी-जोशी यांनीही मनोगत व्यक्त केले.

**हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा द्या**

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा मानली जाते. तर इकडे भारतातील विविध राज्यात विविध भाषा बोलल्या जातात. तसे पाहता देशभरात हिंदी भाषा मोठ्या प्रमाणात बोलली जाते. हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा दिल्यास देशातील कोणत्याही राज्यात गेल्यास भाषेचा अडथळा येऊ शकत नाही, असे मत दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी या समितीजवळ व्यक्त केले.

यावेळी... यांनीही मनोगत व्यक्त केले.

यांनीही मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ.गणपत मोरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वटारे, डायट अधिव्याख्याता गजेंद्र जमादार, बुधाराम आदी उपस्थित होते. विस्तार अधिकारी सुहास गुरव यांनी सूत्रसंचालन केले.





# बाळे येथील श्री खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी नवरात्र उत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर**

तीर्थक्षेत्र बाळे येथील श्री खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी नवरात्र उत्सवास (देवदीपावली) आज प्रारंभ झाला. चंपाषष्ठी षडरात्र श्री खंडोबा देवाचा प्रमुख उत्सव मार्गशिर्ष शुद्ध प्रतिपदेस देवाची घटस्थापना मोठ्या उत्साहात श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात करण्यात आली. आजपासून पाच दिवस दिवे प्रज्वलित करून धार्मिक विधींची सुरुवात करण्यात आली.

ज्या भक्तांच्या घरी खंडोबा कुलदैवत आहे. त्या भक्तांच्या घरांमध्ये ही घटस्थापना करण्यात आली. प्रतिपदेस घटस्थापना करून सहा दिवस हा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. घरातील कुटुंब प्रमुख उत्सवात उपवास केला जातो. घटावर फुलांची माळ सोडली जाते. चंपाषष्ठीस गटाचे उद्यापन करून कुलधर्म कुलाचार केले जातात. या धार्मिक विधीसाठी प्रत्येकी ५ काळ्या खारका, ५ फळे, १ डझन केळी, सव्वा किलो हळद, तांदूळ, ताम्हण, तांब्या, उदबत्ती, कापूर, हळदी, कुंकू, कापसाचे वस्त्र, नवीन कापड,५ लिंबू, हळद कुंकू भरून खोबरे वाटी एकात हळद व एकाच कुंकू, पांढरा दोरा प्रासादिक साहित्यांनी धार्मिक विधी संपन्न करण्यात आला. सहा दिवस समई पेटती ठेवावी लागते, असे सांगण्यात आले.

**पूजेची मांडणी :** ताम्हनामध्ये धान्य तांदूळ घेऊन त्यावर तांब्या अथवा पंचपात्र मांडण्यात आले. तांब्याच्या बाहेरील बाजूस सूत गुंडाळावे व कलशाची विधिवत पूजा करण्यात आली. घटासमोर ५ विडे मांडून त्यावर खारीक, खोबरे, बदाम, सुपारी, हळकुंड ठेवावे व देवांच्या शिपायाचे २ विडे ठेवण्यात आले. त्यावर सुपारी व लिंबू ठेवून भंडारा, गुलाल लावण्यात आला. ताम्हणामध्ये भंडारा पसरून त्यावर ५ विड्याची पाने व त्यावर सुपारी खोबऱ्याचे तुकडे व मधोमध भंडारा खोबरे वाटी ठेवावी. ५ मुलांना बोलवून येळकोट येळकोट म्हणत तळी उचलण्यात येते, असे श्री खंडोबा मंदिराचे पुजारी गणेश पुजारी यांनी सांगितले.

# स्थानिक राजकीय परिस्थिती पाहून आघाडीचा निर्णय घेणार

- खा.धैर्यशील मोहिते-पाटील
- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**



आगामी महापालिकेच्या अनुषंगाने स्थानिक परिस्थिती पाहून आघाडीचा निर्णय घेणार असून, आघाडी करण्याबाबत आपला पक्ष सकारात्मक असल्याचे मत खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांच्या प्रमुख शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी हुतात्मा शॉपिंग सेंटर येथे कार्यान्वित केलेल्या नव्या शहर व जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यालयचे उद्घाटन थाटात संपन्न झाले. २०१२ मध्ये महापालिकेच्या निवडणुकीत याच कार्यालयाच्या माध्यमातून कामकाज करताना १७ नगरसेवक निवडून आणले होते. कार्यालयातून भविष्यात महानगरपालिका निवडणुकीत १७ पेक्षा जास्त निवडून आणण्याचा मानस शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी व्यक्त केला. यावेळी भारत जाधव, शंकर पाटील, यु एन बेरिया, गोविंदराज एकबोटे, राजा शेख, प्रशांत बाबर, चंद्रकांत पवार, दिनेश शिंदे, सुनिता रोटे, जावेद खरेदी, बिस्मिल्ला शिकलगर, अजित पात्रे, मोहम्मद इडिकर, मोनिका सरकार, सीया मुलानी, मनीषा माने, गौरा कोरे, प्रतीक्षा चव्हाण, सिद्धारूढ निंबाळे, जनार्दन बोराडे, प्रविण इराकशेट्टी, डॉ दादाराव रोटे, संपन्न दिवाकर, प्रशांत गायकवाड, सरफराज शेख, राजू कुरेशी, अक्षय जाधव, अमित मोतीवार, मुसा आत्तार, बिराप्पा बंडगर, लखन गावडे, संजय जाबा, विजय भोईटे, मिलिंद गोरे, अक्षय बचुटे, सिद्धार्थ सर्वगोड उपस्थित होते.

# पद्मशाली बांधवांकडून तिरुपतीच्या पद्मावतीदेवीला माहेरची साडी अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**



तिरुपतीनजीकच्या तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवीला सोलापूरच्या पद्मशाली समाजातील २५ जोडप्यांनी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण २५ तसेच समाजबांधवांतर्फे सामूहिक 'पुट्टींटी पट्टुचिरा' अर्थात माहेरची साडी अर्पण करण्यात आली.

तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात सध्या ब्रह्मोत्सव सुरू आहे. या मंदिरात देवीला सोलापूरच्या पद्मशाली बांधवांना माहेरची साडी अर्पण करण्याचा मान आहे. सोलापुरातील पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवम संस्थेच्या माध्यमातून गत अनेक वर्षांपासून साडी अर्पण करण्याचा उपक्रम राबविला जात आहे. यंदा या उपक्रमात पद्मशाली समाजाचे २५ जोडपी सहभागी झाली. त्यांनी प्रत्येकी एक असे एकूण २५ तसेच सामान्य समाजबांधवांच्या सामूहिक देणगीतून एक असे मिळून एकूण २६ रेशमी महावस्त्र देवीला अर्पण करण्यात आल्या. यंदा हा कार्यक्रम शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी नियोजित होता. याकरिता पद्मशाली बांधव गुरुवारी २० नोव्हेंबरला तिरुपती येथे पोहोचले होते. मात्र

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या पद्मावती देवीच्या दर्शनासाठी शुक्रवारी येणार असल्याने देवस्थानच्या सूचनेनुसार सोलापूरच्या पद्मशाली बांधवांनी गुरुवारीच माहेरची साडी अर्पण केली. साडी अर्पण कार्यक्रमावेळी पद्मशाली बांधवांनी पद्मावतीदेवी मंदिर परिसरात भगवान बालाजी, पद्मावती, जय मार्कंडेय, गणपती बाप्पा मोरयाचा जयघोषात केला.

या कार्यक्रमानंतर पद्मशाली बांधवांनी तिरूमला येथे जाऊन भगवान बालाजींचे दर्शन घेतले. यावेळी समितीचे संस्थापक माजी महापौर जनार्दन कारमपुरी, अध्यक्ष अंबादास बिंगी, सचिव व्यंकटेश पडाल, सहसचिव गोपीकृष्णा वड्डेपल्ली, खजिनदार नागेश सरगम, दतू पोसा, श्रीनिवास करली, दामोदर पासकंटी, व्यंकटेश दोंता, विश्वंभर मामडयाल, दिगंबर इप्पलपल्ली, श्रीहरी म्याकल, लक्ष्मीनारायण दुस्सा, माधवी अंदे, सुलक्षणा पोन्नम, लक्ष्मण पुल्ली, जयंत कोंडा, अजय पोन्नम, पापय्या दिकोंडा, मनोहर गुर्रम, नरेंद्र आडम, नामदेव बल्ला,पेंटा, कोटा आदी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

या यात्रेचे नियोजन पुण्य श्रीवारी सेवाचे स्वाती चिटकेन, रघुनंदन चिटकेन व प्रज्ञा इप्पलपल्ली यांनी केले.

# भाजपाने मारवाडी समाजाला तीन प्रभागात द्यावी उमेदवारी

- सकल मारवाडी आणि राजस्थानी समाजाची मागणी
- तीनही आमदारांना देणार निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**



मारवाडी समाज हा भारतीय जनता पार्टीचा पारंपारिक मतदार आहे. गेल्या अनेक निवडणुकांपासून या समाजाने भाजपाच्या पाठीशी आपली ताकद उभी केली आहे. त्यामुळे आगामी सोलापूर महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत मारवाडी समाजाला प्रभाग क्रमांक एक, चार आणि पाच या तीन प्रभागांमध्ये भाजपाकडून उमेदवारी द्यावी, अशी मागणी सकल मारवाडी समाज आणि राजस्थानी समाजाकडून भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली.

सोलापूर शहराच्या तीनही विधानसभा मतदारसंघात मारवाडी समाज मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या अनेक लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकांमध्ये मारवाडी समाजाने भाजपाच्या पाठीशी आपली ताकद उभी करुन भाजपचे उमेदवार निवडून आणले आहेत. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून मारवाडी समाजाला सोलापूर महानगरपालिकेत भाजपाकडून प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. त्यामुळे मारवाडी समाज आणि राजस्थानी समाजात मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे. मारवाडी समाजाने एक गठ्ठा मते देऊन भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निवडून आणण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. मात्र पक्षाकडून मारवाडी आणि राजस्थानी समाजावर अन्याय होत असल्याची भावना समाज बांधवांमध्ये निर्माण झाली आहे.

दरम्यान, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी सांगितले की, मारवाडी समाजाच्या योगदानाचा विचार करुन आगामी महापालिका निवडणुकीत मारवाडी समाजाला तीन ठिकाणी उमेदवारी देण्याबाबत पक्षाकडून सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील. सकल मारवाडी आणि राजस्थानी समाजातर्फे शहरातील तीनही आमदारांना निवेदन देत समाजाकडून मागणी करण्यात येणार असल्याचे मारवाडी व राजस्थानी समाजाचे श्रीनिवास दायमा आणि जवाहर जाजू यांनी सांगितले.

याप्रसंगी चंद्रकांत तापडिया, अनिल जोशी, उमेश लोया, प्रवीण चंडक, गिरीश जाखोटिया, भगवती व्यास, भाऊ पारिख, गोविंद उपाध्ये, आशिष उपाध्ये, आनंद शर्मा, गोकुळ झंवर, श्रीकांत लड्डा, ओमप्रकाश व्यास आदी उपस्थित होते.

# चामुंडा देवीच्या मुर्तीवर आढळला कदंब राजवंशाचा शिलालेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**



तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथे प्राचीन महादेव मंदिरामध्ये असलेल्या चामुंडा देवीच्या मूर्तीवर शिलालेख आढळल्यामुळे मराठवाड्याच्या इतिहासावर नव्याने प्रकाश पडला आहे. येथील चामुंडा देवीची मूर्ती चतुर्भुज आणि चार फूट उंच, तीन फूट रुंद आहे. देवी पद्मासनात बसलेली आहे. तिच्या पोटावर विंचू आहे. हातात डमरु, त्रिशूल, खडकवांग, नरमुंडके व खंजीर आहे. देवीच्या एका मांडीच्या खालील बाजूस मोठे नरमुंड आहे तर दुसऱ्या मांडीच्या खाली एडक्याचे मुंडके आहे.

अशा या भयावह मूर्तीच्या खालील बाजूस पट्टीवर हळ्ळेकन्नड लिपीत तीन ओळीचा शिलालेख कोरलेला आहे. 'कदंबकुळातील महामंडळेश्वर कुमार सोमदेव' याने ही देवीची मूर्तीची निर्मिती करून मूर्तीची मंदिरामध्ये प्रतिष्ठापना केली असा त्या शिलालेखावर उल्लेख आहे. कंदब राज्यकर्त्यांनी बनवासी (आजचे उत्तर कर्नाटक) येथे इ.स.चौथ्या शतकात राज्य स्थापन केले. नंतर कदब वंशाच्या विविध शाखा हंगल, गोवा, त्रिपरवट, नालगुंड अशा अनेक भागांत कार्यान्वित झाल्या पुढे काटी-सावरगावात या वंशातील काही अधिकारी किंवा सामंत स्थायिक झाले असावेत, हे या शिलालेखावरुन सिध्द झाले आहे. या शिलालेखाचे वाचन प्रा.रवीकुमार नवलगुंद यांनी केले. याकामी अनिल दुधाने यांचे सहकार्य लाभले.

**महामंडळेश्वर ही प्रतिष्ठित पदवी**

'महामंडळेश्वर' ही पदवी तत्कालीन काळातील सामंताधिपती किंवा प्रादेशिक शासक यांना दिली जात असे. राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव काळात ही पदवी प्रतिष्ठेची मानली जात होती. कुमार सोमदेव यांना देखील 'कदंबकुल महामंडळेश्वर' अशी पदवी होती. यावरुन कुमार सोमदेव एखाद्या मोठ्या मंडळाचा प्रशासक किंवा शैव मठाधिपती असावा, असे इतिहास अभ्यासक विशाल फुटाणे यांनी सांगितले.

**कंदब राजवंशाचा पुरावा**

चामुंडा देवी ही शैव-शाक्त परंपरेतील उग्र रुप मानली जाते. चालुक्य, कदंब, राष्ट्रकूट काळात महादेव मंदिरांमध्ये चामुंडा, योगेश्वरी, भद्रकाली, माहिषमर्दिनी अशा देवींच्या मूर्ती स्थापना केली जात. सावरगाव येथील महादेव मंदिरातील चामुंडा देवीची मूर्ती म्हणजे मराठवाड्यातील कदंब राजवंशाच्या सत्तेचा पुरावा आहे, असे इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाहनाच्या धडकेत म्हैस ठार; चालक फरार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ नोव्हेंबर -**

फिर्यादी तुकठच् भरत माशाळ, वय ४५ वर्षे, रा. कोरेगाववाडी, ता. उमरगा यांनी कळविल्यानुसार, त्यांची एक मुंडा जातीची म्हैस (किंमत अंदाजे ७०,०००) दि.१९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ६.०० वा. ते २० नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे ४.०० वा. दरम्यान मृत अवस्थेत आढळून आली.

म्हैस आयटीआय कॉलेज समोर, उमरगा परिसरात होती. त्यावेळी अज्ञात वाहनचालकाने आपले वाहन हायस्पीडने व निष्काळजीपणे चालवत म्हशीला जोराची धडक दिली. या अपघातात म्हैस जागीच ठार झाली. अपघातानंतर वाहनचालक मदत न करता घटनास्थळावरून पसार झाला.

फिर्यादी तुकाराम माशाळ यांनी दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी उमरगा पोलीस ठाण्यात प्रथम खबर दिली. या प्रकरणी पोलिसांनी भा. दं. सं. कलम २८१, ३२५ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### नगरसेविका डॉ. अनुजा परमेश्वर यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२१ नोव्हेंबर -**

प्रतिष्ठान भवन भाजप कार्यालय येथे जिल्ह्यामध्ये आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने तुळजापूरमध्ये भाजपच्या पहिल्या नगरसेविका डॉ. अनुजा अजितराव परमेश्वर निश्चित झाल्याने आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. अनुजा परमेश्वर या स्वतः डॉक्टर असून त्यांच्या माध्यमातून आपल्या तुळजापूरची सेवा होणार आहे. तुळजापूरच्या विकासाचं आपण हाती घेतलेलं महत्त्वाकांक्षी कार्य पूर्ण करण्यास त्यांचं मोठे सहकार्य लाभणार आहे, अशी आशा आ. पाटील यांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केली. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नेहा काकडे, नितीन काळे, नेताजी पाटील, नितीन भोसले यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### धाराशीव शहरात गुटखा जप्त

**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

धाराशीव शहर पोलीसांनी इंद्रानगर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक-संजा रोड येथे दि.८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ४.४५ वा. सुमारास गुटखा बाळगणाऱ्या दोन व्यक्तींवर कारवाई केली. रोहित संजय पवार, वय २३ वर्षे, रा. इंद्रानगर, धाराशीव, जाकीर बाबु ताबोल, वय ४५ वर्षे, रा. आगडगळी, धाराशीव या दोघांकडून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला खालील गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. जप्त मालाची एकूण किंमत १,७१० इतकी आहे. या प्रकरणी धाराशीव शहर पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### उमरगा : न्यायालयासमोरून मोटरसायकल चोरी

**उमरगा, दि.२१ नोव्हेंबर -**

फिर्यादी बसवराज लगया गुंडेदार, वय २४ वर्षे, रा. धनगरवस्ती, गजुंठोटा, ता. उमरगा यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची अंदाजे २०,००० किंमतीची क्शो कंपनीची (चक २५ ध १८११) मोटारसायकल चोरीला गेली आहे. दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.४० वा. सुमारास मोटरसायकल उमरगा न्यायालय गेटसमोर उभी केलेली असताना अज्ञात इसमाने ती चोरून नेली, असे फिर्यादीने नमूद केले आहे. फिर्यादी बसवराज गुंडेदार यांनी ही प्रथम तक्रार दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी उमरगा पोलीस ठाण्यात दिली. या प्रकरणी उमरगा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

### चारचाकीच्या धडकेत पादचारी युवकाचा मृत्यू

**वाशी, दि.२१ नोव्हेंबर -**

मयताचे नाव अजित पुषोतम बाबवे, वय २६ वर्षे, रा. खोमणवाडी, ता. केज, जि. बीड असे आहे. दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ७.३० ते ८.०० वा. सुमारास अजित बाबवे हे पिपळगाव पाटाजवळ एनएच-५२ रस्ता ओलांडत असताना ही घटना झाली. चक १३ उढ ७४७३ क्रमांकाची चारचाकी गाडी वेगाने आणि निष्काळजीपणे चालवून चालकाने अजित बाबवे यांना धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला.

# युवा नेतृत्वामुळे शिवसेना (उबाठा) पक्ष मजबूत स्तितीत!

## ऋषिकेश मगर आणि सुजित हंगरगेकर यांच्यामुळे तुळजापूर तालुक्यात शिवसेनेला बळकटी...











**तभा वृत्तसेवा/अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेच्या तुळजापूर तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात नवचैतन्य संचारण्यास सुरूवात झाली आहे. युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे ऋषिकेश मगर आणि सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुजित हंगरगेकर यांच्या पक्षप्रवेशामुळे तालुक्यात संघटनेला मोठी ताकद मिळाल्याचे चित्र समोर येत आहे.

तुळजापूर तालुका हा राजकीयदृष्ट्या संवेदनशील आणि स्पर्धात्मक आहे. येथे युवकांचा सहभाग वाढला तर आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेला निर्णायक वाढ मिळू शकते. खा. ओमराजे निंबाळकर तुळजापूर तालुक्यात शिवसेना (उबाठा) पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील असून या दोघांच्या सक्रियतेमुळे खासदार ओमराजेंची राजकीय पकड अधिक मजबूत होत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. ऋषिकेश मगर आणि सुजित हंगरगेकर यांच्यामुळे स्थानिक पातळीवर राजकीय समीकरण बदलताना दिसत आहे. या नेतृवाचा प्रभाव मुख्यतः युवकांमध्ये आणि तालुक्यातील महत्त्वाच्या गावांत असल्याने, त्यांच्या प्रवेशामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चेली जात आहे.

तुळजापूर तालुक्यातील शिवसेना (उबाठा) संघटनेला गेल्या काही महिन्यांपासून सक्रिय नेतृत्वाची आवश्यकता होती. ऋषिकेश मगर आणि सुजित हंगरगेकर यांच्या प्रवेशामुळे ग्रामीण भागातील शिवसैनिकांना नवे नेतृत्व मिळाले आहे. दोघेही कार्यकर्ते सामाजिक जाणिवा, युवकांमधील लोकप्रियता आणि संघटन कौशल्यासाठी प्रसिद्ध आहेत. तुळजापूर तालुक्यात युवा नेतृत्वाच्या वाढत्या पाठिंब्यामुळे शिवसेना (उबाठा) पक्षाला मिळणारी गती ही थेट खा. ओमराजे निंबाळकर यांची ताकत वाढवणारी ठरणार आहे. ऋषिकेश मगर आणि सुजित हंगरगेकर यांसारख्या प्रभावी युवा कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश संघटनेला मिळालेली मोठी शक्ती मानली जात आहे. खा. ओमराजे निंबाळकर यांची ओळख जनतेचा आपला हक्काचा खासदार म्हणून राहिली आहे. त्यांच्या लोकसंपर्क शैलीमुळे युवकांमध्ये त्यांचा मोठा प्रभाव आहे. या नव्या युवाशक्तीच्या प्रवेशामुळे त्यांच्या नेतृत्वाला जमिनीवर नवे कार्यकर्ते मिळणार असून बूथ ते तालुका स्तरावर संघटना मजबूत होत आहे.

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर तालुका राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. तालुक्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष संघटनेला अखेर अपेक्षित ऊर्जा मिळाली आहे. मागील काही महिन्यांपासून संघटनेत नवीन रक्ताची गरज भासत होती. त्याच पार्श्वभूमीवर युवा नेतृत्वाचा वाढता सहभाग, नव्या कार्यकर्त्यांची सक्रियता आणि पक्षात होत असलेले प्रवेश यामुळे शिवसेनेची ताकद तालुक्यात वाढल्याने पक्ष नेतृत्वाचा आत्मविश्वास वाढला दिसून येतोय. ऋषिकेश मगर यांची राजकीय वाटचाल दिशादर्शक राहिली असून हजरजबाबी युवा नेतृत्व म्हणून पाहिले जाते. या प्रवेशामुळे तालुक्यातील तरुणाईत जणू नवा जोश आणि आत्मविश्वास पसरला आहे. त्यांच्या उत्साही नेतृत्वशैलीमुळे अनेक तरुण कार्यकर्ते पुन्हा संघटनेशी जोडले जात आहेत. तुळजापूर शहरासह ग्रामीण भागाशी जनसंपर्क मोठ्या प्रमाणात असून खासदार ओमराजे आणि जिल्हा प्रमुख आ. कैलास पाटील यांच्या साथीने शिवसेना (उबाठा) पक्षाला गती मिळत आहे. युवकांचा सहभाग वाढणे, नवीन शाखा विस्तारणे, बूथ स्तरावर संघटना मजबूत करणे आदीवर काम करणार असल्याचे मगर यांनी तरुण भारतशी बोलताना सांगितले.

सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुजित हंगरगेकर यांच्या प्रवेशामुळे राजकीय समीकरणात एक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणला आहे. ग्रामीण भागात शिवसेनेची ताकद लक्षणीय वाढली असून, पक्षाच्या संघटनाला नवचैतन्य मिळत आहे. ग्रामीण प्रश्नांवर बोलणारे, गावपातळीवरील समस्यांना भिडणारे आणि सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्यांमध्ये लोकप्रिय असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. हंगरगेकर यांची सरपंच परिषदेतील सक्रिय भूमिका लक्षात घेता, अनेक गावांचे सरपंच आणि स्थानिक प्रतिनिधी शिवसेनेकडे आकर्षित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संघटनात्मकदृष्ट्या हा घटक शिवसेनेसाठी मोठा फायदा ठरू शकतो.

# परंडा नगरपरिषद निवडणुकीत चुरशीची लढत

## सौदागर विरुद्ध पाटील यांच्यात थेट सामना...



**तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब पाटील**
**परंडा, दि.२१ नोव्हेंबर -**

परंडा नगरपरिषदेच्या निवडणुकीचे राजकीय वातावरण गेल्या महिनाभरापासून तापले असून, उमेदवारी अर्जांच्या छाननीवेळी उद्भवलेल्या वादामुळे दोन गटांमध्ये बाचाबाची होऊन तुंबळ हाणामारी झाल्याने वातावरणात आणखीच तणाव निर्माण झाला होता.

नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी तब्बल १३० अर्ज, तर नगराध्यक्ष पदासाठी ८ अर्ज दाखल झाले. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी माघार घेतली. नगराध्यक्ष पदाचे ६ उमेदवार तसेच प्रभाग क्र. १ ते १० मधील नगरसेवक पदाचे उमेदवार यांनी अर्ज मागे घेतल्याने निवडणुकीचे रिंगण मोठ्या प्रमाणावर आटोपले आहे.

आता नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना (शिंदे गट) पॅनेल प्रमुख जाकिरभाई सौदागर आणि जनशक्ती विकास आघाडीचे उमेदवार विश्वजीत ज्ञानेश्वर पाटील यांच्यात थेट आणि चुरशीची लढत रंगणार आहे. प्रभाग १ ते १० मध्ये ४३ उमेदवार रिंगणात असून, ही निवडणूक अतिशय अतितटीची होणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

या निवडणुकीत शिंदे गटाच्या विरोधात भाजप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), काँग्रेस तसेच जनशक्ती विकास आघाडी असे अनेक पक्ष एकत्र आघाडीच्या स्वरूपात उभे राहत असल्याचे चित्र दिसत आहे. उद्या (शनिवार) पासून प्रचाराची खरी रणधुमाळी सुरू होणार असून, निवडणूक आयोगाचे सर्व बूथ कर्मचारी मतदान तयारीसाठी सज्ज झाले आहेत.

### परंडा नगरपरिषद : प्रभागनिहाय उमेदवारांची अंतिम यादी

**प्रभाग क्र. १ अ :** सुवर्णा तानाजी बनसोडे, मीनाक्षी लक्ष्मीकांत बनसोडे, रत्नमाला राहुल बनसोडे, आदिका सुभाष पालके. **प्रभाग क्र. १ ब :** श्रीकृष्ण कुमार विधाते, संजय विजय घाडगे. **प्रभाग क्र. २ अ :** रुक्सानाबेगम रहिमतुल्ला पठाण, फरजानाबी खाजा मुजावर. **प्रभाग क्र. २ ब :** इस्माईल अब्दुलसत्तार कुरेशी, सरफराज महमद शरीफ कुरेशी. **प्रभाग क्र. ३ अ :** परवीन मन्नान बासले, गुलनार शब्बीरखां पठाण. **प्रभाग क्र. ३ ब :** मदनसिंह सुभाषसिंह सद्दीवाल, मदन मिलिंद दिक्षित. **प्रभाग क्र. ४ अ :** मदिनाबी खाजा पठाण, जैतुनबी गौसखा पठाण. **प्रभाग क्र. ४ ब :** समरजितसिंह सुजितसिंह ठाकुर, नवनाथ एकनाथ कसबे, अजीम न. जाकेर सौदागर. **प्रभाग क्र. ५ अ :** नंदा श्रीमंत जाधव, शमीन रशीद तांबोळी. **प्रभाग क्र. ५ ब :** रईसोददीन तमिजोददीन मुजावर, सत्तार गुलाबखा पठाण. **प्रभाग क्र. ६ अ :** जयंत श्रीरंग शिंदे, अनिल महादेव शिंदे. **प्रभाग क्र. ६ ब :** वैशाली सोमनाथ आल्बत्ते, मनीषा सोमनाथ मेहेर. **प्रभाग क्र. ७ अ :** अब्बास उमर मुजावर, इरफान जब्बार शेख. **प्रभाग क्र. ७ ब :** रुखियाबी जकेरिया दहेलुस, कमल अरूण जगताप. **प्रभाग क्र. ८ अ :** गुले इरम नूरोददीन चौधरी, म. सवेर म. इस्माईल सौदागर. **प्रभाग क्र. ८ ब :** शोभा नवनाथ जाधव, अमिनाबी अब्रार नुजावर. **प्रभाग क्र. ९ अ :** हसीना मतीन पठाण, मन्नानी मतीन जिनेरी. **प्रभाग क्र. ९ ब :** उमाकांत शंकर गोरे, चंद्रकांत नाना गायकवाड. **प्रभाग क्र. १० अ :** ज्योती धनंजय सोनटक्के, वनमला रामा शिंदे. **प्रभाग क्र. १० ब :** रमेशसिंह गोकुळसिंह परदेशी, मोहसीन जाकीर सौदागर.

## उसाला ३५०० रुपयांची पहिली उचल देण्याची स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

### ढोकी येथे रास्ता रोको आंदोलन...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील साखर कारखानदार तसेच गुळ पावडर उत्पादन करणाऱ्या कारखानदारांनी चालू हंगामातील एफआरपी जाहीर न करता ऊस गाळप सुरू केल्याच्या निषेधार्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे ढोकी येथे शुक्रवारी (दि.२१) मुख्य चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे यांनी केले.

इंगळे म्हणाले की, उसाला किमान ३५०० रुपये पहिली उचल मिळाल्याशिवाय शेतकरी समाधानी होणार नाहीत. प्रशासनाने तातडीने दर जाहीर केला नाही तर यापेक्षा तीव्र आंदोलन उभे केले जाईल. संघटनेने यापूर्वी ५ ऑक्टोबर व ११ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी व तहसीलदारांना निवेदने देऊन एफआरपी जाहीर करण्याची मागणी केली होती. परंतु प्रशासनाने दखल न घेतल्याने आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला.

जिल्ह्यातील काही कारखानदारांनी गाळप परवाना न घेता ऊस तोडणी सुरू केली. रिकव्हरी चोरी, काटामारी, एफआरपीचे तुकडे करून दर ठरवणे. असा खुला भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला. इंगळे म्हणाले की, साखर सम्राटांच्या बगलबच्च्यांनी शेतकऱ्यांच्या अन्नात अक्षरशः माती घातली आहे, आणि प्रशासन त्यांची बघ्याची भूमिका घेऊन साथ देत आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने स्पष्ट इशारा देताना सांगितले की, उसाचा योग्य दर न जाहीर केल्यास येणाऱ्या काळात आणखी मोठे व तीव्र आंदोलन छेडले जाईल. शेतकऱ्यांची पिळवणूक आता सहन केली जाणार नाही.

या रास्ता रोको आंदोलनात जिल्हा संपर्कप्रमुख शहाजी सोमवंशी, धनाजी पेंदे, विष्णूदास डाळे, सचिन ठेले यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### अवैध वाळू उपसा प्रकरणी दोन आरोपींवर गुन्हा नोंद

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ नोव्हेंबर -**

परंडा तालुक्यातील वडणेर शिवारात अवैध वाळू उपसा करीत असताना शासन अधिकाऱ्यांच्या कारवाईस अडथळा आणून ट्रॅक्टर घेऊन पळून जाणाऱ्या दोन आरोपींविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मेहबुब इकबाल आत्तार (वय ३७), ग्राममहसुल अधिकारी, सज्जा सोनारी, अतिरिक्त देवगाव खु. यांच्या तक्रारीनुसार, दि.२० नोव्हेंबर रोजी पहाटे २.५३ वा. उपविभागीय दंडाधिकारी भुम तथा तहसीलदार काकडे यांनी वडणेर शिवारातील गोशाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर छापा टाकला. यावेळी आरोपी भारत जानकर (रा. वडणेर) व अमर चौधरी (रा. देवगाव खु.) हे स्वराज कंपनीचा ७४४ ट्रॅक्टर-ट्रॉलीमध्ये अंदाजे सव्वा ब्रास वाळू (किंमत सुमारे ७,५००) एवढा अवैधरीत्या उपसा केलेला वाळू घेऊन जात असल्याचे दिसले. अधिकाऱ्यांनी थांबवून विचारणा केली असता दोघा आरोपींनी शासनाच्या रेती चोरांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत अडथळा निर्माण करत पळ काढला.

# शहापूर मतदार संघात अनुसूचित जाती पुरुषांसाठी आरक्षण; स्थानिक उमेदवारांची लगबग सुरु

## तिकीट मिळवण्यासाठी उमेदवाराची संबधित पक्षाकडे धावपळ

**तभा वृत्तसेवा / श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि.२१ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील शहापूर मतदार संघात अनुसूचित जातीच्या पुरुषांसाठी आरक्षण पडले आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी आपापल्या कौशल्यांनी मतदार संघात लोकांच्या भेटीगाठी सुरू केल्या असुन तिकीट मिळवण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडे उमेदवाराची रेलचेल सुरू आहे, मात्र मतदार संघात स्थानिक उमेदवारांना संधी मिळावी असंच कार्यकर्त्यांकडून बोललं जात आहे.

शहापूर मतदार संघात शहापूर व येवती गण आहेत. या गटात शहापूर, देवसिंगा, केशेगाव, सराटी, गुळहल्ली, नीलेगाव, येवती, बाभळगाव, केरूर, शिरगापूर, फुलवाडी, इटकळ, आरबळी, दिंडेगाव, हिप्परगा, उमरगा, अशी सतरा गावे असुन, तांडे, वाड्या वस्त्यांवर मतदार मोठ्या प्रमाणात आहेत. भौगोलिक दृष्ट्या हा मतदार संघ अतिशय क्लिष्ट व किचकट आहे. तसेच सातत्याने बदल करणारा हा मतदार संघ आहे. आजपर्यंत भारतीय जनता पक्ष कधीच या मतदार संघात विजयी झाला नसून यावेळी काय चमत्कार होणार हे सांगता येत नाही. या मतदार संघात या आगोदर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत. मराठा, मुस्लिम, लिंगायत समाजाचे वर्चस्व दिसून येते. जवळपास या मतदारसंघात चोवीस हजार मतदार असुन ज्या कुण्या उमेदवारांनी आठ हजारचा आकडा ओलांडला असेल तोच विजयी उमेदवार ठरणार आहे.

या शहापूर गटातून २००२ च्या निवडणुकीत शिवसेनेकडून राजअहमद पठाण विरुद्ध काँग्रेसचे नानासाहेब चव्हाण लढतींमध्ये राजअहमद पठाण विजयी झाले. २००७ च्या निवडणुकीत काँग्रेसचे वसंतराव वडगावे विरुद्ध राजअहमद अशी लढत झाली होती त्यात वसंतचीच पसंत ठरवून त्यांनी विजय मिळवला. २०१२ मध्ये काँग्रेसच्या लक्ष्मी गायकवाड विरुद्ध राष्ट्रवादीच्या अस्मिता कांबळे या लढतीत अस्मिता कांबळे यांनी बाजी मारली तर २०१७ मध्ये काँग्रेसच्या सालेहा मुजावर विरुद्ध शिवसेनेच्या सविता सोनटक्के यांची काट्याची टक्कर होऊन सालेहा मुजावर या विजयी झाल्या.



२०२५ च्या होऊ घातलेल्या निवडणुकीत शहापूर गटात अनुसूचित जाती पुरुष हे आरक्षण पडले असुन इच्छुक उमेदवारांनी मतदार संघात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. तर काही गेटकेन इच्छुक उमेदवार गावोगावी फिरून आपली हवा निर्माण करीत आहेत.

आरक्षण जाहीर झाल्यापासून महायुती व महाविकास आघाडीमध्ये युती होणार आहे का? शहापूर गटात महायुतीकडून भाजपा, शिवसेना (शिंदे गट) राष्ट्रवादी अजीत पवार गट, यापैकी जागा कुणाला सुटणार तर महाविकास आघाडीतील काँग्रेस की शिवसेना उबाठा की, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या उमेदवाराला ही जागा सुटणार आहे याची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असुन कार्यकर्ते वरिष्ठ नेत्याकडे आपली कस, क्षमता दाखवून पायघड्या घालत आहेत. सध्याची परिस्थिती पाहता काँग्रेसच्या सालेहा मुजावर या जिल्हा परिषदेच्या चालू उमेदवार असल्याने महाविकास आघाडीतील नेत्यांनी युती कायम करुन सर्वोतोपरी विचार करून ही जागा काँग्रेसला द्यायची की शिवसेना उबाठाला द्यायची, तसेच महायुतीमध्ये कुणाला जिल्हा परिषद, कुणाला पंचायत समितीची सिट द्यायची हे काही दिवसातच कळेल. सध्या तरी भारतीय जनता पक्षाच्या लक्ष्मण क्षीरसागर, लिंबाजी सुरवसे, राहुल बागडे, नितीन कांबळे, काँग्रेसच्या वतीने दयानंद काळुंके, चंद्रकांत बनसोडे, शिवसेना शिंदे गटाकडून नुकतेच प्रवेश केलेले देवानंद रोचकरी यांचे विश्वासू शिवाजी कांबळे, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाकडून कचरू सगट, गणेश कांबळे, दयानंद काळुंके, बाळू वाघमारे आदी नावांची चर्चा असून कोणाला उमेदवारी मिळणार? युती, आघाडी होणार की नाही या प्रश्नांची उत्तरे लवकरच मिळतील. जशी जशी निवडणूक जवळ येईल तसे तसे वातावरण गरम होणार असून सर्वच पक्षाकडून सध्या जोरदार फील्डिंग लावली जात आहे.

एकंदरीत स्थानिक उमेदवारांना तिकीट मिळावे, निवडणूक लढण्याची संधी मिळावी, अशी शहापूर मतदार संघातील मतदाराची धारणा आहे.

### चर्चेतील चेहरा...

गुळहल्ली येथे जन्मलेले, बाभळगाव येथे राहणारे, उच्च शिक्षण घेतलेले. जयमल्हार सामाजिक कार्यकर्ते, कलाकार दयानंद काळुंके यांनी या मतदार संघातून निवडणूक लढवण्यासाठी जोरदार तयारी केली असून त्यांचा या मतदार संघात मोठ्या प्रमाणात संपर्क आहे. त्यांनी सध्या मोठ्या प्रमाणात गावभेटी, दौरे चालू केले आहेत. त्यांना आपलाच मतदार संघ आपलाच उमेदवार म्हणून उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. एक अभ्यासू, संपूर्ण शहापूर मतदार संघाची खडा न खडा माहिती असलेले, सर्वसामान्यांचा चेहरा म्हणून ते या मतदार संघात परिचित आहेत. त्यांनी काँग्रेस व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाकडे उमेदवारी मागितली असून त्यांना योग्य त्या पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यास त्या पक्षाला त्यांचा फायदा होणार असून येणाऱ्या काळात काय घडामोडी घडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


धाराशिव न.प. जागा वाटपात शिवसेनेला धक्का...

# भाजप नेते राणाजगजितसिंह पाटील यांनी पाठीत खंजीर खुपसला : सुरज साळुंके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

धाराशिव नगरपरिषद निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीमध्ये जागावाटपावरून निर्माण झालेल्या तणावाने गुरुवारचा दिवस राजकीयदृष्ट्या तापला. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शिवसेनेला धोका दिल्याचा आरोप जिल्हा प्रमुख सुरज साळुंके यांनी केला. या घडामोडीमुळे शिवसेनेने स्वबळावर लढण्याची तयारी दाखविली आहे.

नगरपरिषद निवडणुकीसाठी भाजप नेते राणाजगजितसिंह पाटील आणि पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या चर्चेनंतर १७ जागा आणि काही सभापती पदे शिवसेनेला देण्याचा फॉर्म्युला ठरला होता.



२०१६ च्या निवडणुकीत नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष ही दोन्ही पदे शिवसेनेकडे होती. त्यामुळे या वेळीही ही पदे देण्याची मागणी शिवसेनेकडून होती. परंतु युती धर्म जपत शिवसेनेने तडजोड केली आणि फक्त १७ जागांवर लढण्यास मान्यता दिली.

सुरज साळुंके म्हणाले, आमच्याकडे नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी तब्बल ४१ इच्छुक असताना आम्ही युतीधर्म पाळत १७ जागांवर उमेदवार उभे करण्याचे मान्य केले.

मात्र, ऐनवेळी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी आम्हाला २ किंवा ४ जागा घ्या असे सांगण्यात आले. प्रत्यक्षात भाजपने १७ जागांवर आपलेच उमेदवार कायम ठेवले. हा स्पष्ट धोका आहे, पाठीत खंजीर खुपसल्यासारखे आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेनेची धोरणात्मक बैठक बोलावण्यात येणार असून स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय होण्याची दाट शक्यता जिल्हाप्रमुखांनी व्यक्त केली. या वेळी शहरप्रमुख आकाश कोकाटे व डी. एन. कोळी उपस्थित होते.

धाराशिवच्या निवडणुकीत या घडामोडींमुळे शिवसेना-भाजप युतीत मोठी दरी निर्माण झाली असून आगामी राजकीय समीकरणांवर याचा थेट परिणाम होणार आहे.

# वाघोली शिवारात मजुराची लोखंडी पाइपने हत्या; दोघे जखमी

## ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

वाघोली शिवारातील अजमेरा स्टोन क्रेशर येथे राहत्या पत्र्याच्या शेडमध्ये गुरुवारी पहाटे मजुरांमध्ये झालेल्या वादातून एकाची हत्या तर दोघेजण गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी धाराशिव ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.




दि.२० नोव्हेंबर रात्री ३.३० वाजता सुमितकुमार सत्येंद्र सिंग रा. उपर हटिया पिठ्याटोली, ता. जगन्नाथपुर, जि. रांची (झारखंड) ह.मु. डी.सी. अजमेरा स्टोन क्रेशर, वाघोली, जि. धाराशिव याने लैंगिकतेवरून चिडवण्याच्या कारणावरून सहकारी मजुरावर अचानक हल्ला केला.

सुनिल गांगु कुजुर (वय ३१) रा. उपर हाटीया पिठ्याटोली, ता. जगन्नाथपुर, जि. रांची, ह.मु. अजमेरा स्टोन क्रेशर, वाघोली यांच्या डोक्यात चौकोनी लोखंडी पाईपाने मारहाण करून त्यांचा जागीच मृत्यू झाला. धनेश खासा मुंडा, रा. उपर हाटीया पिठ्याटोली, रांची यांच्यावरही लोखंडी पाइपाने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. मागन करोम लोहरा (वय ६७ वर्षे) रा. पुर्णानगर आडकी, जि. खुटी, ह.मु. उपर हाटीया (झारखंड) फिर्यादी असून त्यांनाही मारहाण करून जखमी केले. फिर्यादी मागन लोहरा यांनी दिलेल्या प्रथम खबरीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.


पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे.

# लोहपुरुषांच्या १५० व्या जयंतीनिमित्त धाराशिवमध्ये 'युनिटी मार्च' उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त धाराशिव जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'युनिटी मार्च' (एकता रॅली) पदयात्रा आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

कार्यक्रमाची सुरुवात श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे करण्यात आली.



यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला सुरुवात केली. राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्व उपस्थितांनी 'आत्म निर्भर भारत संकल्प' ही शपथ घेतली.

या कार्यक्रमात जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे, दत्तप्रसाद जंगम, भारत देवगुडे, विस्तार अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्रीमती तेलोरे यांनी केले.

पदयात्रा तुळजाभवानी स्टेडियमपासून नगरपरिषद मार्गे, पोलीस अधीक्षक कार्यालय रस्ता, कोहिनूर हॉटेल, दूरदर्शन केंद्र, समता कॉलनी असा मार्गक्रमण करत जिल्हा क्रीडा संकुल येथे सांगता झाली.

या पदयात्रेत छत्रपती शिवाजी हायस्कूल, व्यंकटेश महाजन महाविद्यालय, भाई उद्धवराव पाटील विद्यालय, शासकीय नर्सिंग व वैद्यकीय महाविद्यालय, आर्य चाणक्य विद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, आयटीआय यांसह विविध संस्थांमधील सुमारे ७०० विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी उत्साहाने सहभागी झाले.

पदयात्रा यशस्वी करण्यासाठी तालुका क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, तसेच नेहरू युवा केंद्राचे वैभव लांडगे, किशोर भोकरे, सुरेश कळमकर, व्यंकटेश दंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तुळजापूर नगरपालिका निवडणुकीत तिरंगी लढतीचे चित्र!

## विनोद गंगणे, अमर मगर, महंत इच्छागिरी यांच्यात होणार लढत...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ नोव्हेंबर -**





धाराशिव जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या तुळजापूर नगरपरिषद निवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी महंत इच्छागिरी महाराज यांनी आपला अर्ज कायम ठेवल्यामुळे आता नगराध्यक्ष पदासाठी भाजपाचे विनोद गंगणे, काँग्रेसचे अमर मगर आणि अपक्ष महंत इच्छागिरी महाराज यांच्यात तिरंगी लढत निश्चित झाली आहे.

महंत इच्छागिरी महाराजांची उमेदवारी कायम राहिल्यानंतर संपूर्ण राजकीय समीकरणे बदलल्याची चर्चा शहरात सुरू झाली आहे. तुळजापूरमधील ही निवडणूकिचे चित्र आता पूर्णपणे स्पष्ट झाले असून महंत इच्छागिरी महाराजांच्या उमेदवारी अपक्ष म्हणून कायम राहिल्यामुळे तिरंगी लढत होईल.

भाजपाचे विनोद गंगणे यांनी परवा रेकॉर्डब्रेक रॅली काढून आपली ताकद दाखवून दिली असून महाविकास आघाडीचे उमेदवार अमर मगर यांनी शहरात मतदारांच्या गाठी भेटीवरचा संवाद वाढवाला आहे. तर महंत यांच्या भूमिकेवर शहरातील दुरंगी लढत तिरंगी बनल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

नगराध्यक्ष पदासाठीची ही तिरंगी स्पर्धा आता अधिक रोचक आणि लक्षवेधी बनली आहे.

### नगराध्यक्ष पदासाठी अंतिम ७ उमेदवार

गंगणे विनोद विलासराव - महायुती (भाजप), मगर अमर अशोकराव महाविकास आघाडी (काँग्रेस), गिरीगोसावी महंत इच्छागिरी अपक्ष, शामराज विजय रमेश, पवार अविनाश राजेंद्र,

# खंडोबा यात्रेनिमित्त भक्तांचा महासागर

## खोबरे भंडाऱ्याची उधळण आणि दर्शनासाठी लंबी रांग....



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२१ नोव्हेंबर -**

यळकोट यळकोट जय मल्हार च्या जयघोषात, खोबरे भंडाऱ्याची मुक्त उधळण करत हजारो भक्तांनी अणदूर खंडोबा यात्रेत उत्साहात सहभाग नोंदवला. शुक्रवारी (दि. २१) पहाटेपासूनच दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. मंदिर परिसरात सुंदर भव्य रांगोळ्यांनी वातावरण भारावले होते.

श्री खंडोबा देवाची मुख्य मूर्ती स्थलांतराची ही महाराष्ट्रातील एकमेव परंपरा असून, अणदूर आणि नळदुर्ग गावांच्या एकात्मतेचे प्रतीक मानली जाणारी ही यात्रा विशेष महत्त्वाची आहे. पहाटे ४ वाजता काकड आरती झाल्यानंतर भाविकांनी आपली नवसपूर्ती करण्यासाठी दंडवत घालत दर्शन घेतले. सकाळी ठीक ९ वाजता श्रींचा महाअभिषेक, महावस्त्र व षोडशोपचार पूजा मोठ्या भक्तिभावाने पार पडली. दिवसभर दर्शन, उतळीभंडार अभिषेक, ओटी भरणे आणि खोबरे भंडाराची उधळण अशा विविध नवरसाया विधींनी मंदिर परिसर मंगलमय झाला होता. रात्री ९ वाजता 'श्री'चा छबिना निघाला. हालगीच्या तालावर वारू बेभान होऊन नाचू लागला, भक्तांनी मुक्तहस्ते खोबरे भंडारा उधळत यळकोट यळकोट जय मल्हार च्या घोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. हे दृश्य पाहणाऱ्यांसाठी अत्यंत विलोभनीय ठरले. रात्री १२ वाजता नळदुर्गचे मानकरी सवाद्य मिरवणुकीसह मंदिरात प्रवेश करून परंपरेनुसार लेखी करार करून श्रींची मूर्ती घेऊन जातात. शनिवारी पहाटे देव नळदुर्ग येथे दाखल झाला.

यात्रेच्या यशस्वीतेसाठी यात्रा कमिटीचे सदस्य आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम केले.

# सांजा जिल्हा परिषद मतदारसंघात नितीन शेरखाने यांची तगडी मोर्चेबांधणी

## गावोगाव बैठकींना उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

सांजा जिल्हा परिषद मतदारसंघात भाजपा नेते नितीन (बप्पा) शेरखाने यांनी मोर्चेबांधणीचा जोरदार धडाका लावला असून, गावोगाव बैठकांचे सत्र आणि थेट संवाद दौरे यामुळे त्यांच्या मोहिमेला लक्षणीय गती मिळाली आहे.

राजुरी (ता. धाराशिव) येथे गुरुवारी (दि. २०) सायंकाळी त्यांनी भेट देत तरुणांसह ग्रामस्थांची विस्तृत बैठक घेऊन संवाद साधला. मागील काही दिवसांत शेरखाने यांनी सांजा, मेडसिंगा, महाळंगी, चिखली आदी अनेक गावांमध्ये सलग बैठका घेतल्या आहेत.



प्रत्येक बैठकीत स्थानिक नागरिक, युवक, महिला बचत गट, शेतकरी आणि विविध समाजघटकांचा उल्लेखनीय सहभाग दिसून येत असून, शेरखाने यांची संवादशैली, मुद्देसूद मांडणी आणि थेट कार्यपद्धती ही त्यांच्या दौऱ्याची ठळक वैशिष्ट्ये ठरत आहेत.

बैठकांमध्ये त्यांनी पाणीप्रश्न, रस्ते, आरोग्यसेवा, शेती, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी या प्रमुख प्रश्नांवर स्पष्ट भूमिका मांडली. मतदारसंघाचा विकास कागदावर नाही, प्रत्यक्षात दिसेल हेच आमचे ध्येय, असे सांगत त्यांनी क्रिकेटच्या भाषेत, सध्या मैदानात 'अटॅकिंग मोड' सुरू असल्याचे स्पष्ट केले.

या दौऱ्यात डॉ. सिद्धेश्वर जाधव, शाहरुख सय्यद, जावेद शेख, तोफिक पठाण यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. विविध समाजघटकांचा हा वाढता पाठिंबा हीच शेरखाने यांच्या मोहिमेची खरी ताकद ठरत असल्याचे निरीक्षण व्यक्त केले जात आहे.

## उमरगा येथील आरटीओचे शिबीर आता २५ नोव्हेंबर रोजी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

नागरिकांच्या सोयीसाठी दरमहा आयोजित करण्यात येणारे तालुकास्तरीय शिबीर कार्यालय उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांचेकडून घेण्यात येते. नोव्हेंबर २०२५ या महिन्यात उमरगा येथे २८ नोव्हेंबर रोजी होणारे शिबीर कार्यालय प्रशासकीय कारणास्तव बदलण्यात आले असून आता ते २५ नोव्हेंबर रोजी, पूर्वनियोजित ठिकाणीच तालुका उमरगा येथे आयोजित केले जाईल,असे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,धाराशिव यांनी कळविले आहे.

# मंगरूळ जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थी समिती स्थापन

## चित्तरंजन सरडे अध्यक्ष, लक्ष्मण माळी पाटील उपाध्यक्ष

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२१ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे मंगरुळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी विद्यार्थी समितीची स्थापना बुधवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. यात अध्यक्षपदी चित्तरंजन सरडे तर उपाध्यक्षपदी लक्ष्मण माळी पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

शाळा व शाळेच्या परिसराची देखभाल, शाळेतील विविध समस्यांचे निराकरण, ग्रामस्थ व पालक यांच्यात समन्वय साधून शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे या उद्देशाने ही समिती गठीत करण्याचे आदेश शासनाने मुख्याध्यापकांना दिले होते. त्यानुसार मुख्याध्यापक गणेश तनपूरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन सदस्य निवड प्रक्रिया पार पडली. सर्व सदस्यांच्या सर्वानुमते अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडून देण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष साठे यांनी केले तर आभार भोसले सर यांनी मानले. या उपक्रमासाठी सहशिक्षक साखरे, साठे, शिक्षिका सरडे व भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले.



### माजी विद्यार्थी समितीचे निवडलेले सदस्य

चित्तरंजन सरडे अध्यक्ष, लक्ष्मण माळी पाटील उपाध्यक्ष, गणेश तनपुरे सचिव, सदस्य : आप्पासाहेब जेटीथोर, आदमशा फकीर, मनोज डोंगरे, चांदसाहेब शेख, महादेव साठे, सुरेश लबडे, चैताली हजारे, अनिता शिनगारे, संगीता डोंगरे, सयाजी शिंदे, भागवत सरडे, शाम साठे, सौदागर जाधव, नशीब शेख, बाळासाहेब दुलांगे, अभिमन्यू सगट, सुहास जेटीथोर.

# युवकांमध्ये प्रचंड क्षमता; आत्मविश्वासाने मंच गाठा : जिल्हाधिकारी कीर्ती पुजार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

जिल्ह्यातील युवकांमध्ये प्रचंड क्षमता आहे. स्पर्धांमध्ये उत्कृष्टता साधून राज्य आणि देशपातळीवर जिल्ह्याचे नाव उज्वल करा. प्रत्येक कलाप्रकार हा आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाचा मार्ग आहे. आत्मविश्वासाने मंचावर उतरा आणि तुमचे उत्तम कौशल्य जगासमोर मांडा, असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

**जिल्हास्तर युवा महोत्सवाला उत्साहपूर्ण सुरुवात**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सव २०२५-२६ ची पुष्पक मंगल कार्यालय,धाराशिव येथे २० नोव्हेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दीपप्रज्वलन करून केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागेश मापारी, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे व तुळजापूर येथील तुळजाभवानी अभियंत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य ओमप्रकाश रांजणकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. जिल्हा युवा महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समूह लोकगीत, समूह लोकनृत्य, चित्रकला, कथा लेखन, कविता लेखन, वक्तृत्व अशा विविध कलाप्रकारांसोबतच कौशल्य विकास व नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) यांनाही विशेष स्थान देण्यात आले आहे.विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात एकूण ३५ प्रकल्प सादर झाले असून त्यातून जिल्हा पातळीचा संघ निवडून विभागीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र तज्ज्ञ परीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश पवार, तालुका क्रीडा अधिकारी यांनी केले. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले. भैरवनाथ नाईकवाडी, तालुका क्रीडा अधिकारी, अक्षय बिरादार, क्रीडा अधिकारी, राजेश बिलकुले, सुनील घोगरे, किशोर भोकरे, नितिन आडसकर, सुरेश कळमकर व व्यंकटेश दंडे आदी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण सहकार्य करत आहे.

# श्री क्षेत्र वाशी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ नोव्हेंबर -**

श्री क्षेत्र वाशी, जिल्हा धाराशिव येथे श्री सदगुरू कै. ह.भ.प. तात्यासाहेब वासकर महाराज, सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज, श्री क्षेत्र चाकरवाडी तसेच वै. ह.भ.प. साताप्पा महाराज थोबडे यांच्या कृपाशिर्वादाने भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा मार्गशीर्ष शु. १, शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर ते मार्गशीर्ष शु. ८, शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ७:३० ते ९:३० पारायण, १० ते ११:३० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १२ ते १ भोजन, दुपारी २ ते ४ गाथा-भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन आणि मध्यरात्री १२ ते पहाटे ४ हरीजागर असे कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात होणार आहेत.

या धार्मिक महोत्सवात ह.भ.प. गोविंद महाराज मुंडे (परळी वैजिनाथ), ह.भ.प. गोपाळ अण्णा वासकर (वाशी), ह.भ.प. कृष्णनाथ महाराज कुंभार (शिराळा), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे (नेवासा), ह.भ.प. वेदांताचार्य नवनाथ महाराज राऊत (निमगाव), ह.भ.प. कबीर महाराज आत्तार, ह.भ.प. कृष्णा महाराज पोद्दार (पंढरपूर) यांचे कीर्तन होणार आहे. तसेच ह.भ.प. चिंतामणी महाराज घोडके (पंढरपूर) यांचे सकाळी १० ते १२ काल्याचे कीर्तन, तर ह.भ.प. नामदेव महाराज वासकर यांचा काला अभंग, काला वाटप व त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.



वाशी, सारोळा-वाशी, सोनेगाव, कनेरी, कवडेवाडी, केळेवाडी, गोलेगाव, पारडी, शेंडी, तांदुळवाडी, जवळकाव, गोजवडा, लाखनगाव, इंदापूर, इसरूप, खानापूर, बावी, धामणगाव, कडकनाथवाडी या गावांत हरीजागर होणार आहे.

सप्ताहातील अन्नदानाची सेवा संतोष ढवळे, पद्मराज गपाट, देविदास मस्कर, भाऊसाहेब जगताप, शहाजी कागदे, दत्तात्रेय कागदे, राजेंद्र साळुंके, मच्छिंद्र माने, शैलेश साळुंके, विठ्ठल साळुंके, भारत कवडे, श्रीधर पवार, ॲड. कोठावळे, डॉ. दत्तात्रेय कवडे, किशोर माने यांच्या वतीने होणार आहे. तसेच पांडुरंग शिंदे, बागवान पुणेकर, बाबासाहेब पवार, रामेश्वर लगास, विठ्ठल भाळवणे, अण्णासाहेब घुले, किसनराव कवडे हे अल्पोपहार देणार आहेत.

शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता श्री ग्रंथराजाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण सप्ताहाचे सर्व कार्यक्रम काळा मारुती मंदिर, तहसील रोड, वाशी येथे आयोजित असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले.

# नळदुर्ग नगरपालिकेत 'मलिदा गँग' हद्दपार करण्याची मतदारांची तयारी

## विकासकामे अर्धवट राहिल्याने असंतोष तीव्र

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ नोव्हेंबर -**

नळदुर्ग (विलास येडगे) नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत मलिदा गँग हद्दपार करण्याचा निर्णय शहरातील मतदारांनी घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक कामात मलिदा लाटुन शहर विकास कामाचे धिंडवडे काढणाऱ्यांचे ढाबे दणाणले आहेत.

नळदुर्ग शहरात सुरु असलेले अनेक विकास कामे आज अर्धवट अवस्थेत आहेत तर अनेक कामांचे टेंडर निघुनही त्यातील एकही काम अद्याप सुरु झालेले नाही याला जबाबदार नगरपालिकेत सक्रिय असलेली मलिदा गँग आहे. या मलिदा गँगच्या या धोरणामुळे आज शहर विकास कामांचा पार बोजवारा उडाला आहे. प्रत्येक कामात मलिदा लाटणे हेच काम या मलिदा गँगने केल्यामुळे आज शहराची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. शहरातील विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी येऊनही आज शहराची अवस्था पाहवत नाही. ऐतिहासिक शहर असतांना शहरात एकही रस्ता व्यवस्थित नाही याला जबाबदार कोण? हे शहरवासियांना माहित आहे. आज शहरात स्वच्छतेचे तीनतेरा झाले आहेत.

पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. रस्त्याच्या कामासाठी ९३ कोटी रुपयांचा निधी येऊनही त्या निधीतुन शहरातील एकाही रस्त्याचे काम झाले नाही ही मोठी शोकांतिका आहे.

वास्तविक पाहता याचा जाब शहरवासियांनी नगरपालिका निवडणुकीत संबंधित मलिदा गँगला विचारणे गरजेचे आहे. ही मलिदा गँग निवडुन आली तर पुन्हा शहराचे वाटोळेच होणार आहे. त्यामुळे या मलिदा गँगला नगरपलिका निवडणुकीतुन हद्दपार करुन मतदारांनी त्यांना त्यांची जागा दाखवुन देणे गरजेचे आहे.

आज जवळपास ४५ कामांची टेंडर प्रक्रिया पुर्ण होऊन जवळपास एक महिन्याचा कालावधी होत आला आहे मात्र यातील एकही काम अद्याप सुरु का झाले नाही? याला जबाबदार कोण? याचा जाब नगरपालिका निवडणुकीत शहरातील मतदारांनी विचारणे गरजेचे आहे. आता कुणाला निवडुन द्यायचे हे मतदारांच्या हातात आहे. त्यालाच निवडुन द्या जो प्रत्येक कामात मलिदा मिळण्याची अपेक्षा करत नाही. जो प्रामाणिकपणे शहराचा विकास करू शकतो अशाच उमेदवारांना मतदारांनी या निवडणुकीत निवडुन द्यावे तरच पुढच्या पाच वर्षात शहराचा सर्वांगीण विकास होऊन शहर स्वच्छ आणि सुंदर होऊ शकेल नाहीतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशीच अवस्था शहराची झाल्याशिवाय राहणार नाही.

त्यामुळे मतदारांनी आताच योग्य वेळी विचार करुन कुठल्याही भुलथापाना व अमिषाला बळी न पडता जो चांगला आहे मग तो कोणत्याही पक्षाचा असो त्याला




निवडुण देणे गरजेचे आहे.जोपर्यंत मलिदा गँग नगरपालिकेतुन हद्दपार होत नाही तोपर्यंत शहर विकास कामांसाठी कितीही निधी आला तर शहराचा विकास होणारच नाही हे शहरातील सुज्ञ नागरीकांनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

एकदा चुकीची माणसे नगरपालिकेत निवडुन गेले तर शहरविकास कामांचा बट्ट्याबोळ झालाच म्हणुन समाज. त्यामुळे योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन शहरवासियांनी सध्या होत असलेल्या नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष व नगरसेवक निवडुन देत असतांना ज्यांना शहराचा विकास करण्याचा ध्यास आहे अशाच उमेदवारांना निवडुन देणे गरजेचे आहे.

## झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंच्या जयंतीनिमित्त तेरणा अभियांत्रिकीत अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

मेरी झांसी नहीं दूँगी असा दृढनिश्चय व्यक्त करून आपल्या झाशी राज्याचे रक्षण करण्यासाठी राणी लक्ष्मीबाई यांनी दिलेला प्रखर आणि अद्वितीय लढा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला गेला आहे. राणीचे साहस, स्वाभिमान, धोरणी वृत्ती, चातुर्य आणि युद्धकौशल्य प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बेसिक सायन्स अँड ह्युमॅनिटीज विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. उषा वडणे चौगुले यांनी केले.

झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंच्या जयंतीनिमित्त तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. उषा वडणे चौगुले मार्गदर्शन करत होत्या.

कार्यक्रमास प्रा. सुनीता गुंजाळ, प्रा. वर्षा पाटील, सविता नलावडे, बिभीषण सिरसट यांची प्रमुख उपस्थिती होती. अक्षय माळी, सम्राट क्षीरसागर, हर्ष घुगे, जाधव स्वरूप, पृथ्वीराज गायकवाड, सत्यम पाटील, अभय वाघचौरे, ओंकार कुंभार यांनी आपापल्या भावना व्यक्त करून राणी लक्ष्मीबाईंच्या अदम्य पराक्रमास अभिवादन केले.



## जयप्रकाश विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींची राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दोन विद्यार्थिनींची राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या निबंध स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर, तसेच समाज कल्याण विभाग धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. जिल्ह्यातील सर्व शासकीय वस्तीगृहे व निवासी शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

या स्पर्धेत रुईभर येथील जिजामाता मुलींच्या वस्तीगृहातील खालील विद्यार्थिनींनी उत्तुंग यश संपादन केले.

यात सिद्धी पारवे (इ. १०वी) जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक, श्रावणी सोनटक्के (इ. १०वी) - जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक या दोन्ही मुली वस्तीगृहात राहून मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दोघींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिजामाता मुलींच्या वस्तीगृहाच्या अधिक्षिका सरिता भोयटे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

भारताच्या संविधानाला स्वीकृती मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ही निबंध स्पर्धा आयोजित केली होती. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.

कार्यक्रमास डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष दादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश शेटे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत कोळगे यांनी केले.

## प्रभाग ६ च्या सर्वांगीण विकासासाठी दृढनिश्चय; सुनंदा कापसे यांची ग्वाही



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२१ नोव्हेंबर -**

प्रभाग क्रमांक ०६ मधील नागरिकांच्या अडचणी, अपेक्षा आणि स्थानिक समस्या जाणून घेण्यासाठी घेतलेल्या भेटीदरम्यान नागरिकांनी मांडलेले मुद्दे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सुनंदा शिवाजी कापसे यांनी व्यक्त केले.

कागदोपत्री आश्वासनांना नागरिकांचा कंटाळा आला असून प्रत्यक्ष काम आणि दृढनिश्चयाच्या जोरावरच प्रभागाचा विकास साधण्याची जबाबदारी मनापासून स्वीकारत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, महिलांचे प्रश्न, युवकांसाठी संधी, वंचित घटकांसाठी सुविधा या सर्व क्षेत्रांत सातत्यपूर्ण व नियोजनबद्ध काम करण्याचा कटाक्ष राहील, असेही कापसे यांनी स्पष्ट केले.

त्या म्हणाल्या, प्रभाग क्रमांक ०६ चा सर्वांगीण आणि शाश्वत विकास हा माझ्या कार्याचा मुख्य केंद्रबिंदू असेल. नागरिकांना दिलेला प्रत्येक शब्द प्रत्यक्षात उतरवण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करणार आहे.

या भेटीदरम्यान प्रभागाच्या उमेदवार डॉ. सारिका रमेश वाघ, हर्षद अंबुरे, शिवसेना-भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रभाग ६ मध्ये महाविकास आघाडीचा दमदार प्रचार सुरू

### रामेश्वर महादेव व गणपती मंदिरात दर्शन घेऊन शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२१ नोव्हेंबर -**

महाविकास आघाडी (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आय यांच्या वतीने प्रभाग क्र.६ मध्ये आज विधिवत नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. बाबा नगर परिसरातील रामेश्वर महादेव मंदिर व गणपती मंदिरात दर्शन घेऊन उमेदवारांनी प्रचार यात्रेची सुरुवात केली.

यानंतर महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी प्रभागातील प्रत्येक घरात जाऊन नागरिकांची भेट घेतली. मतदारांशी संवाद साधताना कळंब शहराचा विकास, पाणीपुरवठा, रस्त्यांची कामे, महिलांसाठी व युवकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती देत



प्रचार वेगाने पुढे नेण्यात आला. स्थानिक नागरिकांकडून महाविकास आघाडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्टपणे जाणवले.

या प्रचार रॅलीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रश्मी संजय मुंदडा, तसेच प्रभाग क्र.६ चे उमेदवार पांडुरंग गुणवंत कुंभार व अर्चना प्रताप मोरे उपस्थित होते.

प्रचार रॅलीत सहभागी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये प्रताप मोरे, छाया कुंभार, सागर मुंढे, संजय मुंदडा, विश्वजीत जाधव, मंदार मुळीक, मंगेश आष्टेकर, साजेद चाऊस, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक हरिभाऊ कुंभार, हरीश ताटे, राजभाऊ पवार, अँड. पृथ्वीराज देशमुख, भूषण देशमुख, अंजली ढवळे, संजय अंबिरकर, महादेव अंबिरकर, गोरोबा वरपे, पशुपती पाटील, बालासाहेब ठोंबरे, अखिल काझी, रामभाऊ जाधव, प्रवीण जाधव, ऋषिकेश वेदपाठक, रवी चराटे, ताजुदिन सय्यद, शिलानंद शिनगारे, भाऊ कुचेकर, रोहन कुंभार, नवनाथ कदम, प्रणिकेत मोर, नयन कुंभार, विकास घोडगे, अनुराधा कुंभार, सारिका कुंभार, ढगे मॅडम, रुपली भाकरे, विजयश्री वाघमारे, मनीषा अंबीरकर, अंजली अंबिरकर, एकखंडे बाई, प्रतिभा माने, जयश्री स्वामी, रेखा आकोसकर, वनकळस बाई, सरिता मोहिते, बंदना जाधव, इंदुमती जाधव, सिंदुबाई जाधव, उर्मिला कवडे, प्रियांका लांडगे, प्रतीक्षा मोरे, रूपाली घोडगे, मंगल पवार यांचा उत्साही सहभाग होता.

## मुरुम पालिका निवडणूक : अध्यक्षपदासाठी चौघे रिंगणात

### नगरसेवक पदासाठी ५७ उमेदवार...

**तभा वृत्तसेवा / महेश निंबरगे**
**मुरूम, दि.२१ नोव्हेंबर -**

पालिका निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी अध्यक्षपदासाठी उमेदवारी दाखल केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका उमेदवारासह दोन अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्याने भाजप, शिवसेना (शिंदे), अपक्ष, शिवसेना (उबाठा) पक्षाचे चार उमेदवार रिंगणात राहिले आहेत. तर नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केलेल्या १३ जणांनी माघार घेतल्याने ५७ उमेदवार रिंगणात राहिले आहेत.

मुरूम पालिका निवडणुकीत अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे रफिक पटेल,




अपक्ष उमेदवार प्रशांत पाटील, अपक्ष उमेदवार लखन भोंडवे या तीन उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

तर प्रभाग १ अ मधील समरीन लिंबाळे, १ ब मधील सागर धुमुरे, २ अ मधील बालाजी राठोड, ४ ब मधील राजेंद्र शिंदे, ५ अ मधील बालाजी राठोड आणि नसरोद्दीन कुरेशी, ५ ब मधील राजश्री भोंडवे, ७ अ मधील प्रभावती धुमुरे, ७ ब मधील गणेश कडगंचे, ८ अ मधील समरीन लिंबाळे, ८ ब मधील सुरेश मंगरुळे, ९ अ मधील भाग्यश्री फुगटे, १० ब मधील सिद्राम बोराळे आदी १३ उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली.

यामुळे अध्यक्षपदासाठी भाजपचे बापुराव पाटील, शिवसेना (शिंदे) पक्षाचे चंद्रशेखर मुदकना, शिवसेना (उबाठा) अजित चौधरी, अपक्ष सिद्धलिंग हिरेमठ अश्या चार उमेदवारांसह नगरसेवक पदासाठी ५७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत.

महायुती तसेच महाविकास आघाडी होण्याबाबत सकाळ पासूनच शहरात चर्चा होती मात्र अद्याप चित्र स्पष्ट दिसत नाही.

## फुलवाडी येथे श्री नागनाथ महाराज यात्रा उत्साहात संपन्न; हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२१ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी येथील श्री नागनाथ महाराजांची पारंपरिक वार्षिक यात्रा गुरुवार व शुक्रवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. दोन दिवसांत हजारो भाविकांनी यात्रा स्थळी हजेरी लावून दर्शन, धार्मिक विधींमध्ये सहभागी होत भक्तिभाव व्यक्त केला. यावेळी श्री नागनाथाच्या मानाच्या काठ्यांनी यात्रेकरूंचे विशेष लक्ष वेधले.

२० नोव्हेंबर, सोमवती अमावास्या (कार्तिकी) रोजी पहाटे पाच वाजता श्रींचा अभिषेक विधीपूर्वक संपन्न झाला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम, पूजन व भक्तिमय उपक्रम पार पडले. रात्री ८ वाजता फुलवाडी येथील खंडोबा पाऊतक्यापासून पालखी, छबीना आणि मानाच्या काठ्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच रात्री सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजता फुलवाडी गावातून खुदावाडी, शहापूर, कानेगाव, किलज, मुळेगाव, काटगाव आदी गावांतील पालख्यांच्या उपस्थितीत काठ्यांची पारंपरिक भव्य मिरवणूक काढण्यात आली. सकाळी दहा वाजता हजारो भक्तांनी अग्नी प्रवेश करून श्रद्धाभाव व्यक्त केला. ११ वा. पार पडलेल्या महाआरतीनंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला आणि यानंतर यात्रेची सांगता करण्यात आली.

यात्रेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी यात्रा कमेटीचे अध्यक्ष गुरुराज हांगडे, उपाध्यक्ष सातलिंग बोंगरगे, तंटामुक्त समिती अध्यक्ष राजेंद्र लंगडे, पोलीस पाटील रेखा अमोल हांडगे, तसेच कमेटीचे सदस्य आणि बसवेश्वर युवा मंच यांच्याकडून विशेष परिश्रम घेण्यात आले.

## वंचित बहुजन आघाडीचा झंझावात : येरमाळा सर्कलमध्ये मॅरेथॉन बैठकींची सुरुवात

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
Digital NEWS
बातमी नव्हे विचार
राष्ट्रीय विचारांचे दैनिक सोलापूर तरुण भारत
आता डिजिटल प्लॅटफॉर्मच्या रुपात



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२१ नोव्हेंबर -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून विविध पक्षांनी प्रचाराची लगबग वाढविली आहे. त्याच अनुषंगाने वंचित बहुजन आघाडीनेही कंबर कसत येरमाळा सर्कलमधील मॅरेथॉन बैठकींना सुरुवात केली आहे. पक्षाचे जिल्हा अध्यक्ष प्रणीता ढिकले यांच्या आदेशान्वये येरमाळा सर्कलमधील १६ गावांमध्ये संवाद बैठका आयोजित केल्या जात असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होत आहे.

बारातेवाडी येथे दि.१७ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ७ वाजता संवाद बैठक पार पडली. बैठकीस वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष अॅड. लक्ष्मण खुणे, जिल्हा संघटक बाळासाहेब चंदनशिवे, सामाजिक कार्यकर्ते डी.एस. चंदनशिवे, सामाजिक कार्यकर्ते ताकपीरे साहेब, सा. सक्षम भूमिकाचे मुख्य संपादक बाळासाहेब चंदनशिवे तसेच कळंब तालुका प्रभारी व महासचिव कुंदन कांबळे प्रमुख उपस्थित होते.

बैठकीत मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त करत पक्ष मजबूत करण्यासाठी तसेच आगामी निवडणुकीत विजयी उमेदवार घडविण्यासाठी समाज बांधवांनी एकत्र येत मतदानाचा टक्का वाढविण्याचे आवाहन केले. सकारात्मक चर्चेद्वारे सत्तेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन करण्यात आले.

उद्योजक विक्रम पायाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एमपीएससी प्रशिक्षक महादेव पायाळ यांनी केले. यावेळी तात्याबा पायाळ, गोरोबा पायाळ, विश्वनाथ पायाळ, गोविंद पायाळ, भैया पायाळ, भीवा पायाळ, बाळू अंगरखे, प्रदीप कांबळे, महादेव पायाळ, शिवम शिंदे, विलास पायाळ, वसंत अंगरखे यांसह बारातेवाडीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माकणी धरणातील टेंडर वादामुळे स्थानिक मच्छिमारांमध्ये संताप; सोमवारी निर्णायक बैठक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**

धरण निर्मितीपासून निम्न तेरणा प्रकल्पातील माकणी धरणात मासेमारी करून उदरनिर्वाह करणाऱ्या स्थानिक मच्छिमार बांधवांना मोठा धक्का बसला आहे. यंदाचे मासेमारीचे टेंडर माकनाई मच्छिमार संस्था यांना मिळाले असून या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पारंपरिक, ग्रहणग्रस्त स्थानिक मच्छिमारांना धरणात उतरू न देण्याचे आदेश दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

स्थानिक मच्छिमारांना रोखून आंध्र प्रदेशातील १५० ते २०० मच्छिमारांना धरणात उतरवून मासेमारी केली जात आहे, अशी तक्रार समोर आली. यामुळे जवळपास ३०० मच्छिमार कुटुंबे आणि साधारण १,५०० लोकांचा उदरनिर्वाह धोक्यात आला आहे.

ही गंभीर बाब मच्छिमार बांधवांनी शेतकरी नेते अनिल जगताप यांच्यासमोर मांडली. त्यांनी एडवोकेट शाम जावळे-पाटील यांच्यासह खासदार ओमराजे निंबाळकर यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. खासदारांनी तातडीने सहयुक्त आयुक्त, मत्स्य व्यवसाय लातूर यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

याशिवाय मच्छिमार प्रतिनिधी, अनिल जगताप आणि अॅड. जावळे-पाटील यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, धाराशिव यांनाही भेटून निवेदन दिले. त्यांनीसुद्धा फोनवरून तत्काळ कारवाईचे आदेश दिल्याने दिवसभरात प्रकरणात मोठी गती आली.

सोमवारी होणारी बैठक ही निम्म्या भागातील मच्छिमारांच्या अस्तित्वासाठी निर्णायक ठरणार असून संपूर्ण परिसराचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.

### मच्छिमार बांधवांमध्ये समाधान

संपूर्ण घडामोडीत अनिल जगताप यांनी शासन निर्णयातील कलम-दाखले आणि तांत्रिक बाबींचा आधार देत प्रशासनाशी चर्चा केली. त्यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे समस्या तातडीने पुढे गेल्याचे समाधान मच्छिमार बांधवांनी व्यक्त केले आहे.

### २४ नोव्हेंबरला आयुक्त कार्यालयात महत्त्वाची बैठक...

मत्स्य व्यवसाय विभागाच्या आयुक्त तेजस्विनी कराळे यांनी या संदर्भात २४ नोव्हेंबर (सोमवार) रोजी लातूर येथील त्यांच्या दालनात तातडीची बैठक बोलावली आहे. यातून स्थानिक मच्छिमारांच्या प्रश्नावर तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातुरात २०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने शहरातील बाजारपेठेतील ११० दुकानांतून तब्बल २०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या आहेत. व्यापाऱ्यांकडून १६ हजार ५०० रुपयांचा दंडही वसूल केला.

लातूर मनपाच्या स्वच्छता विभागाचा पदभार नवनियुक्त उपायुक्त वसुधा फड यांनी स्वीकारला असून त्यांनी आपल्या कामालाही सुरुवात केली आहे. आगामी काळात लातूर शहरात प्लास्टिक बंदीची मोहीम अधिक गतिमान करण्यावर आपला भर असणार असल्याचे वसुधा फड यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे. त्या मोहिमेचा एक भाग म्हणून गुरुवारी शहरातील दुकानदार, विक्रेते, फुल विक्रेते , भाजी विक्रेते अशा एकूण ११० विक्रेते - व्यापाऱ्यांकडून २०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करून त्यांच्याकडून साडे सोळा हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

प्लास्टिक पिशव्यांच्या वापराने होणाऱ्या कचऱ्याचे विघटन होत नाही. त्यामुळे शहराच्या प्रदूषणात कमालीची वाढ होते. शहरात भविष्यात प्लास्टिक बंदीची मोहीम अधिक गतिमान करणार असल्याचे वसुधा फड यांनी सांगितले.



# माजी उपमहापौरांच्या प्रभागातच घाणीचे साम्राज्य..!






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहरातील जवळपास प्रत्येक प्रभागात भागाच्या अनेक महिन्यांपासून नागरी सुविधांचा प्रचंड अभाव आहे. मनपाचा कारभार प्रशासकांच्या हाती असल्याने सामान्य नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्याऐवजी त्यांनी अन्य कामांना प्राधान्य दिल्याने येणाऱ्या मनपा निवडणुकीत उमेदवार म्हणून प्रभागात फिरणाऱ्या संभाव्य नगरसेवकांची खरी कसोटी लागणार आहे. शहराचे माजी उपमहापौर तथा प्रभाग क्रमांक १ चे माजी नगरसेवक देविदास काळे यांच्या प्रभागातील महात्मा गांधी शाळेच्या भागाच्या भागातील उंट अड्डा, सूळ गल्ली परिसरात घाणीचे साम्राज्य पाहायला मिळाले. या भागातील असंख्यमतदार लोकप्रतिनिधींच्या आणि प्रशासनाच्या ढिम्म कारभाराच्या निषेधार्थ चक्क मनपा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या मानसिकतेत आहेत.

लातूर शहराकडे जरी मराठवाड्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होत जाणारे शहर म्हणून पाहिले जात असले तरी वास्तव फार वेगळे आहे. हे प्रत्यक्ष शहराच्या विविध भागात फेरफटका मारल्यानंतर पाहायला मिळते. प्रत्येक प्रभागातील-वॉर्डातील नागरिक विविध प्रलंबित समस्यांनी अक्षरशः वैतागले आहेत. मनपातील मागच्या तीन वर्षांहून अधिक काळच्या प्रशासक राजमध्ये नागरी समस्यांकडे सपशेल दुर्लक्ष्य झाल्याचे अनेक बाबींवरून निदर्शनास येते. लातूर शहराच्या प्रभाग १-१ चे माजी नगरसेवक, माजी उपमहापौर देविदास काळे यांच्या वॉर्डातील या भागातील नागरिकांनी मावळत्या पालिकेतील सदस्यांसह प्रशासनाबद्दल तीव्र शब्दात संताप व्यक्त केला.

तत्कालीन नगरसेवकाकडे आपल्या अडचणी घेऊन गेले असता नागरिकांना ते तुम्ही पैसे घेऊन मतदान केलेय. आता कशाला आमच्या दारात येताय? अशा शब्दात बोलत असल्याचा आरोपही संतप्त महिला वर्गातून केला गेल्याचे ऐकावयास मिळाले. या गल्लीत गटारी

### असंख्य मतदार मनपा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या मानसिकतेत

सुद्धा व्यवस्थित बांधल्या गेलेल्या नाहीत. गटारीत कचरा-घाण काढल्यानंतर ती भरून न नेता तेथेच ठेवली जाते. ती घाण परत गटारात जाते आणि गटारी तुंबतात. कचरा घेऊन जाणाऱ्या घंटा गाडीवाल्याला तो कचरा घेऊन जण्यास सांगितले असता, तो तुमच्या गल्लीत गाडी यायला रस्ता नाही, आम्ही कचरा कसा नेणार? अशी उत्तरे देतात, अशा शब्दात नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या. अस्वच्छतेमुळे गटारीतील घाण अक्षरशः रस्त्यावर येते. ती घाण निचरायलासुद्धा तेथे जागा नाही. त्यामुळे घाणीचे साम्राज्य, डासांचा वाढता प्रादुर्भाव अशा परिस्थितीत एखाद्या झोपडपट्टीपेक्षाही बत्तर अवस्थेत येथील नागरिकांना दिवस कंठावे लागत आहेत. मैला वाहून नेणाऱ्या भुयारी गटाराचेचेंबरही अगदी दोन तीन फूट खोलीचे बनवले गेले असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. तसेच चेंबरमधून मैला वाहून जाण्यासाठी सुद्धा उतरत्या क्रमाऐवजी चढत्या क्रमाने रस्ता केला गेला असल्याचे दिसून आले. त्यामुळे या गल्लीतील अनेक चेंबर पावसाळ्यात भरल्यानंतर आतील सर्व घाण पाणी, मैला रस्त्यावर पसरतो, नागरिकांना त्यावेळी जगणे मुश्किल होते, अशा संतप्त प्रतिक्रियाही ऐकायला मिळाल्या.

या गल्लीत फेरफटका मारल्यानंतर असे लक्षात येते की, येथे चार चाकी गाडी सोडा, साधा ऑटोरिक्षाही येऊ शकत नाही. कारण रस्त्यावर उभारण्यात आलेले भुयारी गटारांचेचेंबर रस्त्याच्या उंचीपेक्षा अधिक बनले आहेत. म्हणजे या गल्लीतील रस्त्याच्या कामाचा दर्जा काय असेल ते सुजाण नागरिकांच्या लक्षात येईल. नळाला येणारे पाणीसुद्धा अधून मधून नव्हे तर नेहमीच खराब, दुर्गंधीयुक्त येते. पाण्यातून अनेकदा अळ्या, गेचवे येतात, असे या भागातील महिला भगिनींनी सांगितले. असे पाणी पिण्यासाठी नव्हे पण सांडपाणी म्हणून उपयोगात आणण्याच्या लायकीचे नसल्याचे सांगण्यात आले.

या बाबी अनेकदा मनपा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्नही केला. पण कोणीही आतापर्यंत त्याकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे या परिसरातील नागरिक होऊ घातलेल्या आगामी मनपा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार घालण्याच्या मानसिकतेत असल्याचे सांगितले गेले.विकास कामांची मागणी केली की नगरसेवक मतदानासाठी पैसे दिल्याचे बोलून दाखवतात. त्यामुळे अनेकदा प्रत्यक्षात पैसे कोणत्या मतदारांना दिलेतत्याची यादी द्या, अशी मागणी करूनही माजी नगरसेवक ती यादी देत नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला.

याच १ नंबर प्रभागातून यशोदा चित्रमंदिर, अंबाजोगाई रोडकडे जाणारा रस्ता आहे. या रस्त्यावरील वाहतुकीची वर्दळ मागच्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या भागातील रस्त्यांची अवस्थाही अतिशय बिकट झाली आहे. या भागातील रस्त्याकडे पाहिले असता ते महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते असल्याचे अजिबात वाटत नाही. हा रस्ता जणू एखाद्या ग्रामीण भागातील रस्ता असल्यासारखे दिसते. या रस्त्यावरही आता नेहमीच म्हणजे काहीमिनिटा-मिनिटाला वाहतुकीची कोंडी होत असल्याचे पाहायला मिळाले.

मुख्य रस्त्यावरून जाण्यापेक्षा नागरिक-वाहन धारक या मधल्या रस्त्याने जाण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे या मार्गावरही आता शहरातील अन्य मार्गाप्रमाणे वाहतुकीची कोंडी होताना दिसतेय. बालाजी मंदिराकडून यशोदा चित्रमंदिरकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणही झाल्याने अगोदरच छोटा असणारा हा रस्ता आणखीनच छोटा झाल्याचे दृष्टीपथास येते.

मनपा निवडणुकीला अद्याप काहीसा अवधी आहे. किमान माजी नगरसेवक आणि इच्छुकांनी येथून तरी नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी तत्पर राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आ.देशमुख यांनी साधला नागरिकांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव

### समस्या निवारणासाठी अधिकाऱ्यांना केल्या सूचना

देशमुख यांनी शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर व जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांच्या भेटी घेतल्या. यावेळी त्यांनी विविध संस्थांचे पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांशी संवाद साधला. आमदार देशमुख यांनी आलेल्या नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार केला. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तात्काळ सूचना केल्या.



या भेटीदरम्यान माजी महापौर दीपक सूळ, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावने, सचिव अरविंद पाटील, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, रेणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सर्जेराव मोरे, गणेश एस. आर. देशमुख, अशोक अग्रवाल, व्यंकट शिंदे, पत्रकार बशीर शेख, यशपाल कांबळे, जितेंद्र स्वामी, व्यंकट जाधव, केतन हलवाई, संजय वर्मा, पत्रकार नेताजी जाधव, दिनेश व्यास, डॉ. निखिल व्यास राजकुमार कत्ते, गोविंद देशमुख, माधव सोळुंके, आनंद माने, राम साळुंखे, माधवराव मुळे, सुनंदा मोठे, हनमंत पवार, जयश्री पाटील, बिभीषण सांगवीकर, संजय शिंदे, भीमाशंकर ढेकणे, सिकंदर पटेल, अभिषेक पतंगे, दिनेश गोजमगुंडे, व्यंकटेश पुरी,बी.एस. पवार, गोपाळ शिंदे, उदय पाटील, आकाश भगत, सुभाष घोडके, प्रा.बालाजी वाघमारे, कृष्णा थोरमोठे, वेदप्रकाश मलवाडे, सुधीर पाटील, मंजीत नरहरे, दीपमाला चंदनशिवे आदींसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# जिल्हा गुणवत्ता कक्ष समिती सदस्य निवडीबद्दल प्राचार्य शिंदेंचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर येथील प्राचार्य गोविंद शिंदे यांची जिल्हा गुणवत्ता कक्षाच्या समिती सदस्यपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांची ही निवड शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुधारण्यासाठी ही निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल विचावंत ग्रुपच्यावतीने प्राचार्य डॉ.आर. एस. अवस्थी, कमलाकर कदम, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, बापूसाहेब गोरे, प्रा.जीवन जाधव यांच्याहस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या समितीच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुधारण्यासाठी जिल्हा गुणवत्ता



कक्ष समितीचे कार्य असणार आहे.

शाळा व्यवस्थापन आणि कार्यक्रम सल्लागार यांसारख्या समित्यांची रचना आणि कार्यपद्धती सुधारण्यासाठी मदत होणार आहे. या समित्यांमध्ये शैक्षणिक दर्जा सुधारणे, गुणवत्ता वाढवणे आणि धोरणात्मक बदल घडवून आणणे यांसारख्या कामांवर लक्ष केंद्रित केले जाते. त्याचबरोबर शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविणे बाबत धोरण ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

# मालेगाव चिमुकली अत्याचार, हत्या प्रकरणी आरोपीस फाशीची शिक्षा द्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** मालेगाव (जि. नाशिक) येथील मौजे डोंगराळे गावात सुवर्णकार समाजातील केवळ तीन वर्षांच्या चिमुकली कु. यज्ञा जगदीश दुसाने हेच्यावर झालेल्या क्रूर अत्याचारानंतर निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. या भीषण घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली असून दोषींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशन, लातूर यांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

### सुवर्णकार समाजात संतापाची लाट

संघटनेने आपल्या निवेदनात म्हणटले आहे कीं निष्पाप बालिकेला न्याय मिळावा आणि दोषींना फाशीची शिक्षा व्हावी, हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे नमूद केले. सदर गुन्हा फास्टट्रॅक न्यायालयात वर्ग करून खटला तातडीने चालवावा, दोषींना फाशीची शिक्षा होण्यासाठी पाठपुरावा संबंधितांकडे तातडीने करावा, अशा घृणास्पद घटनांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या, अशा मागण्या करण्यात आल्या असून सदर निवेदन लातूर जिल्हा सोनार समाज असोसिएशनचे अध्यक्ष राजाभाऊ हरिभाऊ बोकन यांच्या नेतृवाखाली जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ओमअप्पा धरणे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे, तालुका अध्यक्ष राहुल भुतडा, समाजाचे गजेंद्र बोकन, शिवसेनेचे आकाश बजाज, गणेश बेद्रे, पुष्कर उपाध्याय आदी मान्यवर उपस्थित होते.

# राजीव गांधी चौकातून बॅग लंपास

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहरातील राजीव गांधी चौक परिसरातील एका हॉटेलमधून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम आणि महत्वाची कागदपत्रे असलेली बॅग लंपास केल्याची घटना घडली आहे. लातूर शहरातील नागरिक विजयकुमार ब्रॉले हे राजीव गांधी चौकात एका हॉटेलमध्ये आपली बॅग बाजूला ठेवून नाश्ता करत होते. अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व महत्वाची कागदपत्रे असलेली बॅग पळवली. यप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लातुरात टिपू सुलतान जयंती साजरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर शहरातील बालाजी नगर परिसरात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रभाग अध्यक्ष विकास कामबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहीद टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विकास कांबळे यांच्या हस्ते टिपू सुलतान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष समीर शेख, राजदार पठाण, हनीफ पठाण, आनंद सोनवणे, नवाब शेख, अमोल गायकवाड, संतोष जाधव, महेबूब शेख, सत्तर शेख यांसह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# लातूरमध्ये ५ लाख २० हजारांचा गुटखा जप्त




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ नोव्हेंबर :** लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने कार्यवाही करत राज्य शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखूजन्य पदार्थ (गुटखा) अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या एकास पकडले. त्याच्याकडून ५ लाख २० हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटख्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत स्थानिक गुन्हे शाखेकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, चाकूर तालुक्यातील रोहिणा ते बोथी रोडमार्गे पांढरी स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एमएच ०५ - ए एक्स ९६१० मधून प्रतिबंधित केलेला गुटख्याची वाहतुक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्याप्रमाणे पोलिसांनी बोथी तांडा-रोहिणा रोडवर सापळा लावू कार अडवून झडती घेतली. कारची तपासणी करताना डिक्कीमध्ये, पाठीमागील सीटखाली पांढऱ्या व खाकी रंगाच्या पोत्यांमध्ये प्रतिबंधित गुटखा आढळून आला. आरोपी अभय दिनेश सोळंके,वय ३० वर्षे रा. मुंगी, ता. धारूर, जि. बीड हा राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्री व अवैध व्यापार करण्याच्या उद्देशाने वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध चाकूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशावरून, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, पोलीस अंमलदार संजय कांबळे, सुर्यकांत कलमे, पाराजी पुठेवाड यांनी केली आहे.